# सुश्लोककुमार

१०४०
म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. नं. १२५५७

नों. दि

REFBK-0006037
REFBK-0006037

किंमत ४ रुपये.

राा. चिं. श्रीखंडे

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.
REFBK-0006037
REFBK-0006037

श्री

तव कथामृतं तप्तजीवनं कविभिरीडितं कल्मषापहम् ।
श्रवणमङ्गलं श्रीमदाततं भुवि गृणन्ति ते भूरिदा जनाः ॥

श्रीमद्भागवत, १०-३१-९

# सुश्लोककुमार

## श्रीकालिदासकृत कुमारसंभव महाकाव्याचा मराठी श्लोकबद्ध अनुवाद

मूळ संस्कृत कुमारसंभवासह व सुंदर रंगित चित्रांसह

लेखक

**रामचंद्र चिंतामण श्रीखंडे, एम्. बी. बी. एस्.**

‘ वाङ्मय-श्री-खण्ड ’, ‘ सुश्लोकगोविंद ’ ‘ कुंदमाला ’

इ. ग्रन्थांचे संपादक, लेखक व काव्यकर्ते

: उपोद्घातलेखक :

हिज् हायनेस् श्रीमंत बाळासाहेब पंत प्रतिनिधि, बी. ए.,

राजेसाहेब औंध.

प्रथमावृत्ति

शके १८६१ श्रीशिवजयंती

दा. क्र. ८०३६

सन १९४०

**किंमत ४ रुपये.**

प्रकाशकः-डॉ. रामचंद्र चिंतामण श्रीखंडे, एम्. बी. बी.एस्.
श्री. हुजूरबाजार यांचा वाडा, कोल्हापूर.

सर्व हक्क ग्रंथकर्त्यांचे स्वाधीन.

मुद्रकः-श्री. कृ. ह. सहस्रबुद्धे,
श्रीज्ञानेश्वर प्रेस, कोल्हापूर.

# अर्पणपत्रिका

**श्रीमंत भवानराव श्रीनिवासराव**

ऊर्फ

**बाळासाहेब पंडित प्रतिनिधि, बी. ए.**

**अधिपति सं० औंध**

यांस

त्यांच्या ठायीं उत्कटत्वानें वसत असलेल्या
अनेक महनीय सद्‌गुणांविषयीं मला
वाटत असलेला हार्दिक पूज्यभाव
व्यक्त करण्याकरितां

**हा ग्रंथ**

सुश्लोकगोविंद, सुश्लोककुमार, कुंदमालादि ग्रंथांविषयीं
त्यांनीं दाखविलेली

**थोर आस्था व दिलेलें बहुविध प्रोत्साहन**

हीं

कृतज्ञतापूर्वक स्मरून
अत्यंत आदरानें व नम्रपणें
अर्पण करीत आहें.

—रामचंद्र चिंतामण श्रीखंडे



जयतु श्रीमन्माहिमा

गुणिजनगुणगणाविकाससत्कीर्तिः ।

जयति यथा रविमाहिमा

यो विश्वाब्जं विकासयति ॥१॥

—रा. चिं. श्रीखंडे

# अनुक्रमणिका


| विषय | | | | पृष्ठ. |
|---|---|---|---|---|
| उपोद्घात ... श्रीमंत बाळासाहेब पंडित प्रतिनिधि, बी. ए. राजे औंध. | | | ... | (६) |
| प्रस्तावना | | | | (९) |
| **सुश्लोककुमार** | | | | |
| सर्ग पहिला—‘ उमोत्पत्ति ’ | | ... | ... | १ |
| सर्ग दुसरा—‘ ब्रह्माभिगमन ’ | | ... | ... | १२ |
| सर्ग तिसरा—‘ मदनदहन ’ | | ... | ... | २४ |
| सर्ग चवथा—‘ रतिविलाप ’ | | ... | ... | ३८ |
| सर्ग पांचवा—‘ तपःफलोदय ’ | | ... | ... | ४७ |
| सर्ग सहावा—‘ उमाप्रदान ’ | | ... | ... | ६२ |
| सर्ग सातवा—‘ उमापरिणय ’ | | ... | ... | ७९ |
| सर्ग आठवा—‘ उमाविहारवर्णन ’ | | ... | ... | ९६ |
| **कुमारसम्भवम् ।** | | | | |
| प्रथमः सर्गः । | ... | ... | ... | ११५ |
| द्वितीयः सर्गः । | ... | ... | ... | ११९ |
| तृतीयः सर्गः । | ... | ... | ... | १२३ |
| चतुर्थः सर्गः । | ... | ... | ... | १२९ |
| पञ्चमः सर्गः । | ... | ... | ... | १३२ |
| षष्ठः सर्गः । | ... | ... | ... | १३८ |
| सप्तमः सर्गः । | ... | ... | ... | १४४ |
| अष्टमः सर्गः । | ... | ... | ... | १५१ |
| **श्रीशारदास्तव** | ... | ... | ... | १५९ |
| **तीनरंगीं चित्रें** | मदनदहन | ... | ... | ३२ |
| | शिवविवाह | ... | ... | ८० |

# उपोद्धात

[ हिज् हायनेस् **श्रीमंत भवानराव श्रीनिवासराव** ऊर्फ **बाळासाहेब पंडित प्रतिनिधि,** बी. ए., राजेसाहेब औंध, यांनीं खास 'सुश्लोककुमारा'साठीं लिहिलेला लेख. ]

'वाङ्मय–श्री–खण्डा'चें पक्कान्न महाराष्ट्रवाचकांना सादर केल्यावर डॉ. श्रीखंडे यांनीं 'कुंदमाला' या सुंदर संस्कृत नाटिकेचें व 'सुश्लोकगोविंद' हें 'गीतगोविंद' या रमणीय काव्याचें मराठी रूपांतर प्रसिद्ध करून मराठी भाषेची सेवा केली; व आज कविकुलगुरु कालिदासाच्या 'कुमारसंभव' या महाकाव्याचें 'सुश्लोककुमार' या महाकाव्याच्या स्वरूपांत रूपांतर ते प्रसिद्ध करीत आहेत याबद्दल आम्ही त्यांचें मनःपूर्वक अभिनंदन करतों. संस्कृत लेणीं प्राकृत भाषेवर चढवून मराठी भाषेचा संसार सजविण्याला सुरवात मराठी कवीश्वर ज्ञानेश्वरांनीं केली व तीच परंपरा अजून कायम आहे हें या 'सुश्लोककुमार' काव्यावरून दिसून येतें. संस्कृत भाषेशीं मराठी भाषा एकरूप आहे, व वडिलोपार्जित रत्नभांडारांतील ठेवा मराठी भाषेला अनंत काल पुरून उरण्यासारखा आहे हेंहि त्यावरून दिसून येतें. स्वतंत्र व प्रतिभासंपन्न ग्रंथरचनेनें भाषा अर्थात्च संपन्न होते; पण त्याचबरोबर दुसऱ्या भाषेंतील नामांकित ग्रंथांचे अनुवाद केले तर तेहि भाषेच्या संपत्तींत भर टाकण्यास कमी उपकारक होत नाहींत. याच हेतूनें कै. परशुरामतात्या गोडबोले यांनीं संस्कृत नाटकांचीं भाषांतरें सुरूं केलीं व कै. लेलेशास्त्री यांनीं 'अभिज्ञानशाकुंतला'चें भाषांतर केलें. आजहि डॉ. श्रीखंडे त्याच मार्गानें जात आहेत.

कालिदासाची गोष्ट इतर सर्व संस्कृत नाटककारांहून निराळी आहे. त्याची भाषारचना जशी नंदनवनासारखी रम्य, तसेंच त्याचें मन सागरासारखें विशाल व अथांग आहे, व हा अनुभव त्याच्या नाटकांपेक्षांहि अधिक विस्तृत प्रमाणांत 'रघुवंश' किंवा 'कुमारसंभव' हीं त्याचीं महाकाव्यें वाचतांना येतो. पात्र व प्रसंग यांची असलेली मर्यादा व बंधनें, महाकाव्यां-

तील वर्णनें करतांना, त्याच्यावर नसल्यामुळें त्याची प्रतिभा स्वैर आहे, हें ह्याचें कारण आहे.

कालिदासाला 'शृंगाराचा राजा' हें नांव सार्थ आहे; व हा अनुभव 'कुमारसंभव' वाचतांना पदोपदीं येतो. पार्वतीचें शंकराकडे प्रथम आगमन किंवा शिवपार्वतीविलास ह्या दोन प्रसंगांच्या पुस्तकांतील वर्णनावरून ही गोष्ट दिसून येईल. परंतु शाकुंतलांत ज्याप्रमाणें शारीरिक आकर्षणावर उभारलेलें प्रेम क्षणभंगुर आहे व तें सुखदायक नाहीं, आणि खरें प्रेम मानसिक व आत्मिक एकरूपतेवर आहे हें दाखविण्यासाठीं कालिदासानें दुष्यंत–शकुंतलेची आरंभीं ताटातूट करून पुढें त्यांची भेट घडविली तोच प्रकार त्यानें 'कुमारसंभवां'तहि केला आहे. कालिदास शृंगाराचा कवि असला तरी शृंगार हा त्याचा स्थायिभाव किंवा एकमेव रस नाहीं हें यावरून दिसून येतें. तारकासुराचा वध करण्यासाठीं शिवपार्वतीचा विवाह होऊन त्यांना पुत्र होणें देवांच्या दृष्टीनें अवश्य होतें. प्राचीन काळीं कोणत्याहि दोन प्रबळ जमातींचें सामर्थ्य एकत्रित करण्यासाठीं त्यांत विवाह घडवून आणणें हा महत्त्वाचा मार्ग असे, ही कुमारसंभवाची केवळ ऐतिहासिक पार्श्वभूमी झाली. परंतु पार्वतीचें सौंदर्य, तिचें मदन–वसंतासह अत्यंत थाटांत शंकरांच्या आश्रमाकडे आगमन, मदनाचा खेळ, पार्वतीचा विलास, शंकरांच्या मनाची चलबिचल, मदन–दहन, रतीचा विलाप, पार्वतीची उग्र तपश्चर्या, शंकरपार्वतींची भेट, त्यांचा परिणय व प्रणय, आणि शेवटीं तपस्येसाठीं त्यांचें प्रयाण हीं सर्व जिवंत वर्णनें कालिदासाचीं आहेत, व तीं कविकुलगुरु या त्याच्या श्रेष्ठतम पदवीस शोभण्यासारखींच आहेत. वैराग्याचा पुतळा असलेला शंकर शृंगार करण्यास अक्षम नाहीं पण त्याचबरोबर, शृंगाराचें साध्य शृंगारांत नसून तें वैराग्यांत किंवा त्यागांत आहे हा सुंदर सिद्धांत कालिदासानें कुमारसंभवांतहि ग्रथित केला आहे व यावरून त्याच्या वाङ्मयाचा ध्येयवाद दिसून येतो.

रा. श्रीखंडे यांचें भाषांतर चांगलें साधलें आहे; व अनेक ठिकाणीं तर मूळ रचनेइतकेंच प्रसादपूर्ण आहे. भाषांतरास त्यांनीं कालिदासासारखा

कविश्रेष्ठ घेतल्यामुळें त्यांचें काम अर्थात्च फार क्लिष्ट व जबाबदारीचें होतें. तें त्यांनीं समाधानकारक रीतीनें पार पाडलें आहे. सर्व भाषांतर वृत्तमय कवितांनीं केलें असून कोठेंहि त्यांत क्लिष्टता किंवा यतिभंग होऊं नये याची खबरदारी घेतली आहे. वृत्तमय कविता सुबोध व सरळ रीतीनें करणेची त्यांची हातोटी चांगली आहे. आपला जीवनव्यवसाय संभाळून उर्वरित वेळ भाषेच्या सेवेसाठीं व तिच्या संपत्तींत भर घालणाऱ्या अशा सत्कार्यासाठीं खर्च करणारी मंडळी महाराष्ट्रांत फार थोडी आहेत. म्हणून तर डॉ. श्रीखंडे यांचें विशेष कौतुक केलें पाहिजे. त्यांचीं पुस्तकें भाषांतरित असलीं तरी मराठी भाषेच्या एका दालनांत दीर्घकाल राहतील व एकदां हाताळलीं कीं संपलें या वर्गांत जाणार नाहींत अशी आमची खात्री आहे. यापुढें त्यांनीं मराठ्यांच्या इतिहासांतील ' राजारामाच्या पश्चात् मराठ्यांचा व औरंगजेबाचा संग्राम ' यासारखा स्वतंत्र विषय घेऊन त्यावर स्वतंत्र व तेजस्वी अशी काव्यरचना करावी असें आम्ही सुचवितों व त्यांच्या ग्रंथास सुयश चिंतितों.

औंध,
१३ मार्च १९४०

भवानराव
राजा औंध

# प्रस्तावना

तेचि रसाळ कथा। मऱ्हाटिया प्रतिपथा। आणिजेल आतां। अवधारिजो ॥
—श्रीज्ञानेश्वरी, अ. १२–२४६

'सुश्लोकगोविंद' हा माझा गीतगोविंदानुवाद महाराष्ट्रिय रसिकांस सादर केल्यानंतर आतां सहा वर्षांनीं हा 'सुश्लोककुमार' मीं योजिल्याप्रमाणें सुदैवानें परिपूर्ण होऊन रसिकांचे हातीं मला देतां येत आहे याचा आनंद किती होतो तें मला शब्दांनीं सुव्यक्त करितां येत नाहीं. वास्तविक प्रस्तुत ग्रंथास मीं आरंभीं 'प्राकृत कुमारसंभव' असेंच नांव योजिलें होतें. परंतु 'कुमारसंभवा'स थोडक्यांत नुसतें 'कुमार' असेंहि म्हटलें जातें. आणि 'सुश्लोकगोविंदा'च्याच धर्तीवर प्रायः रचल्या गेलेल्या या तत्सदृश ग्रंथास त्या ग्रंथाचें लाडकें भावंड या दृष्टीनें 'उत्तम कीर्तीचा कुमार' या अर्थी 'सुश्लोककुमार' हेंच अभिधान अनुरूप होईल असें वाटल्यावरून तसें त्याचें नामकरण करण्यांत आलें आहे. गीतगोविंदाचे बाबतींत मूळ गीतांचेहि मीं श्लोक बनविल्यामुळें 'सुश्लोकगोविंद' हें नांव अधिक योग्य म्हणतां येण्यासारखें होतें. व 'उत्तम कीर्ती'चा गोविंद हाहि अर्थ त्यांतून सहजच सुंदरपणें ध्वनित होतो. या 'सुश्लोककुमारा'चे बाबतींत मात्र मूळ कविसम्राट् कालिदासाचें काव्य सुश्लोकरूपच असल्यानें त्याच्या या मराठी अनुवादास 'सुश्लोक' हें विशेषण प्रामुख्यानें 'उत्तम कीर्तीचा' या अर्थींच मला अभिप्रेत आहे. हे श्लोक उत्तम झाले आहेत कीं कसे तें मार्मिक रसिक ठरवितीलच.

'गीतगोविंद' हें खंडकाव्यांत मोडतें. त्याचें रूपांतरकार्य माझ्या मनाजोगें झाल्यानंतर एकाद्या अप्रतिम व नितांतरमणीय महाकाव्यास मराठी वेष द्यावा असें वाटल्यावरून मी कालिदासाच्या 'कुमारसंभवा'वर परिश्रम करण्यास आरंभ केला व आठही सर्गांचा अनुवाद होण्यास सुमारें अर्धें तप लागलें. प्रथमतः मला वाटलें होतें कीं हें कार्य आपण लवकर व सहज संपवूं, पण अनेक अडचणींतून स्वास्थ्य लाभून कार्यसिद्धि

होण्यास इतका काळ लोटलाच. प्रस्तुत महाकाव्याचा प्रथम सर्ग श्रीमंत बाळासाहेब पंतप्रतिनिधि यांच्या रौप्य ज्युबिलीच्या महोत्सवप्रसंगीं ( १५ नोव्हेंबर १९३४ ला ) हस्तलिखितांतच मी श्रीमंतांना अर्पण करून समग्र काव्यहि यथावकाश त्यांनाच अर्पण करण्याचा शुभसंकल्प केला होता. श्रीकृपेनें व श्रीमंतांच्याहि वारंवार प्रेमळ प्रोत्साहनानें हें कार्य सिद्धीस जाऊन माझा मनोरथ आज सफल होत आहे व 'क्लेशः फलेन हि पुनर्नवतां विधत्ते' या कालिदासोक्तीचा किंवा 'होतां कांक्षितलाभही न सरती आयास ते कोठले ?' या माझ्या रूपांतरोक्तीचा अनुभव मला आज सानंद प्रत्ययास येत आहे याबद्दल मला धन्यता वाटते.

श्रेष्ठ दर्जाच्या महाकाव्याच्या सुरस अनुवादाचें कार्य किती क्लिष्ट व परिश्रमाचें असतें याची जाणीव तज्ज्ञांसच असणार. पण मनाजोगें कार्य होऊं लागलें म्हणजे त्या कार्यानें होणारा आनंदहि तसाच असाधारण असतो यांत शंका नाहीं. संस्कृतच्या मराठी श्लोकानुवादकाव्यांत अनुवादकास अडचणी येतात त्या प्राय: अशा :—

वृत्तांची निवड नीट व उचित व्हावी लागते. संस्कृत भाषा समासघटित असल्यानें थोडक्यांत पुष्कळ अर्थ त्या समासांत मावूं शकतो. मराठीकरण करतांना संस्कृतमधल्या अवघड समासांचा अर्थ उघड करून वृत्तरचना करायची म्हणजे मूळापेक्षां थोडें दीर्घतर वृत्त स्वीकारणें प्राय: आवश्यक असतें. हें वृत्त फार दीर्घ घेणेंहि तितकें उचित होणार नाहीं. कारण मग मुळांतला अर्थ लवकर संपून जातो. व उरलेल्या वृत्तभागांत भर म्हणून पदरचें वर्णन भरावें लागतें. तें योग्य प्रकारें भरलें गेलें तर ठीक. नाहीं तर मोठ्या पेटींत थोडे जिन्नस भरल्यानें प्रवासांत ती पेटी जशी खडखडते तसेंच कांहींसें, थोडा अर्थ मोठ्या वृत्तांत भरण्यानें होतें. अनौचित्य दिसणार नाहीं या बाबतींत फार जपलें पाहिजे. वृत्ताची निवड रसदृष्ट्याहि परिपोषक अशी व्हावी. मात्र या बाबतींत ठाम नियम असा कोणताहि बांधतां येणार नाहीं. उत्तम प्रतिभावान् कवि प्राय: कोणत्याहि वृत्तांत इष्ट रस सुंदरपणें निर्माण करूं शकतात. व प्रतिभा नसेल तर केवळ वृत्तानें कसला रस निर्माण

क्र. ७१८५

होणार? कालिदासाचें प्रेम उपजाति, अनुष्टुभ्, वंशस्थ, रथोद्धता, वियोगिनी, मंदाक्रांता, वसंततिलका इत्यादि सर्वमान्य वृत्तांवरच आहे. या 'सुश्लोककुमारां'त पहिल्या सर्गांत उपजातीबद्दल शार्दूलविक्रीडित, तिसऱ्या सर्गांतल्या उपजातीबद्दल शिखरिणी, सातव्या सर्गांतल्या उपजाती-बद्दल मंदाक्रांता हीं दीर्घ वृत्तें मीं स्वीकारलीं आहेत. विविधता, अर्थ-वाहकता व रसानुकूलता या दृष्टींनीं हीच निवड मला पसंत पडली. पांचव्या सर्गांतील वंशस्थाबद्दल, वसंततिलका वृत्ताचा उपयोग केला आहे. दुसऱ्या सर्गांतल्या अनुष्टुभ्बद्दल रथोद्धता घेतलें असून साहव्यांतल्या अनुष्टुभ्बद्दल इंद्रवज्रा किंवा उपजाति वृत्त रूपांतरांत योजिलें आहे. वियोगिनीबद्दल कारुण्यपोषक असें मालिनी घ्यावेंसें वाटलें. आठव्या सर्गांतल्या रथोद्धतेबद्दल मुळांतला शृंगार अविस्तृतपणें मराठींत आण-ण्याच्या दृष्टीनें रथोद्धतेच्याच म्हणजे एकादश अक्षरसंख्येचे उपजाति किंवा इंद्रवज्रा असें वृत्त घेतलें असून पुढें 'गंधमादन' शब्द त्या वृत्तांत बसेना म्हणून पुढील श्लोकांसाठीं वसंततिलका वृत्ताचा आश्रय केला आहे. प्रत्येक सर्गान्तींच्या भिन्नवृत्त श्लोकांचा येथें समावेश केलेला नाहीं. सर्गान्तींचे भिन्नवृत्त श्लोक मंदिराच्या कळसाप्रमाणें (Towers) सर्गास भूषवितात.

वृत्ताची निवड करतांना दुसरी एक अडचण येते ती ही कीं, त्या सर्गांतला एकादा शब्द किंवा विशेषनाम अनुवादकानें स्वीकारलेल्या दीर्घ वृत्तांतहि बसूं शकत नाहीं. मला सुश्लोककुमारांत दोन तीन ठिकाणीं अशा अडचणी आल्या. उदाहरणार्थ—'वर्णप्रकर्षे सति कर्णिकारं' (कु. ३–२८) किंवा 'आकृष्टहेमद्युतिकर्णिकारम्' (कु. ३–५३) या चरणांतील 'कर्णि-कार' हा सुंदर व सोपा संस्कृत शब्द अनुवादांत मीं स्वीकारलेल्या शिख-रिणी वृत्तांत बसूंच शकेना. म्हणून 'कर्णिकार'चा प्रतिशब्द मराठींत जो "पांगारा' तो तितकासा कर्णमधुर नसतांनाहि मला वापरावा लागून—

'फुलें पांगाऱ्यांचीं किति तरि अहा! रंगित खरीं
तरी निर्गन्धत्वें करिति मन तीं खिन्नचि परी,
असो सामग्र्यानें गुणनिकर एकत्र जमुनी
अशी वृत्ति प्रायः विलसत विधीच्या नच मनीं! सु. ३–२८

अशी रचना करावी लागली. एकंदरींत या श्लोकांतल्याच अर्थान्तरन्यासाच्या सिद्धांताप्रमाणेंच वृत्त कितीहि चांगलें असलें तरी हवा तो शब्द त्यांत न बसण्याचें व्यंग त्यांत प्रायः असतेंच! सहाव्या सर्गांत 'गंधमादन' हा शब्द विशेषनाम असल्यानें अपरिहार्य झाला व उपजातींत तो बसत नाहीं म्हणून—

उद्यान बाहेरिं सुगंधि सर्व
आख्या जया 'मादन' 'गंध' पूर्व,
यत्कल्पवृक्षातळिं झोंप घेती
प्रवासि विद्याधर शांतचित्तीं. ६—४६

या श्लोकांत अशी कोटिक्रमानें रचना करावी लागली व पर्वतांतून जणुं वाट काढावी लागली! एकूण शक्य तो लक्षपूर्वक वृत्ताची निवड करावी लागते व त्यांतहि ज्या अडचणी येतील त्यांतून युक्तीनें मार्ग काढावा लागतो. आठव्या सर्गांत 'गंधमाद' असेंहि रूप गंधमादनबद्दल वापरलें आहे.

वृत्ताइतकीच अन्य अडचण मराठी अनुवादकापुढें येते ती यमक साधून रचना करण्याची. संस्कृतमध्यें निर्यमक रचना असते तर मराठी अनुवादकाला सयमक रचना केल्यावांचून निभाव नाहीं. परंतु येथेंहि कवीचें शब्दरचनाकौशल्य कसोटीस लागतें व सत्कवि या अडचणींतून लीलया निसटून आपला वाग्विलास प्रकट करूं शकतो. यमकें म्हणजे कवितादेवीच्या चरणांतील जणुं काय नूपुरच! हे सुवर्णनूपुर तिला लाभले तर तिच्या पदविन्यासाचे ध्वनि रसिकांस कां मोह पाडणार नाहींत? म्हणून अनुवादक कवीनें हौसेनें व चातुर्यानें यमकें योजिलीं पाहिजेत. हठाकृष्टता मात्र कोठेंहि दिसतां नये.

अनुवादकास येणारी शेवटची अडचण म्हणजे उचित शब्द व उचित अर्थ यांच्या योगानें मूळांतला शक्य तो रस उत्तम प्रकारें मराठींत आणण्याचें साधण्याची. या अडचणींतूनहि अनुवादक कवि बुद्धिकौशल्य व प्रतिभाबल असेल त्या मानानें यशस्वितेनें मार्ग काढीत असतो. मुळांतील अर्थ तंतोतंत सुरसतेनें अनुवादांत आणणें अशक्य आहे किंवा मराठी भाषा अप्रगल्भ आहे अशा तऱ्हेचे आक्षेप या बाबतींत पुढें केले

जातात. परंतु माझ्या मतें हे दोष भाषेचे नसून अनुवादकाचेच असूं शकतील. ज्या भाषेंत श्रीज्ञानेश्वरीसारखे, आर्याभारतासारखे काव्य-ग्रंथ झाले ती भाषा अप्रगल्भ आहे असें कसें म्हणावें ? भाषा उत्तम म्हणावी तर त्या भाषेंतले सर्वच ग्रंथ सर्वोत्तम झाले असते. पण तसें नाहीं. भाषा ही अशी चीज आहे कीं ती वापरणाऱ्याच्याच कौशल्यावर सर्वस्वीं अवलंबून असते. मुरली ही वाजवित्याची कला दाखविते. जरूर तेथें हक्कानें संस्कृतचें थोडेंबहुत साहाय्य घेऊन बनलेली मराठी काव्यानुवादाला कोणत्याहि प्रकारें अक्षम नाहीं. मुळांतील कवीच्या अंतःकरणांतील सर्व रस शक्य तों मराठींत आणण्याची आकांक्षा साक्षेपी अनुवादक कवीनेंहि धरणें सर्वस्वीं उचित होय. प्रतिभा व बुद्धि या गुणांप्रमाणेंच मूळ कवीवर नितांत भक्ति असल्यावांचून अनुवादांत रसमय नवीनच सौष्ठव उत्तमपणें उतरणें अशक्यप्राय आहे असें मला वाटतें.

या 'कुमारसंभवा'च्या अनुवादाचे कांहीं कांहीं भाग—प्रथम सर्गांतील हिमालयवर्णन, पार्वतीची यौवनावस्था, दुसऱ्या सर्गांतील देवकृत ईशस्तुति, रतिविलाप हा ४ था, व तपःफलोदय हा ५ वा सर्ग समग्रच असे—माझे मित्र श्री. नानासाहेब जांभेकर, बी.ए., संपादक 'लोकशिक्षण' यांनीं मुद्दाम मजकडून मागून घेऊन निरनिराळ्या अंकांत प्रसिद्ध केले याबद्दल मी त्यांचा अतिशय ऋणी आहें. 'लोकशिक्षणां'त येऊन गेलेल्या या भाषांतरांकडे महाराष्ट्रांतील अनेक रसिक विद्वानांनीं मोठ्या कौतुकानें पाहून अभिनंदनपर पत्रें पाठवून अशाच प्रकारें समग्र भाषांतर संपूर्ण आपले हातून तडीस जावो अशी इच्छाहि व्यक्त केली. व सर्वांच्या प्रोत्साहनानें तसेंच मला स्वतःस वाटत असलेल्या या कार्याच्या जिव्हाळ्यानें हें कार्य मजकडून पुरें झालें. या सर्व रसिकांचा मी अतिशय आभारी आहें.

'कुमारसंभव' महाकाव्य हें अष्टसर्गात्मक असून हल्लींच्या प्रतींत जे ९ ते १७ सर्ग छापलेले असतात ते कालिदासाच्या हातचे मुळींच नाहींत याबद्दल आतां विद्वानांत संदेह राहिलेला नाहीं. छंदोवृत्तिकारानें प्रमिताक्षरांचें उदाहरण देतांना मोठ्या मार्मिकपणें एक श्लोक केला आहे—

परिशुद्धवाक्यरचनातिशयं
परिषिञ्चती श्रवणयोरमृतम् ।
प्रमिताक्षरापि विपुलार्थवती
कविभारती हरति मे हृदयम् ॥

'अत्यंत शुद्ध रचनेची, श्रवणपुटांत जणुं काय अमृतधारा सिंचन करणारी, थोडक्या शब्दांतहि विपुल अर्थानें संपन्न असलेली अशी कविवाणी माझें हृदय अंकित करते.' यांत जीं उत्तम काव्याचीं लक्षणें सांगितलीं आहेत व जीं हृदयंगम रीतीनें कालिदासाच्या सर्वच कृतींत व विशेषतः 'कुमारा'च्या पहिल्या आठ सर्गांत उत्तम प्रकारें आढळून येतात तीं पुढच्या सर्गांत दिसून येत नाहींत. म्हणून आठ सर्गांचेंच हें महाकाव्य मानावें लागतें. 'कुमारा'च्या उत्पत्तीची शक्यता, संभवनीयता या आठ सर्गांअखेर झाली आहे हें वाचकांस आढळून येईलच. 'कुमारसंभव' हें नांव वाल्मिकी-रामायणाच्या बालकांड सर्ग ३७ मध्यें प्रथमतः आलेलें दिसतें * व येथूनच तें या महाकाव्यास निवडलें गेलें असावें असें मला वाटतें. विद्वज्जनांनीं याची चिकित्सा करावी.

कोणी असें प्रतिपादन करतात कीं, श्रीशिवपार्वतींच्या शृंगारातिरेकाचें वैरस्योत्पादक वर्णन कवीनें केल्यानें त्याची निंदा झाली असावी व त्यानें तें काव्य अर्धवटच सोडून दिलें असावें. संभोगशृंगाराचीं अश्लीलतेच्या मर्यादेपर्यंत जाणारीं वर्णनें ८व्या सर्गांत कोठें कोठें दृष्टीस पडतात; पण तीं कामशास्त्रास सर्वस्वीं धरून असल्यानें व अत्यंत उच्च प्रतिभाबलानें रचिलीं गेल्यानें सौंदर्योत्पादकच झालीं आहेत. मात्र त्यांचें भाषांतर करतांना मला सदभिरुचीला धक्का न लागेल अशा बेतानें रचना करावी लागली आहे. निंदेमुळें कालिदासानें हें महाकाव्य अर्धवटच ठेवलें म्हणावें, तर रघुवंश महाकाव्याच्याहि शेवटच्या सर्गांत अग्निवर्ण राजाच्या शृंगाराचीं अश्लीलतेपर्यंत भिडणारीं वर्णनें त्यानें कां केलीं असतीं? तेव्हां शृंगारातिरेकाबद्दल झालेल्या निंदेमुळें कुमारसंभव अर्धवट टाकलें असें म्हणतां येणार नाहीं. कदाचित् असें म्हणतां येईल कीं, अश्लील-

---

* एष ते राम गङ्गाया विस्तरोऽभिहितो मया ।
**कुमारसंभव**श्चैव धन्यः पुण्यस्तथैव च ॥३१॥ बालकांड, सर्ग ३७

वर्णनामुळें झालेल्या निंदेनें दोनीहि महाकाव्यांचे समाप्तीचे भाग अपुरे वाटतात. म्हणजे हीं दोनींहि काव्यें रचण्याचें कार्य त्याचें कदाचित् एकदमच चालू असावें. त्यांचें पौर्वापर्य ठरविणें कठिण आहे. एकवेळ तर असेंहि म्हणावेंसें वाटतें, कीं रघुवंश हेंच महाकाव्य कुमारसंभवाच्या आधींचें असावें; कारण रघुवंशाच्या प्रस्तावांत कालिदासाची 'मन्दः कवियशःप्रार्थी गमिष्याम्युपहास्यताम् । प्रांशुलभ्ये फले लोभादुद्बाहुरिव वामनः ॥ ही विनयशाली प्रस्तावना काव्यप्रांतांत नवीनच पदार्पण करूं पाहणाऱ्याची दिसते. कुमारसंभवासारखें महाकाव्य आधीं रचणारा कवि अशी प्रस्तावना कां करील? तसेंच 'वागर्थप्रतिपत्ति' म्हणजे वाक्संपदा आपणास लाभावी अशी पार्वतीपरमेश्वरांजवळ जी प्रार्थना त्यानें केली आहे ती आरंभींच सयुक्तिक दिसते. रघुवंशारंभीं पार्वती व शंकर यांना वाणी व अर्थ यांची दिलेली उपमाच त्यानें कुमारसंभवाच्या ६ व्या सर्गांत हिमालयाकडे पार्वतीयाचना करावयास आलेल्या मुनींच्या भाषणांत घातली असावी:—तमर्थमिव भारत्या सुतया योक्तुमर्हसि । अशोच्या हि पितुः कन्या सद्भर्तृप्रतिपादिता ॥ ७९ ॥

( जैसी सदर्थाप्रति भारती ते । द्यावीस तूं आत्मसुता तयातें ।

कन्या दिली सत्पतितें विवाहीं । चिंतावहा ती पितया न कांहीं ॥७९॥ )

यावरून दिसून येईल. म्हणूनच रघुवंशांतलेंच कांहीं कांहीं श्लोक कुमारसंभवाच्या ७व्या व ८व्या सर्गांत अनुरूप स्थानीं उचित फेरफार करून त्यानें पुनः घातले असावेत. असें अनुमान काढावेंसें वाटतें.+ कालिदासाची परिणतप्रज्ञता, प्रतिभाशालिता, समर्पक वर्णनशैली, निरुपम उपमाचातुर्य व अप्रतिम प्रसादमाधुर्य, अद्भुत व हृदयंगम कल्पकता, संविधान—कुशलता, स्वभावपरिपोष, अत्यंत उदात्त व रमणीय वर्णनें करण्याची हातोटी इ. इ. अलौकिक गुण रघुवंश व कुमारसंभव या दोहींतहि तुल्यतेनें वसत असलेले दिसतील. किंबहुना असेंहि म्हणतां येईल

---

+ कुमारसंभवांतील सर्ग ७—श्लोकांक ५६ ते ६२, ६६, ७९, व सर्ग ८ मधील ८ व ११ हेच श्लोक थोड्याफार फरकानें रघुवंश सर्ग ७ श्लो. ५ ते १२, १४, २४, व सर्ग १९ श्लो. २७, २८ असे आहेत.

कीं, कुमारसंभव हें रघुवंशाचे मानानें लहान असूनहि त्याची बरोबरी करूं शकतें यांतच कुमारसंभवाची थोरवी आहे.

कुमारसंभवाची भूमिका रघुवंशापेक्षां उच्च प्रतीची आहे. यांत देवादिकांचें वर्णन आहे. पण त्यांत मानवी मनोधर्म उत्तमपणें व यथार्थ दाखविले गेले आहेत. पहिल्या सर्गांतील हिमालयवर्णन या महाकाव्य-मंदिराला एकाद्या भव्य गोपुराप्रमाणें शोभा देत आहे. हिमालयाच्याच व्याप्तीप्रमाणें तें सुदीर्घ असूनहि नितांत रमणीय झालें आहे. पुढें पार्वतीचें वर्णन करतांना आमच्या महाकवीचें वर्णनकौशल्य परमावधीस गेलें आहे. पार्वतीचें स्वभावचित्र म्हणजे हुबेहुब, सुंदर, सात्त्विक अशी मानव तरुणीच कवीनें निर्माण केली आहे. ती शंकराची वधू व्हावयाची आहे हें महर्षि नारदाकडून हिमालयास कळल्यानें तो तिच्या लग्नाची कोठेंहि अन्यत्र खटपट करीत नाहीं; इतकेंच नव्हे तर शंकरासहि माझी मुलगी करून घेतां काय अशी पृच्छा करीत नाहीं. न जाणों तपस्येंत मग्न असलेले भगवान् शंकर एकदम नाहीं म्हणाले तर! म्हणून पार्वतीला शंकराची सेवा करण्यास्तव हिमालय योजतो; व शंकरहि तशी सेवा करण्यास तिला संमति देतात. कारण—

समाधिमधिं विघ्नशी जरिहि होय ती सुंदरी
तरी तिज दिली हरें अनुमति स्वसेवे बरी।
मना विवशकारिणी विषयमूर्ति; ती सन्निधीं
असूनिहि न होति जे विवश तेचि कीं धीर–धि ॥

—सुश्लोककुमार १–५९

'विकारहेतौ सति विक्रियन्ते येषां न चेतांसि त एव धीराः।'

दुसऱ्या सर्गांत स्थल ब्रह्मलोक असून त्यांतील देवकृत परमेश्वरस्तुति वेदान्ततत्त्वज्ञानाच्या दृष्टीनें अत्युत्तम आहे. श्रीमन्महाभारत, श्रीमद्भागवत या ग्रंथांत अशीं स्तोत्रें अनेक आहेत. पण थोडक्यांत मार्मिकपणें तत्त्वज्ञानाचें सार या दृष्टीनें, ही स्तुति किंवा पुढें साहव्या सर्गांतील मुनींनीं श्रीशंकराची केलेली स्तुति हीं वर्णनें अप्रातिम आहेत. कालिदासाची

व्यापक व विशाल विचारसरणी त्यानें केलेल्या ब्रह्मा–विष्णु–महेशांच्या थोडक्यांत सुरस व खुबीदार वर्णनावरून कोणासहि कळून येईल. पहा—

एकैव मूर्तिर्बिभिदे त्रिधा सा सामान्यमेषां प्रथमावरत्वम्।
विष्णोर्हरस्तस्य हरिः कदाचिद्वेधास्तयोस्तावपि धातुराद्यौ॥ कु. ८–४४

त्या तीन्हीही परमविभुच्या होत एकाच मूर्ति
त्यांचें मोठेपण, लघुपणा, त्यांसि सामान्य होती;—।
केव्हां विष्णूहुनि हर महान्, त्याहुनी विष्णु केव्हां
वेधा त्यांच्याहुनि कधिं तसा, तेहि त्याहून केव्हां॥ सु. ८–४४

दुसऱ्या सर्गातलें देवांच्या दुरवस्थेचें वर्णन फारच मार्मिक आहे व स्वातंत्र्य नष्ट झालें म्हणजे मोठ्या मोठ्यांनाहि कशीं अपमानास्पद शल्यें सहन करावीं लागतात व दुष्ट अधिराजे आपल्या अंकितांची कशी दुःस्थिति करून सोडतात तें कालिदास या सर्गात दाखवितो. दुष्टांच्या जुलुमांतून बाहेर पडण्यास किती व कशी खटपट करावी लागते हें या सर्गात उद्बोधक रीतीनें कालिदासानें दाखविलें आहे. येथें हेंहि लक्षांत वागविलें पाहिजे कीं देवांची तारकाच्या जुलुमांतून सुटका शंकरपार्वतीच्या विवाहानंतर दीडशें ऋतूंनंतर कुमारोत्पत्ति होऊन नंतरच त्या कुमारानें पराक्रमानें तारकवध करून केली असें दिसतें! ‘ईश्वरेच्छा बलीयसी’ हेंच खरें.

‘मदनदहन’ सर्गांतलें, इंद्रमदनसंवाद, वसंतवर्णन वगैरे सर्वच बहारीचें आहे. योगीश्वर शंकरांची ध्यानसमाधि, नंदीनें तेथें ठेवलेला कडक बंदोबस्त, मदनाचें तेथें रतिवसंतांसह जाणें, पार्वतीचें तेथें शंकरदर्शनासाठीं आगमन, ध्यानमग्न संयमी शंकरास पाहून मदनाची प्रथम उडालेली गाळण, पण नंतर पार्वतीच्या आगमनानें स्वकार्यसिद्धीची त्यास वाटलेली पुनः आशा इ. इ. वर्णन फार सूक्ष्मतेनें अत्यंत उचित शब्दांनीं कालिदासानें केलें असून प्रत्यक्ष मदनदहनाचा प्रसंग असा वर्णिला आहे कीं साऱ्या वाङ्मयांत याच्या तोडीचे सुंदर व हृदयस्पर्शी प्रबंध अन्यत्र क्वचितूच असतील. पुढील गौरी व शंभु यांचीं वर्णनें पहाः—

आवर्जिता किंचिदिव स्तनाभ्यां वासो वसाना तरुणार्करागम्।
पर्याप्तपुष्पस्तबकावनम्रा संचारिणी पल्लविनी लतेव॥ कु. ३–५४

दिसे किंचिन्नम्रा कुचकलशभारें नगसुता
जिला बालार्कांची वसनिं अति साजे अरुणता।
फुलांच्या गुच्छांनीं जशि भरुनि व्हावी लव नता,
गमे गौरी तैशी किसलययुता चालति लता! ॥ सु. ३–५४

किंवा,

हरस्तु किंचित्परिलुप्तधैर्यश्चन्द्रोदयारम्भ इवाम्बुराशिः।
उमामुखे बिम्बफलाधरोष्ठे व्यापारयामास विलोचनानि ॥ कु. ३–६७
विवृण्वती शैलसुतापि भावमङ्गैः स्फुरद्बालकदम्बकल्पैः।
साचीकृता चारुतरेण तस्थौ मुखेन पर्यस्तविलोचनेन ॥ कु. ३–६८

चळे शंभूचेंही पळ तरि तदा धैर्यबळ तें
पयोधीचें चंद्रोदयिं जळ जसें कीं उसळतें।
तिनींही तन्नेत्रें विहरति उमाचारुवदनीं
सुपक्का बिंबांची द्युति यदधरीं येत दिसुनी. ॥ सु. ३–६७

तनू रोमांचांनीं सकल गिरिजेचीहि फुलली
तिचीं अंगें त्यांनीं जणुं नवकदम्बेंचि तुललीं;।
अधोदृग् लज्जेनें अधिक तिरपें वक्त्र खुललें
तयें सारे तीचे हृदयरतिचे भाव कळले. ॥ सु. ३–६८

कालिदासाच्या अनन्यसाधारण वर्णनशैलीची व तिचें प्रतिबिंब रूपांतरांत उतरविण्याच्या माझ्याहि प्रयत्नाची कल्पना येण्यास एवढे उतारे पुरे होतील.

कालिदासाचें संविधानचातुर्य किती विलक्षण आहे याचें हा सर्ग एक उत्तम उदाहरण म्हणतां येईल. एवढा भयंकर क्षोभाचा, मदन-दाहाचा व सुरांच्या हाहाःकाराचा हा प्रसंग सर्गाच्या शेवटीं आणण्यापूर्वी, अशी शांत, सुंदर, वसंतवैभवानें नटलेली, अत्यंत आनंदमय व अतिशय आशादायक पार्श्वभूमी कालिदासानें रंगविली आहे कीं बस्, आतां सुरांचें इष्ट अगदीं साध्य झालेंच असें वाटावें! व आतां यांत विघ्न कशानें येणार व कोठून येणार असें वाटतें न वाटतें तोंच अकस्मात्

शंकरभालनेत्रांतील अग्नीच्या ज्वालेनें—कीं जी ज्वाला पूर्वी मोठी शोभादायक अशी वर्णिली आहे, तिनें-असा अनपेक्षित आकांत घडवून आणला कीं, देवांचें सर्व सुखस्वप्न निमिषार्धांत लुप्त झालें व श्रीशंकरहि गुप्त झाले! आराध्यदैवतच असें गुप्त झाल्यानें पार्वतीला काय झालें असेल! सख्यांच्या देखत हा प्रकार घडल्यानें तर तिला फारच लाज वाटली. प्रत्येक वस्तूच्या अंतरंगांत शिरून अत्यंत हळुवार हातानें ज्या वेळीं कालिदास सुंदर भाववर्णन करतो त्यावेळीं या कविकुलगुरूला किती धन्यवाद द्यावेत असें रसिकास होऊन जातें. त्यानें निर्मिलेलीं शब्दचित्रें वाचकाच्या मनश्चक्षूसमोर वर्ण्य वस्तु मूर्तिमंत उभी करतात आणि हेंच प्रतिभेचें श्रेष्ठ कार्य होय.

वर उद्‌धृत केलेल्या 'हरस्तु किंचित्परिलुप्तधैर्यः' (कु. ३–६७) या श्लोकांतील सहज साधल्या गेलेल्या शब्दालंकाराकडे वाचकांचें लक्ष मला वेधावयाचें आहे. 'हर-परि-धैर्य-चन्द्र-रम्भ-वाम्बु,-राशिः' तसेंच उत्तरार्धांत 'उमा-मुख बिम्ब धर व्यापा-रयामास विलोचनानि' यांत जी समानवर्णांची असकृत् पुनरुक्ति अकृत्रिम सौंदर्यानें निर्माण झाली आहे ती फारच मनोहर आहे. असे सहजासहजीं अव्याजमनोहर अलंकार कालिदासाची कविताकामिनी घालूं लागली म्हणजे फारच लावण्यवती दिसूं लागते. हे अनुप्रास प्रतिभावान् कवीच्या एकाग्र चित्तांत जणुं काय सरस्वतीच स्फुरविते व त्यासाठीं कवीच्या पदरीं मोठीच पुण्याई असावी लागते असें 'सरस्वतीकंठाभरण'कारानें

निवेशयति वाग्देवी प्रतिभानवतः कवेः।
पुण्यैरिममनुप्रासं ससमाधिनि चेतसि ॥ २–७३

या श्लोकांत म्हटलें आहे ते मुळींच अवास्तव नव्हे. हठाकृष्ट अनुप्रास निराळे व सहजनिर्मित वरीलप्रमाणें आढळणारे अनुप्रास निराळे. दोघांमधें गुणदृष्ट्या, मूल्यदृष्ट्या महदंतर आहे. कालिदासानें रघुवंशाच्या नवव्या सर्गांत यमकानुप्रासांची हौस कृत्रिमपणें थोडीशी भागवून घेतली आहे हें खरें. पण कालिदासोत्तरकालीन भारवि, माघ, बाणप्रभृति कवींची अतिरिक्त कृत्रिम शैली पाहिली म्हणजे कालिदासाच्या सहजविलासांची थोरवी कळून येते. कुमारसंभवांत तर कृत्रिम शब्दालंकाराची हौस रघुवंशा-

इतकीहि दिसून येत नाहीं. चहूंकडे वाग्देवतेच्या सहजरम्यतेचेंच साम्राज्य आहे. असो.

मदनाची अशी अकस्मात् रांगोळी झालेली पाहून रतीला प्रथम शोकमूर्च्छाच आली यांत नवल नाहीं! कवि म्हणतो, मूर्च्छेनें क्षणभर तिजवर उपकारच केला! कारण प्रियतमाच्या मृत्यूची तिला त्यांत स्मृति राहिली नाहीं. पण मूर्च्छा किती वेळ तिला मदत करणार? रति भानावर आली व कांताचें भस्म झालेलें पाहून तिनें जो शोक केला त्यानें तेथील सर्व स्थिरचर शोकरसांत बुडून गेलें! भर्त्याचे गुण व विलास तिला आठवूं लागले व ती पुनः पुनः शोकाकुल होऊन धाय मोकलून रडूं लागली. शेवटीं प्राणत्यागाचा निश्चय करून मदनमित्र जो वसंत त्यास चिता रचण्यासहि तिनें सांगितलें व आम्हां दोघांना और्ध्वदैहिक निवापांजलि देशील तेव्हां ती एकच दे, आम्ही स्वर्गांत ती एकत्र सेवन करूं वगैरे शेवटचें सांगणें ती सांगते, तोंच आकाशवाणी होऊन रतीला आपणांस विधिशापानें कसें वैधव्य आलें व तें केव्हां नष्ट होऊन आपला प्रियतम पुनः आपणांस केव्हां लाभेल वगैरे आकाशवाणीनें कळून ती आत्मत्यागापासून परावृत्त केली जाते. व शंकरपार्वतींच्या विवाहसमयाची उत्कंठेनें मार्गप्रतीक्षा करीत एकाद्या तपस्विनीप्रमाणें काल कंठते.

हा रतिविलाप व रघुवंशांतला अजविलाप हे दोनीहि अखिल वाङ्मयांत अप्रतिम आहेत. उपमा द्यावयाचीच झाली तर अजविलापास रतिविलापाची व रतिविलापास अजविलापाची अशीच द्यावी लागेल! दोनीहि वियोगिनीवृत्तांत घातलेले असून फारच करुणरम्य झाले आहेत. कालिदासानें हे दोनी वियोगजन्य विलाप या वृत्तांत घातल्यानेंच त्या वृत्तास वियोगिनी असें नांव दिलें गेलें असावें. वियोगिनीस सुंदरी असेंहि नांव असलें तरी आतां तें रूढ नाहीं. सुश्लोककुमारांत मुळांतल्या एका श्लोकाचा सर्व भावार्थ एकाच श्लोकांत आणण्याच्या माझ्या धोरणामुळें मलाच वियोगिनी वृत्ताचा वियोग सहन करावा लागला, व मालिनीचा*

---

* कारुण्यपोषकता मालिनीवृत्तांताहि कशी असते हें श्रीमद्भागवतांतील दशमस्कंधांत वियोगी गोपींच्या करुणरसमय उद्गारांवरून रसिकास आढळून

अंगीकार करून कालिदासाचा करुणरस जो पूर्वी वियोगिनींतून उतूं जात आहे तो किंचित् विस्तृत श्लोकपात्रांत सांठवावा लागला आहे ! मला कितपत यश लाभलें आहे तें रसिक तज्ज्ञ ठरवितीलच.+

---

( टीप मागील पृष्ठावरून पुढें चालू )

यईल. येथें उदाहरणादाखल एकच श्लोक दिला असतां पुरें होईल—गोपी मधुकरास संबोधून विलाप करते:—

सकृदधरसुधां स्वां मोहिनीं पाययित्वा
सुमनस इव सद्यस्तत्यजेऽस्मान्भवादृक् ।
परिचरति कथं तत्पादपद्मं तु पद्मा
ह्यपि बत हृतचेता उत्तमश्लोकजल्पैः ॥१३—अध्याय ४७

श्रीरामदासांचीं मालिनींतलि करुणाष्टकेंहि याची साक्ष देतील.

+ सुश्लोककुमारांतील रतिविलाप जेव्हां 'लोकशिक्षणां'त प्रसिद्ध झाला तेव्हां त्यावेळीं मला पत्रद्वाराहि अपरिचित असे एक रसिक कवि श्री. वि. ना. मराठे, ज्यांनीं 'किराता'च्या समश्लोकी रूपान्तराचें कार्य हातीं घेतलें आहे, त्यांनीं मुद्दाम पत्र (ता. ४–३–३९चें) पाठवून 'साहित्यचर्चा मुखरीकरोति माम् ।' असा प्रस्ताव करून माझ्या 'रतिविलापा'च्या यशस्वितेबद्दल धन्योद्गार लिहिले. ते कळवितात—" आपलें रचनाकौशल्य परमोच्च आहे यांत शंका नाहीं. मूळ काव्य वाचून जो आनंद होतो त्याच आनंदाची प्रचीति भाषांतर वाचतांना येते हेंच आपलें अनुपम यश आहे. कालिदास प्रासादिक तितकाच प्रतिकृतीस दुःसाध्य आहे. आपल्या यशाबद्दल मी पुनःपुनः आपलें अभिनंदन करितों आणि पुढील सर्गाची तितक्याच तीव्रतेनें प्रतीक्षा करितों. भाषांतर करण्याचे श्रम काय आहेत, अडचणी काय आहेत याची थोडीशी कल्पना मला आहे. तथापि शारदेकडून योग्य गौरव झाला कीं, 'क्लेशः फलेन हि पुनर्नवतां विधत्ते.' " या पत्रास मीं उत्तर लिहिल्यानंतर पुनः श्री. मराठे यांनीं ता. २४–३–३९ ला पत्रानें लिहिलें, " रतिविलाप असलेले अंक मीं पुनः मुळाशीं ताडून वाचिले. तो सगळा सर्ग खरोखरच उत्तम वठला आहे. मी त्याबद्दल पुनः पुनः आपलें अभिनंदन करतों...आपण वृत्ताच्या बाबतींत थोडेसें स्वातंत्र्य घेतलें आहे. त्या स्वातंत्र्यामुळें आपणांला वरच्या दर्जाचें यश मिळालें

रतिविलाप व अजविलाप यांवरूनहि रघुवंश व कुमारसंभव यांचें पौर्वापर्य ठरविण्यास एक साधन मिळतें आहे असा माझा तर्क आहे. रघुवंश हें आधींचें काव्य असून कालिदासानें ८ व्या सर्गास या वृत्तानें वर्णनास सुरवात केली. पहिल्या तेवीस श्लोकांत शोकवर्णन कोणतेंच नाहीं. पुढें श्लो. २४, २५ मध्यें रघूचें देहविसर्जन व पुढें ३७ पासून शेवटपर्यंत इंदुमतीच्या मृत्यूमुळें शोकरस आहे असें म्हणतां येईल. या वृत्तांत शोक-रस चांगला वठला असें वाटल्यावरून नंतर कुमारसंभवाच्या रतिविलापास याच वृत्ताची योजना त्यानें बुद्ध्या केली असावी. रघूच्या८ व्या सर्गातल्या आरंभींच्या सुमारें ३५ तरी श्लोकांत शोकरसास बिलकूल थारा नाहीं; उलट अजाच्या राज्यारोहणाचें व रघूच्या योगसाधनांतल्या प्रगतीचे उत्साही व आनंदी वृत्तीचेंच त्यांत वातावरण आलें आहे. कुमारसंभव जर आधीं झालेला असता तर त्या वृत्ताचा उपयोग अशा करुणेतर रसास त्यानें

---

( टीप मागील पृष्ठावरून पुढें चालू )

असें म्हणणें अंशतः सत्य होईल. स्वातंत्र्य घेऊन कां होईना पण इतकी उत्कृष्ट रचना फारच थोड्यांना करतां येईल. आणि यांतच आपलें वैशिष्ट्य आहे. पंचमहाकाव्यांचीं समश्लोक समवृत्त भाषांतरें व्हावींत अशी माझी तीव्र इच्छा आणि आपल्या प्रयत्नानें ती पुरी होण्याच्या मार्गास लागली आहे म्हणून मला फार समाधान व आनंद वाटतो.आपलें कार्य पाहून मला भारी भारी संतोष झाला. आपल्यास उत्तरोत्तर सुयश चिंतितों. रतिविलाप वाचून आपलें मी मनांतल्या मनांत शंभरदां तरी अभिनंदन केलें असेल. औपचारिकत्व नाहीं. वस्तुस्थिति आहे. आपणांला खासगी पत्र लिहून उगीच आपणांस तसदी देऊं नये असें वाटे खरें. परंतु बादशाही दरबारांत गाणें ऐकून शिक्षेची विस्मृति झाल्यानें रसिक उमरावांनीं नकळत वाहवा म्हटलें तसें माझें झालें. असो... —आ. मराठे."

अशींच अभिनंदनपत्रें कवि श्री. ग. रा. हवलदार—मराठी 'इलियड'कर्ते, श्री. आत्माराम रावजी देशपांडे ( कवि—अनिल ), कै. नानासाहेब फडणीस काव्यरत्नावलीकार, विद्याभूषण श्री. रंगाचार्य रड्डीशास्त्री प्रभृति रसिक विद्वानांनीं पाठवून मला प्रोत्साहन देऊन फार उपकृत केलें आहे. मी श्री. मराठेप्रभृति सर्वांचा आभारी आहें.

इतक्या विस्तृतपणें केला नसता. वास्तविक कोणत्याहि वृत्तांत कोणताहि इष्ट रस प्रतिभावान् कवि निर्माण करतात हें तर खरेंच आहे. क्षेमेंद्रानें सुवृत्ततिलकांत कांहीं कांहीं वृत्तें कुठें योजावींत याच्या नवकवीसाठीं सूचना चांगल्या दिल्या आहेत.

आर्ततेचे हृदयोद्गार या दृष्टीनें दोनीहि विलाप हृदयास भिडणारे झाले आहेत. फरक इतकाच कीं अजराजा इंदुमतीसाठीं, लोकलज्जेस्तवच बाईलवेडा म्हणून अपकीर्ति होईल या भीतीनें–देहत्याग करीत नाहीं. व लहान मुलगा थोडा मोठा होईपर्यंत आयुष्य कंठतो. पण रति ही सती जाण्यास अगदीं सिद्धच झालेली आहे. आकाशवाणी न होती तर तिनें खास अग्नींत प्राणसमर्पण केलेंच असतें. कालिदासाचा आशय हें ठसविण्याचा असावा कीं, प्रियजनाच्या मृत्यूनंतर देहत्याग करावासा वाटण्याइतकें जरी दुःख झालें तरी विवेकानें मन आवरून धरून ईश्वरेच्छेस मान देऊन धीरतेनेंच शक्य तों काल कंठावा. म्हणूनच अज व रति यांना अनुक्रमें वसिष्ठोपदेशानें व आकाशवाणीनें संदेश देऊन तो प्राणत्यागापासून परावृत्त करतो. मात्र शेवटीं अजानें देहत्याग केलाच व इंदुमतीसह तो स्वर्गांत मीलन पावला. पतिपत्नीप्रेमाचे आदर्शच रति व अज दर्शवितात.

शंकर गुप्त झाल्यानें विषण्ण झालेली पार्वती पुढें त्याचा लाभ करून घ्यावा या दृढ निश्चयानें मोठी तपस्या करते. त्याचें वर्णन पांचव्या सर्गांत असून तेंहि मोठें हृदयंगम झालें आहे. उघड्यांत तपस्या करीत असतां तिजवर जे पहिल्या पावसाचे नव बिंदु पडले ते तिच्या मुखावरून खालीं खालीं कसे अडखळत ओघळले तें कालिदास वर्णन करताना फार सूक्ष्मपणें पार्वतीचें शरीरसौष्ठव ध्वनित करतो. ( मल्लिनाथटीका ):—

स्थिताः क्षणं पक्ष्मसु ताडिताधराः पयोधरोत्सेधनिपातचूर्णिताः ।
वलीषु तस्याः स्खलिताः प्रपेदिरे चिरेण नाभिं प्रथमोदबिन्दवः ॥ ५–२४

राहोनि पांपणिवरी क्षण खालिं आले,
नीचौष्ठ ताडुनि बृहत्कुचिं चूर्ण झाले, ।
अब्बिन्दु ते नव अडोनि वलित्रयान्तीं
नाभ्यंतराप्रति तिच्या उशिरांचि येती. ॥ सु. ५–२४

पावसाचे पहिले थेंब प्रथम अडले ते तिच्या पांपण्यांवर. यावरून तिच्या पांपण्या सान्द्र केसांच्या होत्या; तेथें ते क्षणभरच थांबले यावरून त्या तुळतुळीत व स्निग्धहि होत्या. पाण्याच्या थेंबांच्याहि पडण्यानें अधरोष्ठास ताडन झालें यावरून अधराचें मार्दव दर्शविलें. स्तनांवर पडण्यानें बिंदु चूर्ण झाले, यावरून कुचकाठिन्य व्यक्त झालें; त्रिवलींत ते अडखळले यावरून त्या वळ्या खोल व उंचहि होत्या; शेवटीं नाभीच्या खोल भागांत ते शिरत यावरून नाभीची गभीरता व्यक्त केली गेली आहे. म्हणून या श्लोकांतील प्रत्येक पद साभिप्रायच योजिलें गेल्यानें हा श्लोक परिकरालंकाराचें उत्तम उदाहरण म्हणून साहित्यशास्त्रज्ञ उद्धृत करतात. प्रस्तुत श्लोकाच्या रूपांतरांतहि मुद्दाम जोडाक्षरांचे वगैरे आघातांनीं आपटणें, आघात होणें, अडखळणें व विलंब होणें इत्यादि क्रिया प्रतीत व्हाव्यात अशी योजना करण्याचें धोरण मूळ श्लोकाच्या अनुरोधानें मलाहि ठेवावें लागलें आहे. तें कितपत सिद्धीस गेलें आहे हें रसिकांनीं पहावें.

पार्वतीच्या भेटीस बटुवेषानें श्रीशंकर येतात व त्यानंतर जीं प्रश्नोत्तरें, संवाद झाले आहेत त्यांची हृदयंगमता किती म्हणून वर्णावी? विस्तारभयास्तव लेखणी आवरावी लागत आहे. ब्रह्मचारी, शंकराची निंदा करून, त्यास तूं वरूं नयेस असें पार्वतीस सांगतो; पण ती आपला निश्चय अढळ असल्याचें प्रतिपादन करून शंकराचें सर्व प्रकारें समर्थन करते. ब्रह्मचारी पुनः निंदा करण्यासाठीं कांहीं बोलणार असें दिसतांच पार्वती सखीस, त्याला थांबीव म्हणून सांगते. पण इतक्यांत, त्यापेक्षां येथून उठूनच जावें अशा इराद्यानें ती जाऊं लागते तोंच शंकर प्रकट होऊन तिचा हात धरतो व अद्भुत प्रकारें पार्वतीची तपस्या फलद्रूप होते. केवढ्या अडचणींतून मार्ग काढून शैलराजकन्येनें तपस्येनें इष्ट वर प्राप्ति करून घेतली हें सर्व कालिदासीय वर्णन वाचून वाचकांसहि जणुं काय परमेश्वरप्राप्ति झाल्यासारखा अवर्णनीय आनंद वाटल्याखेरीज रहात नाहीं! प्रत्येक श्लोकांतील शब्दचित्र अत्यंत औचित्यपूर्ण आहे. त्याचा परिपाक सुश्लोककुमारांतहि तितक्याच रसाळपणें उतरवितांना मलाहि पराकाष्ठेचा आनंद वाटला हें सहृदयांस सांगावेंसें वाटतें.

कुमारसंभवाच्या संविधानकांतील येथून पुढचा सर्व भाग सरळ निर्विघ्नपणें व सुसूत्रपणें घडून येतो. सहाव्या सर्गांत लग्नासाठीं उमेची मागणी करण्याकरितां शंकरांनीं सप्तर्षींना हिमालयाकडे पाठविल्याचें वगैरे वर्णन आहे. वर्णन साधेंच असलें तरी त्यांतहि पुष्कळच अर्थ भरला आहे. मुख्य म्हणजे पार्वती पित्याच्या अनुज्ञेनें विवाह व्हावा असें सखीकडून शंकरास कळविते. वडिलांच्या संमतीनेंच अशीं कार्यें व्हावींत असा आदर्श कालिदासानें येथें मांडलेला दिसतो. सप्तर्षींविषयीं शंकराचा व सप्तर्षींचा शंकराविषयीं आदर, अरुन्धतीसारखी (पतीस विरोध न करतां सत्कार्यांत सदैव साहाय्य करणारी) स्त्री पाहून आदर्श गृहस्थाश्रमाची कल्पना शंकरास प्रत्यक्ष येऊन वाटलेली विवाहोत्सुकता, ऋषि–शंकर यांचीं संभाषणें, विवाहकार्य जुळविण्याच्या कार्यीं अरुन्धतीसारख्या पुरंध्रींचें होणारें साह्य, सज्जनांशीं आलेले (कसलेहि) संबंध अयशस्कर कसे होत नाहींत त्याचें प्रतिपादन, हिमालयाच्या नगरीचें वर्णन, हिमालयाचा त्या मुनिमंडळींविषयीं अत्यादर व ते सांगतील तें कार्य करण्याविषयीं उत्सुकता, व उमेची मागणी शंकरासाठीं करण्यास ते आल्याचें कळतांच त्यास वाटलेली धन्यता, गिरिजेचे हातांतील लीलारविंदांशीं चाळे, व नंतर वाग्दत्त शंकरवधू या नात्यानें तिचें मुनींना वंदन, मेनेस वाटलेलें मुलीच्या भावी वियोगाचें दुःख व तिचें अरुन्धतीनें केलेलें समाधान वगैरे वगैरे सर्व विभाग, या साध्या वाटणाऱ्या सर्गांतहि नितांतरम्य आहेत. रघुवंशांत राजे लोकांचें वर्णन, तर कुमारसंभवांत गृहस्थाचें घरगुती संसारी वातावरण दाखवून दोन्हीहि महाकाव्यें एकमेकांस पूरक अशीं रचण्याचा कालिदासाचा आशय असावासें वाटतें.

प्रत्यक्ष विवाहाचा साग्र समारंभ सातव्या सर्गांत वर्णिला आहे. शंकराच्या वेषभूषेचें वर्णन करतांना कालिदासाची विनोदी शैली व कल्पकता, गजचर्म, नाग, भालनेत्र, भस्म इत्यादींचें त्यानें दर्शविलेलें रूपांतर फार मार्मिक आहे. वरास पाहण्यास उत्कंठित अशा नगरवासी स्त्रियांच्या हालचालींचीं वर्णनें मनोवेधक आहेत. हीं वर्णनें कृष्णबळरामांनीं कंस-वधापूर्वी मथुराप्रवेश केला त्या वेळच्या श्रीमद्भागवतान्तर्गत वर्णनाशीं

(दशम स्कंध अ. ४१ श्लो. २४-२९) फार सदृश वाटतात व त्याचेंच कालिदासानें अनुकरण केलें असावें. भागवतांतील ते रम्य श्लोक असेः—

तां संप्रविष्टौ वसुदेवनन्दनौ वृतौ वयस्यैर्नरदेववर्त्मना ।
द्रष्टुं समीयुस्त्वरिताः पुरस्त्रियो हर्म्याणि चैवारुरुहुर्नृपोत्सुकाः ॥२४॥
काश्चिद्विपर्यग्धृतवस्त्रभूषणा विस्मृत्य चैकं युगलेष्वथापराः ।
कृतैकपत्रश्रवणैकनूपुराः नाङ्क्त्वा द्वितीयं त्वपराश्च लोचनम् ॥२५॥
अश्नन्त्य एकास्तपदपास्य सोत्सवा अभ्यज्यमाना अकृतोपमज्जनाः ।
स्वपन्त्य उत्थाय निशम्य निःस्वनं प्रपाययन्त्योऽर्भमपोह्य मातरः ॥२६॥
मनांसि तासामरविन्दलोचनः प्रगल्भलीलाहसितावलोकैः ।
जहार मत्तद्विरदेन्द्रविक्रमो दृशां ददच्छ्रीरमणात्मनोत्सवम् ॥ २७ ॥
दृष्ट्वा मुहुः श्रुतमनुद्रुतचेतसस्तं तत्प्रेक्षणोत्स्मितसुधोक्षणलब्धमानाः ।
आनन्दमूर्तिमुपगुह्य दृशात्मलाभं हृष्यत्त्वचो जहुरनन्तमरिन्दमाधिम् ॥२८॥
प्रासादशिखरारूढाः प्रीत्युत्फुल्लमुखाम्बुजाः ।
अभ्यवर्षन्सौमनस्यैः प्रमदा बलकेशवौ ॥ २९ ॥

प्रत्यक्ष पाणिग्रहणविधि यथासांग होऊन लक्ष्मी त्यांवर कमलछत्र धरते व सरस्वती यथोचित त्याचें स्तवन करते. तिच्या भाषेंत वरासाठीं, प्रौढसरणि व वधूसाठीं सुगम, सरल भाषासरणि ती योजिते. मदनावर आतां अनुग्रह करावा अशी देव शंकरास प्रार्थना करतात व शंकर तथास्तु म्हणतात !

आठव्या सर्गांतील गौरीशंकरांच्या विलासवर्णनांविषयीं येथें विस्तारभयास्तव ज्यास्त कांहीं लिहीत नाहीं; त्यांत अप्रतिम सृष्टिसौंदर्याचीं वर्णनें फारच मार्मिक आहेत. संस्कृत वाङ्मयांत याच्या तोडीचीं वर्णनें अन्यत्र कोठेंच आढळणार नाहींत. सूर्यास्त, संध्या, तिमिर, रजनी, चंद्रोदय, ज्योत्स्ना यांचीं वर्णनें व त्यांत घातलेले कांहीं उद्बोधक अर्थान्तरन्यास वगैरे अलौकिक प्रतिभेचेच द्योतक आहेत. विलास करीत असतांनाहि संध्यावंदनादि विधि योग्य वेळीं पाळण्याची शंकर धर्माचारनिष्ठा दाखवितात. प्रियेला शंकराचा तेवढाहि वियोग जाणवतो. शंकर संध्या-वंदन करीत असतां तिला आपले प्राणनाथ दुसऱ्या कोणास वंदन करतात याबद्दल असूयाहि वाटते असें कवीनें स्त्रीस्वभावाचें उत्तम दिग्दर्शन केलें आहे. शंकर, नंतर संध्येचें

महत्त्व वर्णन करून प्रियतमेचा गैरसमज दूर करतात. अंधकाराचें वर्णन करतांना सर्व स्थिर–चर, गुणी–निर्गुणी, सरळ–वांकड्या साऱ्यांनाच तमो-राज्यांत अभिन्नतेनें कसें व्यास केलें जातें याचें मार्मिक वर्णन करून अशा दुष्ट साम्राज्याचा कवीनें धिःकार केला आहे. यावरून राजानें गुण व दोष नीट पाहून त्यांना अनुक्रमें यथायोग्य गौरव व शासन केलें पाहिजे हा भाव कवीनें व्यक्त केला आहे. चंद्रवर्णनांत—

अङ्गुलीभिरिव केशसञ्चयं
संनियम्य तिमिरं मरीचिभिः।
कुड्मलीकृतसरोजलोचनं
चुम्बतीव रजनीमुखं शशी॥ कु. ८–६३

करांगुलींनीं जणुं केशपाशा,
करीं धरोनी तिमिरासि तैशा,
निशामुखा चुंबि जणों शशांक
तैं नेत्रपद्में मिटलींत देख!॥ सु. ८–६३

या श्लोकांतील सौंदर्यानें कोण मोहित होणार नाहीं? अंधकाररूपी केशपाश हातीं धरून शशांक, प्रियतमा जी रजनी तिचें जणुं मुख चुंबीत आहे व ती त्या सुखानें पद्मरूपी लोचन जणुं मिटीत आहे! कविसम्राटाच्या या रम्य उत्प्रेक्षेचा आस्वाद आपणहि नेत्र मिटून रसिकतेनें मनांतल्या मनांत किती वेळ तरी घ्यावा असें न वाटेल तर तो सहृदयच नव्हे! अशा भव्य कल्पना प्रसवणारी प्रतिभा धन्य होय. असो. शिवपार्वतींच्या विहारांत त्यांचे दीडशें ऋतु एका रात्रीसारखे चटकन् संपले असें कवि वर्णन करून, प्रणयी युग्मास असा आनंदाचा काल कितीहि लोटला तरी पुरेसा होणें कधींच शक्य नाहीं हा स्वभाव दिग्दर्शित करतो.

या आठव्या सर्गांत जें सृष्टिसौंदर्यवर्णन आहे तें शंकरानें पार्वतीस दाखवितां दाखवितां वर्णन करून सांगितलें आहे. (श्लोकांक ३० ते ४८ व ५१ ते ७७) पतीनें प्रियतमेला असें सृष्टिसौंदर्य सविस्तर वर्णन करून सांगण्याच्या या प्रसंगाशीं तुलना करण्यास, रघुवंशाच्या १३व्या सर्गांतलें, लंकेहून पुष्पक विमानांतून अयोध्येकडे येतांना श्रीरामचंद्रांनीं

जानकीस वर्णन करून सांगिलेलें, रम्यतम वर्णन एकमेवच आहे, हें रसिकांस सांगावयास नकोच. कालिदास अशा सौंदर्यवर्णनाची औचित्यपूर्ण संधि कशी निर्मितो हें या दोनी प्रसंगांवरून दिसून येईल. 'जानकीहरण'कार कुमारदास यानें मात्र आपल्या महाकाव्याच्या ८ व्याच सर्गांत शृंगार व सृष्टिसौंदर्यवर्णनपद्धति या बाबतींत कुमारसंभवाचाच यशस्वी सुंदर अनुकार व तोहि रथोद्धता वृत्तांतच केला आहे. तसेंच त्यानें ४ थ्या सर्गांत कुमारसंभवाच्या ४ थ्या सर्गांतलें वियोगिनीवृत्तच योजिलें असून रस रामजन्माच्या अत्यानंदाचा आहे. येथें या वृत्तामुळें वैगुण्य मुळींच आलेलें नाहीं. म्हणूनच वाटतें कीं अशा वेळीं त्या वृत्तास वियोगिनी न म्हणतां 'सुंदरी' किंवा वैतालीय असेंच म्हणावें.

असो. प्रस्तुत निवेदन वा प्रस्तावना मी आतां आवरतों. माझ्या अल्पमतीस जसें सुचलें तसें येथें मी रसिकावलोकनार्थ मांडलें आहे. माझ्या कृतीनें रसिकांना उच्चतम सात्त्विक काव्यानंद व्हावा यासाठींच 'सुश्लोककुमार' मी त्यांचे हातीं देत आहें. त्याचें कौतुक 'सुश्लोकगोविंदा'प्रमाणेंच सर्व करतील यांत मला शंका नाहीं.

'सुश्लोककुमार'काव्याच्या या ग्रंथकार्यांत मला ज्यांनीं ज्यांनीं साहाय्य केलें त्यांचा मी अत्यंत ऋणी आहें. विशेषतः माझे मावसबंधु कविवर्य वे. शा. सं. विश्वनाथ शंकर कालेशास्त्री यांनीं माझें हस्तलिखित वाचून वेळोवेळीं हरएक बाबतींत सहृदयतेनें मार्मिक सूचना केल्या नसत्या तर आज हा ग्रंथ इतक्या हृदयंगम स्वरूपांत आलाच नसता.

श्रीमंत बाळासाहेब पंत प्रतिनिधि, बी. ए., अधिपति सं. औंध, यांनीं प्रस्तुत ग्रंथास सुंदर उपोद्घात परिचयात्मक लिहिला, या त्यांच्या थोर कृपेबद्दल मी श्रीमंतांना प्रणामपूर्वक अनंत धन्यवाद देतों. श्रीमंतांची गुणज्ञता, रसिकता, व औदार्यादि गुणसमुच्चयांचा लाभ महाराष्ट्रांतील वाङ्मयास व वाङ्मयसेवकांस अपरंपार झालेला आहेच. त्यांनीं मजविषयीं जी आस्था दाखविली तीच या कृतीच्या परिपूर्णतेला प्रेरक झाली आहे. उपोद्घातांत त्यांनीं मजविषयीं काढलेल्या थोर गौरवपर उद्गारांबद्दल मला फार अभिमान वाटतो. त्यांच्या कृपेबद्दल मी सदैव आभारी आहें.

विद्याभूषण पंडित श्री. रंगाचार्य रड्डीशास्त्री, ‘ कालिदास’कर्ते प्रो. वा. वि. मिराशी, साहित्याचार्य श्री. तात्यासाहेब केळकर, व विद्याभूषण पं. श्री. बाळाचार्य खुपेरकरशास्त्री या विद्वान् मंडळींकडे नुसत्या ‘ सुश्लोक-कुमारा’ची आगाऊ प्रत पाठविल्यावरून त्यांनीं जे अभिप्रायलेख मजकडे धाडले व मुक्तकंठानें प्रशंसा केली त्यांबद्दल मी या सर्व मंडळींचा अतिशय ऋणी आहें. माझे विद्वान् कविमित्र प्रो. गणपतराव हुपरीकर एम्. ए., बी. टी. ( कवि–विरागी ) यांनींहि हें काव्य रसिकतेनें वाचून चर्चा करून साहाय्य केलें याबद्दल त्यांचा व त्यांचे बंधु श्री. राजाभाऊ, बी. ए. बी. टी. यांचाहि आरंभापासूनच मी ऋणी आहें.

त्याचप्रमाणें माझी गुणशालिनी पुतणी चि. सौ. सुमतिदेवी नारळीकर, एम्. ए., व पुतणे चि. वसंत शंकर व चि. नारायण शंकर हुजूरबाजार, बी. ए. ( ऑ. ), तसेंच भगिनी ती. सौ. कृष्णाबाई, चि. सौ. वेणूताई व चि. श्री. गंगूताई या सर्वांनीं सुश्लोककुमार हस्तलिखितांत आनंदानें वाचून जी सहृदयता दाखविली तीबद्दल मला फार आनंद वाटतो. विशेषतः संस्कृतज्ञ व संस्कृतानभिज्ञ अशा उभयविध मंडळींना हा ग्रंथ कसा आवडेल या दृष्टीनें त्यांच्या मतानें मला फार मार्गदर्शन झालें. मी या सर्व स्वकीयांचा साभार निर्देश करतों. घरच्याच मंडळींचें प्रोत्साहन व सदभिरुचि हीच अशा प्रकारच्या वाङ्मयास ग्रंथकारास उपयोगी पडते.

मूळ संस्कृत कुमारसंभवानंतर प्रस्तुत ग्रंथांत शेवटीं श्रीशारदास्तव ही कविता मीं जोडली आहे. ‘ कविकल्पवल्ली ’ नामक एका काव्यविषयक अद्याप अप्रकाशित खंडकाव्यांत एक सत्कवि, अंतःकरणांत प्रतीयमान होणाऱ्या श्रीशारदेचें स्तवन करतो. तेंच येथें उतरून घेतलें आहे. हेंहि स्तवन ‘ लोकशिक्षण ’ मासिकांत दोन वर्षांमागें प्रसिद्ध झालें होतें. आदर्श काव्यवाणी कशी असावी याविषयीं विचार श्रीशारदेस वंदनपूर्वक या स्तोत्रांत ग्रथित केले आहेत.

सुश्लोककुमाराच्या रचनेंत मल्लिनाथादि अनेक मार्मिक टीकाकार व कालिदासविषयक विद्वान् ग्रंथकार यांच्या विचारांचा मला फारच उपयोग झालेला आहे. भाषांतरास पाठ मीं बहुधा मल्लिनाथानें घेतलेलेच स्वीका-

रले आहेत. शब्दशः भाषांतर नसलें तरी भावार्थग्राहि रसिकास हा सुश्लोक-कुमार उत्तम साहाय्यक होईल. मूळांतील प्रत्येक श्लोकास एक श्लोक अशा पद्धतीनेंच सर्व अनुवाद आहे. तो संख्यादृष्ट्या समश्लोकी अनुवाद आहे.

'सुश्लोककुमारां'त मला फारच अनुरूप व सुंदर अशीं चित्रें 'कल्याण' मासिकाच्या शिवांकांत छापलेलीं मागवून घेतां आलीं. आर्टिस्ट देवळालीकर यांचें चित्रकलानैपुण्य असामान्य आहे. चित्रांखालीं श्रीतुलसी-दासजींच्या सूक्ति असून वर 'सुश्लोककुमारां'तील अनुरूप श्लोक मीं इकडे छापवून घेतले आहेत.

पुस्तकाची सर्व छपाई वगैरे कार्य घाईंत उरकूनहि तें चांगलें पार पाडल्याबद्दल मी श्रीज्ञानेश्वर छापखान्याचे मालक श्री. सहस्रबुद्धे व व्यवस्थापक श्री. पोंक्षे व इतर सर्व मंडळी यांचा सानंद उल्लेख करतों.

शेवटीं, हें आरंभिलेलें ग्रंथकार्य उत्तमप्रकारें सिद्धीस नेल्याबद्दल व श्रीहरीनें 'सुश्लोकगोविंद,' व श्रीहरानें 'सुश्लोककुमार' असे ग्रंथ मज-कडून करवून माझी वाङ्मयसेवा रुजू करून घेतल्याबद्दल त्या श्रीहरि-हरांचें पदारविंद मी अत्यंत भक्तिभावानें वंदन करून, ही प्रस्तावना किंवा निवेदना संपूर्ण करितों.

श्री. हुजुरबाजार यांचा वाडा,
कोल्हापूर
ता. ४२ मार्च १९४०

रामचंद्र चिंतामण श्रीखंडे

# विद्वज्जनांनीं 'सुश्लोककुमारा'स पाहून त्यास आनंदानें दिलेले अभिप्रायालंकार

**साहित्याचार्य श्री. तात्यासाहेब केळकर** लिहितातः—

"कोल्हापूर शहरांतील एक प्रमुख साहित्यिक डॉ. श्रीखंडे यांनीं यापूर्वी बऱ्याच कविता लिहिल्या आहेत. पैकीं 'सुश्लोकगोविंद' हें फार गोड असून चांगलें प्रसिद्धीला आलें. हल्लीं त्यांनीं 'सुश्लोककुमार' या नांवाचें एक मराठी काव्य आठ सर्गांचें लिहिलें आहे. तें एका महाकाव्यावर म्हणजे कालिदासाच्या 'कुमारसंभवा'वर आधारलेलें असून 'सुश्लोकगोविंदा'-सारखेंच गोड व वाचनीय झालें आहे.

पुणें, ता. १४–३–४० —न. चिं. केळकर"

**विद्याभूषण पंडित श्री. बाळाचार्य माधवाचार्य खुपेरकरशास्त्री** हे लिहितातः—"मराठी वाचक हे संस्कृतभाषेंतील काव्यग्रंथांमध्यें भरून राहिलेल्या रसाच्या आस्वादाची अपेक्षा करीत असतात. ती त्यांची अपेक्षा थोडा वृत्तभेद झाला तरी तो करून पुरी करणें हेंच महाराष्ट्रकवींचें मुख्य कर्तव्य आहे. आणि तें तसें 'सुश्लोककुमार'कर्त्यांनीं चांगल्या प्रकारें पार पाडलें आहे याबद्दल ते खरोखरीच अभिनंदनास पात्र आहेत.

सातारा, ता. १७–३–४० —बा. मा. खुपेरकर"

**विद्याभूषण पंडित श्री. रंगाचार्य बाळकृष्णाचार्य रड्डीशास्त्री** लिहितातः—"रा. रा. रामचंद्र चिंतामण श्रीखंडे यांचें 'सुश्लोककुमार' हें पुस्तक विहंगम दृष्टीनें वाचून पाहिलें. 'कुमारसंभवा'च्या आठ सर्गांचें हें पद्यात्मक भाषांतर सुंदर झालें आहे. महाराष्ट्र वाङ्मयमंडळांत रा. श्रीखंडे यांचा अधिकार चांगला वरच्या दर्जाचा आहे हें त्यांच्या 'वाङ्मय-श्री-खण्ड', 'सुश्लोकगोविंद,' 'कुंदमालें'तील श्लोकांचें भाषांतर वगैरे कृति पाहिल्या म्हणजे कोणासहि कळून येईल. रा. श्रीखंडे यांची कविता निर्दोष असून रसोद्ग्राही असते.

संस्कृत वाङ्मयांतील कविसम्राट् कालिदास याची नितांत रमणीय कुमारसंभव ही कृति असून त्याचें मराठी रूपांतर करण्यास रसिक व वश्यवाक् रा. श्रीखंडे यांजसारखे विद्वान् लाभले हा खरोखरी रत्नकांचन संयोग मराठी भाषेस भूषणावह आहे. याचप्रमाणें उत्तमोत्तम संस्कृत कवींच्या कृतींचें रा. श्रीखंडे यांच्या हातून मराठीकरण होऊन मराठी वाचकांस संस्कृत कवींची व त्यांच्या कृतींची ओळख होवो अशी आम्ही सदिच्छा व्यक्त करितों. मराठी वाचकांकडून सुश्लोककुमाराचा योग्य परामर्श घेतला जावो असें आम्ही मनापासून इच्छितों.

ता. १७–३–१९४० }
सातारा. }

रंगाचार्य बाळकृष्णाचार्य रड्डी "

प्रो. **वासुदेव विष्णु मिराशी**, एम्.ए., नागपूर युनिव्हर्सिटीचे संस्कृत-शाखाध्यक्ष हे ता. १४-३-४०च्या पत्रानें कळवितात. " आपण पाठविलेलें सुश्लोककुमार ( आगाऊ प्रत ) पोचलें. आल्याबरोबर अधाशीपणानें त्याचा बराचसा भाग वाचून रसास्वाद घेतला. भाषांतर उत्कृष्ट साधलें आहे. कालिदासाच्या अर्थान्तरन्यासाच्या संस्कृत ओळीप्रमाणें आपलेंहि भाषांतर गुणगुणावें असें वाटतें इतकें तें सुंदर वठलें आहे. पुस्तकांतील चित्रेंहि सुंदर आहेत. आपल्या पुस्तकानें कविकुलगुरूच्या कृतीची ओळख महाराष्ट्रवाचकांस उत्कृष्ट रीतीनें होईल यांत शंका नाहीं. पुस्तक पाठविल्याबद्दल धन्यवाद देतों. —वा. वि. मिराशी "

# सुश्लोककुमार

अनुक्रम
नों. दि.
दा. क्र.

॥ श्रीगौरीशंकराभ्यां नमः ॥

# सुश्लोककुमार

अर्थात्

# महाराष्ट्र कुमारसंभव

## सर्ग पहिला

[ श्लोक १ ते १७ हिमालयवर्णन, १८–१९ मेना-हिमालयविवाह, २० त्यांस मैनाक नामक पुत्र, २१-२२ मेनेच्या उदरीं दाक्षायणीचा पार्वतीरूपानें पुनर्जन्म, २३–३० जन्मोत्सव, पार्वतीचें बाल्य व विद्यार्जन, ३१–४९ तिचें तारुण्यसौंदर्यवर्णन, ५० हिमालयास नारदाची भेट, ५१ ५२ हिमालयाचें कन्येच्या वरसंशोधनविषयीं धोरण, ५३–५४ श्रीशंकराची वैराग्यवृत्ति व हिमालयाच्या शिखरावर तपश्चर्या, ५५ शिवगणवर्णन, ५६ नंदिवर्णन, ५७ श्रीशंकराच्या तपाचें ध्येय, ५८ हिमालय स्वकन्येस शंकरसेवेला लावतो, ५९ शंकराची तिच्या सेवेला अनुज्ञा, ६० ईशसेवावर्णन. ]

( शार्दूलविक्रीडित )

आख्या सार्थ जया हिमालय अशी, अद्रीश जो तत्त्वतां
शोभे उत्तर दिग्विभागिं, वसती ज्याच्यावरी देवता
स्पर्शी पूर्वपयोधिवारिसि तसें जो पश्चिमांभोधिला
जो कीं विस्तृत मानदंड पृथिवी मापावया शोधिला ! १

ज्यातें वत्स करोनि सर्व गिरिंनीं पृथ्वी असे दोहिली
त्या कार्यी बहु दक्ष गोपसम तो मेरू दुही ती भली
सांगे दोहनकार्य सर्व पृथु कीं, जो मार्ग दावोनियां
रत्नें दिव्य, महौषधीहि बरव्या, हें दुग्ध लाभे तयां. २

रत्नें जेथ असंख्य जन्मति अशा त्या अद्रिराजावरी
आहेही हिम तें न हानि मुळिं ये शोभेसि त्याच्या परी
एकादें, गुणराशि नांदति तिथें लोपेचि दोषस्थल
जैसें कीं लपतें सुधांशुकिरणीं तें लांछनाचें मल. ३

ज्याच्या तुंग, विशाल, रम्य शिखरीं सिंदूरहेमादि ते
धातू साजति ज्यांमुळें घन तिथें दावी सदा रंजितें;
संध्याकाल जणों अकालिं विलसे जो भूलवी अप्सरा
त्याही मोहुनि भूषणें समुचितें लेती करोनि त्वरा ! ४

ज्याच्या प्रांततटावरी विहरती त्या नित्य मेघावली
ज्यांच्या खालतिं येति सिद्धगणही सेवावया सांवली
तेथें त्रास तयांसि देति जरि का पर्जन्यधारा तरी
ते जाती शिखरावरी उनिं पुन्हां ज्या अद्रिच्या सत्वरीं ! ५

जेथें सिंह वधोनियां करिगणां संचारणारे असे
ज्यांचे रक्तठसे जल स्त्रवुनियां झाले जरी नाहिंसे
त्यांच्या तेथ नखांतुनी विखुरलीं तेजाळ मुक्ताफळें
सिंहांचा पथ मोतिं तीं निरखितां, जेथें किरातां कळे. ६

धातूंचे रस हीच शाइ करुनी आरक्त वर्णाक्षरीं
जें विद्याधरसुंदरीजन लिही भूर्जत्वचेच्या वरी
रंगें कुंजरबिंदुशींच* दिसतीं जीं लाल, वर्णाकुलें
कामप्रीति लिहावयास हृदिंची येतीं जिथें वल्कलें. ७

जेथें वायु दरीमुखांतुनि निघे, वंशांतरीं संचरे
रंध्रांतूनि तिथें नितान्त मधुरालापा करी तो स्वरें
भासे साथचि जो जणों करि खरी सुश्राव्य गानासवें
जे गाती मधुरस्वनें गिरिवरी त्या किन्नरांचे थवे ८

* मध्यमवयस्क हत्तींच्या अंगावर लालसर ठिपके दिसतात त्याप्रमाणें.

ज्या अद्रीवरतीं कपोलतटिंची कंडू शमाया करी
त्यातें घांसति देवदारुतरुच्या स्कंधप्रदेशांवरी
तेथोनि स्रव पावतात सुरभी ज्या क्षीरधारावली
त्यांचा गंध भरोनि सर्व शिखरां गंधाढ्यता पावली. ९

रात्रौ जेथ किरात, तेविं रमणी त्यांच्या, गुहाभ्यंतरीं
मोदें रंगति कामकेलिसुरतीं ज्यांचीं गृहें त्या दरी
त्यांमाजीं सुरतप्रदीपचि अशा दिव्यौषधी शोभती
जाणों दीपचि तेवती सदनिं ते तैलाविना ज्यां द्युति ! १०

ज्या उत्तुंग महीधरावरि हिमें गोठोनि जाती जरी
तैशा मार्गिंहि अंगना विचरती त्या किन्नरी सुंदरी
त्यांचीं पादतलें तदा हिमतमें स्पर्शें जरी त्रासती
त्यांना श्रोणिपयोधरें अतिभरें सोडी न मंदा गति ! ११

सूर्यातें दिवसां भिऊनि जवळीं आल्या तमाला गिरि
रक्षी देउनि आसरा निजगुहामाझारिं जो सत्वरीं
आला कोणिहि आपणा शरण कीं, हो कां जरी क्षुद्र तो
त्यातें मानुनि आपलाचि बहुधा जो थोर तो रक्षितो. १२

जेथींच्या चमरी मृगी शशिकरस्वच्छें स्वपुच्छें वनीं
डौलें हालवुनी तिथें पसरिती शोभा मनोमोहिनी
वाटे कीं 'गिरिराज' थोर पदवी द्याया तिला सार्थता
तीं हीं ढाळिति चामरेंचि हरिणी तन्मस्तकीं तत्त्वतां ! १३

जेथें किन्नरयोषिता तनुवरी लेतात जीं अंशुकें
होतां भ्रष्ट, विवस्त्रता उपजवी तच्चित्तिं लज्जा निकें,
येई जी परि अंबुदावलि गुहासद्मांपुढें त्यांचिया
होई ती सहजींच कीं जवनिका लज्जेसि रक्षावया ! १४

आणी वाहुनि जो तुषार हिमसे भागीरथीपासुनी
ज्यांयोगें बहु कंप पावति तरू ते देवदारू वनीं,
वेगें मोरपिसें विभिन्न करि जो ऐसा जिथें मारुत
जे कां व्याध मृगार्थ हिंडति तिथें ते, त्यांप्रती सेवित. १५

ज्याच्या तुंग शिरःप्रदेशिं सर जें साजे तयाआंतलीं
जीं सप्तर्षि खुडोनि नेति कमलें त्यांतूनि जीं राहिलीं
त्यांतें ऊर्ध्वमुखीं स्वकीय किरणीं आणी रवी फुल्लता
जो आकाशिं फिरे परंतु गिरिच्या शीर्षांहुनी खालता! १६

यज्ञां लागत जें समग्र निपजे साहित्य ज्याच्यावरी,
भूचेंही करण्यास धारण असे सामर्थ्य ज्याअंतरीं,
ज्यातें ये विधियुक्त भागहि पृथग् यज्ञामधें सर्वदा,
ब्रह्म्यानें दिधलें बघोनि इतुकें अद्रीशतेच्या पदा. १७

मेरूचा प्रिय मित्र जो नगपती धर्मज्ञ जो चांगला
रक्षाया निजवंश लग्न करिता मेनेसवें जाहला
मेना ही पितृनिर्मिता* गुणवती कन्या असे मानसी
मान्या जी मुनिनांहि, योग्यहि तया रूपागुणांहीं तसी. १८

त्यांची सुंदरता अलौकिक तशी अत्यंत रम्या रति
जी त्या सुंदरतेस साजत जणूं ऐशापरी दंपती
कांहीं काल विलासभोगिं रमतां ती यौवनाढ्या सती
झाली गर्भवती गिरींद्रदयिता जीच्या न भाग्या मिति. १९

झाला पुत्र तियेसि, नाम विलसे मैनाक ऐसें जया,
ज्याचें सख्य असे महोदधिसवें, ज्या नागकन्या प्रिया,
वज्रानें जरि पक्ष तोडि हरि† तो साऱ्या गिरींचे तरी
क्रुद्धें वज्रधरें नसे दुखविलें ज्यातें कधीं अंतरीं २०

---

* अग्निष्वात्त व बर्हिषद नामक पितरांपासून स्वधानामक पत्नीच्या ठायीं झालेली मानस कन्या, † इंद्र.

दक्षाची दुहिता सती, हर जिचा हो पूर्वकालीं पति,
भर्त्याचा अपमान आत्मजनकें केला तयें क्रुद्ध ती,
यज्ञीं देह करी विसर्जन सती योगप्रभावें, तदा
मेनेच्या उदरीं पुनर्जनुमिषें गर्भांत येई मुदा. २१

जी साध्वी नियमां सदा बहुपरी होती भली रक्षित,
कन्या ती सृजिली नगाधिपतिनें धन्या तिच्या कुक्षित;
जैसी उत्तम वर्तनें बहुविधा संभाळिली नीति जी,
कीं उत्साहगुणें तियेंत सृजिली संपत्ति ती काय जी! २२

झाल्या सर्व दिशा प्रसन्न बरव्या, त्या वेळिं चोहींकडे,
वाहे निर्मळ गंधवाह; झडले नाकींहि तैं चौघडे
झाले शंखनिनाद, वर्षति सुमें ऐशापरी तो दिन
होई सर्व चराचरांप्रति खरा आनंदसंवर्धन. २३

ती मेना निज अंकिं घे स्वतनया अत्यंत तेजस्विनी
तैं शोभे जननी, तयांस उपमा द्याया अशी ये मनीं
होतां कीं नवमेघशब्द गगनीं भूमी विदूराद्रिची
शोभावी जशि कीं स्वयें उगवल्या रत्नांकुरांच्या खचीं! २४

चंद्राची सुकुमार कोर गगनीं वाढे दिसंदीस ती,
तेजाच्या सकला कला अनुदिनीं आल्या तिथें दीसती,
तैसी ही तनया नगाधिपतिची आधींच जी चांगली
वाढों लागलि तैं क्रमें अवयवीं कांती चढों लागली. २५

सारा प्रेमळ बंधुवर्ग कुतुकें हर्षें तसें आदरें
बाहे तीप्रति 'पार्वती' म्हणुनियां जें नाम वंशें खरें
मातेनें 'तप गे! नको करूं!' 'उ मा§' या शब्दिं जैं वारिली
तैं तीतें पदवी 'उमा' अशि भली मागाहुनी लाभली! २६

---

§ 'अगे! नको!'

होतीं त्या गिरिराजयास वरवीं नाना अपत्यें जरी,
त्याची दृष्टि रमे विशेषचि परी श्रीपार्वतीच्यावरी;
जैसा कीं विलसे असंख्य सुमनीं राणा ऋतूंचा, परी
भृंगाली रमते अतीवचि मुदें आम्राचिया मोहरीं. २७

नंदादीप जसा महोज्ज्वल अशा ज्योतीचिया कारणें,
स्वर्गाचा पथ कीं जसा त्रिपथगा देवीचिया धारणें,
जैसा सन्मुनि शुद्ध उत्तम अशा वाणीगुणें निर्मळें,
झाला तो परिपूत भूषित तसा सत्कन्यकेच्यामुळें. २८

गंगेच्या पुलिनीं रचोनि चिमण्या वेदी किती वाळुनें,
चेंडू घेउनि त्यापरीं किति तरी रंगांत तें खेळणें,
तैशा सुंदर बाहुल्या बनवुनी नानापरी रंगित
ती बाल्यीं अपुल्या सख्यांसह जणों क्रीडारसा सेवित ! २९

हंसश्रेणि जशा शरत्समयिं कीं येतात गंगेकडे,
ज्योतिर्निर्मिति वा महौषधिमधीं रात्रौ जशी कीं घडे,
तैशा प्राक्तनजन्मि सर्व शिकल्या विद्या कला निर्मला
आतां बुद्धिमतीस त्या शिकवितां तत्काल आल्या तिला. ३०

जें स्वाभाविकसेंच मंडन जणों साजे शरीरावरी,
नोहे मद्य, परी मदान्वित करी जें पावतां अंतरीं,
कामाचें जणु होय अस्त्रचि खरें पुष्पाहुनी वेगळें
तें ती पावलि यौवनाख्य वय जें बालत्व जें मावळे. ३१

व्हावें व्यक्त जसें सुचित्र भरते जें तूलिका रंग ते,
किंवा पद्म विकास भानुकिरणीं जैशापरी पावतें,
गौरीचें वपु तेविं यावन जसें सेवूं तया लागलें,
सौंदर्यें परिपूर्ण होउनि दिसे अत्यंत तें चांगलें. ३२

तेजस्वी अरुणद्युती पदनखें तीतें किती साजती,
  चाले जैं युवती तदा गमत कीं फेकी गुलालास ती!
पादक्षेप तिचे विलासमय ते देखोनि होई मती
  अंभोजें अवनीवरीलचि जणों साक्षात् तिथें चालती. ३३

ती गौरी स्तनभारनम्रललना टाकी विलासें पदें,
  देती कीं तिज राजहंसचि कला चालावयाची मुदें,
त्यांचा हेतु, तिच्याःकडूनि शिकुनी घ्यावेत संपादुनी
  देवोनि स्वगती तिला, मधुरसे तन्नूपुरांचे ध्वनी! ३४

जंघा मंगल सप्रमाण सुभगा श्रीपार्वतीच्या जधीं
  निर्मी तैं निज सृष्टिकौशल तिथें सारेंचि सारी विधि!
शेषांगा रचितां तिच्या, कुठुनियां लावण्य आणूं तरी?
  शंका यापरि हो! असेल शिवली धात्याच्चिया अंतरीं! ३५

शुंडा सुंदर शोभती करिवरां ना त्यां परी मार्दव,
  रंभाही उपमेसि येति परि त्या दुःस्पर्श शैत्यास्तव,
दोघांनाहि असो विशालपण तें ऊरुद्वयाशीं परी
  वैगुण्यें अपुल्या न पावति तुला गौरीचिया ते खरी! ३६

कांचीधारि नितंबबिंब विलसे त्या शोभनेचें किती,
  याची केवळ कल्पनाच रसिकें कीजे स्वकीये मतीं,
जेथें कोणहि अन्य धन्य युवती ना लाभली स्थान तें
  शंभूनें निज अंक ज्याप्रति दिलें बैसावया मागुतें! ३७

जी कीं गोल सखोल नाभिविवरीं तन्वीचशी धांवली,
  ती शोभा बहु पावली अभिनव श्यामा सुरोमावली
जाणों नीलमणी सुकांत रमणीकांचीमधें जो वसे
  त्याची नीलविभाचि काय उदिता व्हावी, तशी ती दिसे. ३८

बालेच्या तनुमध्यभागिं तनुता सौंदर्यसारान्विता,
ज्यामध्यें त्रिवली विराजत असे भासेचि जी पाहतां
कीं सोपानपरंपरा विरचिली तेथें नव्या यौवनें,
सम्राट् काम चढोनि येउं सहजीं ऐशा जणों हेतुनें ! ३९

पद्माक्षीहृदिं हेमकुंभचि जुळे वक्षोज कृष्णानन
अन्योन्या बिलगावयास सजले पावोनि संवर्धन
ऐसें कीं, उभयांतरीं जरि कुठें ठेवावया पाहिलें
एकादेंचि मृणालसूत्रहि तरी त्या स्थान ना राहिलें ! ४०

गौरीचे भुज ते सुकोमल असे कीं ज्यांसवें तोलतां
मातें भासतसे शिरीषसुमही न्यूनत्व पावे स्वतां
जे कंठीं गिरिशाचिया वसविले प्रत्यक्ष कीं पाशसे
कामें पावुनिही पराजय पुढें, विख्यात त्या साहसें ! ४१

वक्षोजोपरि कंठ सुंदर तिचा शोभे जयाभोंवतीं
मुक्ताहारहि वर्तुलाकृति दिसे शोभे न ज्याच्या मिति;
हारातें बहु कंठ भूषवि तसा कंठासही हार तो,
अन्योन्यांतरिं भूष्यभूषणपणा कीं तुल्य संचारतो. ४२

चंद्रा सेवित तेधवां मुकतसे पद्माश्रिता वैभवा,
पद्मातें भजते, मुके शशिचिया कांतिप्रती तेधवां;
लक्ष्मी चंचल नैककालिं धरि ती पद्मेन्दुशोभाद्वय
गौरीच्या मुखिं दोंहि पावलि परी ती लाभतां आश्रय ४३

श्वेताब्जा अरुणच्छटीं किसलयीं संस्थापियेलें जरी
किंवा मौक्तिक ठेविलें जरि तसें सद्विद्रुमाचे वरी
शोभा येइल कांहिं त्यापरि तरी गौरीमुखींच्या स्मिता
जैं तीच्या अरुणौष्ठभागिं पसरी तें आपुली शुभ्रता. ४४

माधुर्यें नटल्या स्वरें वदतसे ती जेधवां बालिका
वाटावें जणुं वर्षते श्रुतिपुटीं पीयूषधाराचि का !
तेव्हां कोकिळशब्दही न रुचती श्रोत्यासि ऐकावया
जैशी विस्वर वाजतां न गमते कोणाहि वीणा प्रिया. ४५

वाऱ्याच्या लहरींसवें हलति कीं नीलांबुजें ज्यापरी
तैशीं शोभति लोचनें चकितशीं दीर्घेक्षणेचीं खरीं;
वाटे ती शिकली सुरम्य बघणें तैसें मृगींपासुनी
किंवा त्या हरिणांगनाच शिकल्या तैसें तिचें पाहुनी ! ४६

ज्या दीर्घा जणुं रेखिल्याचि गमती कोणी शलाकांजनीं
ज्यांची कांति अवर्णनीय गिरिजाभ्रूवल्लि त्या मोहिनी
कामें पाहुनियां नितांतचतुरा त्यांच्या विलासांप्रति
टाकोनी निजचापसौष्ठवमदा केली जणों तत्स्तुति ! ४७

तिर्यग्योनिमनामधें असति का लज्जा जराही जरी
गौरीचा कचपाश सुंदर तसा पाहोनियां अंतरीं
होत्या त्या चमरी सलज्जचि खऱ्या, देत्याचि त्या सोडुनी
केशांची निज आवडी बहु वसे जी नित्य त्यांच्या मनीं. ४८

साऱ्याही उपमानवस्तु उचिता ज्या ज्या प्रदेशांप्रति
त्या त्यांच्या स्थलिं ठेवुनी विधि करी निर्माण ती पार्वती
ब्रह्याच्या हृदिं हाच आशय तदा वाटे असावा जणूं
कीं आणूं रमणीय सर्व भुवनीं येथें, श्रमा ना गणूं ! ४९

त्रैलोक्यीं फिरतां यथारुचि कदाकालीं नगेन्द्राकडे
आलासे मुनिवर्य नारद, तदा दृष्टीस त्याच्या पडे
बापासन्निध बालिका बघुनि ती बोले मुनी भारती—
'दारा एकटि होउनी हरिल ही प्रेमें हरार्धांप्रति !' ५०

चित्तीं वागवुनी मुनींन्द्रवच तें कीं शंभु गौरीपति
कन्येला वर अन्य पाहि न पिता झाली जरी थोर ती
यज्ञीं ब्राह्मणमंत्रपूत असली आज्यादि पुण्याहुति
वह्नीवांचुनि योग्य तेज कुठचें सेवावया तीप्रति ? ५१

ना घाली जंवरी गिरीश नवरी व्हाया तिला मागणें
शंभूतें तंवरी न त्या नगवरीं केलें स्वयें सांगणें
जाणोनी विफलत्व येइल कदा कोणासही मागतां
प्रार्थी इष्टहि अर्थ साधु न कुणा, सेवी उदासीनता. ५२

प्राग्जन्मीं स्वपित्यावरील विपुलें रोषें सती पार्वती
स्वप्राणां त्यजि अर्पुनी हुतवहीं दाक्षायणी देह ती,
तेव्हांपासुनि शंकरें वरियली वैराग्यवृत्ती खरी
अन्या कोणहि मुक्तसंग न वरी भूतेश तो त्यावरीं. ५३

अंगीं लेउनि हस्तिचर्म, हृदयीं संस्थापुनी संयम
राहोनी गिरिराजगह्वरिं करी शंभू तपा उत्तम;
त्या पुण्यस्थलिं देवदारु नटती गंगातुषारांबुंनीं,
गाती किंनर, कस्तुरीमृग भरी सद्गंध संचारुनी. ५४

शंभूचे गण, लेति जे तनुवरी रुद्राक्षभूषावली
झालीं प्रावरणें जयां मउमऊ भूर्जत्वचांचीं भलीं
जे घेती मनशीळ रंग बहुधा लेपूनि अंगाप्रती
शैलेयीं* भरल्या शिलातलिं तिथें ते तेधवां बैसती. ५५

नंदी गर्जत त्या स्थलीं फिरतसे, ज्या गर्जतां ऐकुनी
चित्तीं धाकति सिंहही न सहुनी गंभीर चंडध्वनि
हाणोनि स्वखुरा खणी हिमशिला, भासे मदोन्मत्तसा,
ज्यातें पाहति भीत भीत गवये§ मानोनियां साहसा ! ५६

* शैलेय = दगडफूल. § वनगाईच्या जातींतील नर.

तेथें स्वीयचि अग्निनामक तनू अष्टस्वरूपांतली
स्थापी शंकर अष्टमूर्ति, समिधा योजूनि जी निर्मिली;
देणारा इतरां तपःफल अशी आख्या जयाची खरी
तो त्या सानुवरी कशास्तव तरी शंभू तपा आचरी ! ५७

जो देवांसहि पूजनीयचि खरा, अर्घ्या न ज्याच्या मिति,
त्या शंभूप्रति अर्घ्यदान करुनी पूजी गिरींचा पति
"ईशाराधन गे ! करीं मम मुली ! दोघी सखींसंगतीं"
ऐसें सांगुनियां तयें स्वतनया योजीयली दक्ष ती. ५८

( पृथ्वी )

समाधिमधिं विघ्नशी जरिहि होय ती सुंदरी
तरी तिज दिली हरें अनुमति स्वसेवे बरी
मना विवशकारिणी विषयमूर्ति; ती सन्निधीं
असूनहि न होति जे विवश, तेच्चि कीं धीर-धि. ५९

( शिखरिणी )

फुलें गौरी आणी तशिच कुश, पाणी, ऋजुमति
स्वयें वेदी ठेवी विमलतम देवी जपुनि ती,
हरा लागे जें जें नियमविधिपूजेसि करि तें,
तिच्या खेदा भारी हरशशि निवारीत पुरतें ! ६०

'उमोत्पत्ति' नामक प्रथम सर्ग

समाप्त

अनुक्रमांक
क्रमांक
नों.

# सर्ग दुसरा

[ श्लोक १-२ तारकासुरानें पीडिलेले देव ब्रह्मलोकीं जाऊन ब्रह्मदेवास भेटतात, ३-१५ देवकृत ब्रह्मस्तुति, १६-२८ ब्रह्मदेवाचें भाषण, २९-५२ इंद्रप्रेरणेनें बृहस्पति देवांचीं गाऱ्हाणीं ( तारकनिर्मित संकटें ) सांगून देवांना पराक्रमी सेनानी हवा असें प्रार्थितो, ५२-६२ ' शिवपार्वतीविवाह घडवून आणाल तर त्यांचा पुत्र तुमचा यशस्वी सेनानी होईल ' असें ब्रह्मदेव देवांना आश्वासन देऊन अंतर्धान पावतो व देव स्वर्गलोकीं येतात. ६३-६४ मदनाचें साहाय्य या कामीं होईल असें कल्पून इंद्र मदनाचें स्मरण करतो तेव्हां तत्काल वसंतासह मदन इंद्रासमोर येतो. ]

( रथोद्धता )

त्याच कालिं सुर फार पीडिले
तारकें असुरनायकें बळें
देउनी प्रमुखता शचीवरा
येति लोकिं विधिच्या बहुत्वरां. १

म्लानकांति-वदनां दिवौकसां
तैं विधि प्रकट जाहला कसा ?
काय सुप्तकमलां सरोवरां
भेटला रवि सकाळिं हो ! खरा २

सर्व सृष्टि रचणार जो विधि
सर्वतोवदन जो अनंतधि
वागधीश्वर तया नमूनियां
ते स्तवीति वचनीं यथार्थ याः— ३

“ भो नमोऽस्तु भगवन् प्रभो ! तुला;
सृष्टिआधिं असतोसि एकला
सेवुनि त्रिगुण ते पृथक् पण
तूं त्रिमूर्ति मग होसि आपण. ४

त्वां अमोघ निजबीज तें जलीं
सिंचुनी सकल सृष्टि निर्मिली;
हे अजा ! उगम तूं चराचरां
ऐशि कीर्ति तव गाति, ईश्वरा ! ५

शंभुविष्णुविधिरूपिं या तिनीं
तूं स्वकीय महिमान दावुनी
एक होसि परि हेतु या जगा
नाशसंस्थितिविनिर्मितीसि, गा ! ६

स्त्री–पुमान् अंशिहि भिन्नभागता
सृष्टिकारणिं धरीसि तूं स्वतां
योनिसंभव जगा प्रसू पिता
ते द्विभाग तव होति तत्त्वतां. ७

स्वप्रमाणिं दिनयामिनी तव
ईश्वरा! असति त्या तुझ्यास्तव
स्वप्नजागृति तुझ्या जगाप्रति
होति कीं प्रलय आणि निर्मिति. ८

तूं अयोनिहि जगासि योनि रे !
तूं अनन्त जगदन्त हें खरें
तूं अनादि जगतासि कारण
तूं स्वतंत्र, जगता नियंत्रण. ९

जाणतोसि निजरूप आपण
    आत्मनिर्मितिसि तूंचि कारण
तूं समर्थ, तव शक्ति हो असी
    आपणांमधिंच लीन पावसी. १०

तूं द्रवात्म, कठिनात्मही तसा,
    स्थूल, सूक्ष्महि, महान्, लहानसा,
कार्य कारणहि तूंचि, ही असी
    त्वद्विभूतिगणना घडे कसी ? ११

ज्यांसि सप्रणव हो उपक्रम
    गाति ज्यां त्रिनियमांत[‡] उत्तम
कर्म यज्ञ, फल नाक, हो जयां
    आदि त्या श्रुतिंसि तूंचि, व्हावया. १२

मानिती ' प्रकृति ' तूंचि, यद्विना
    न प्रवृत्ति पुरुषार्थसाधना
निष्क्रियत्व वरुनी विलोकिसी
    वानिती ' पुरुष 'नामिं ते तुसी. १३

तर्पणीय पितरांसि तूं पिता,
    देवतांसि यजनीय देवता,
तूं पराहुनिहि ऐसशी पर
    जो प्रजापतिहि निर्मि ईश्वर. १४

होतृहव्य उभयेंहि होउन
    भोक्तृभोज्यहि तसा सनातन
वेदितव्यहि, तसाच वेदिता
    चिंतनीय पर होसि चिंतिता. " १५

---

‡ वेदांतील ३ स्वरप्रकार–उदात्त, अनुदात्त व स्वरित.

यापरि स्तुति यथार्थ त्यांचिया
स्वीकरोनि हृदयंगमा प्रिया
सुप्रसन्न मनिं जाहला दिसे
बोलला विधि सुरांसि त्या असें– १६

त्या पुराणकविच्या मुखांतुनी
भारती प्रकट चारि होउनी
वाटली जणुं यथार्थ उक्ति ती
कीं चतुर्विध असे सरस्वती. १७

“ देव हो! न अधिकार आपला
सोडुनी सकल येथ पातलां;
हा प्रभाव बहु दीर्घबाहु हो!
युष्मदागमिं अम्हांसि हर्ष हो. १८

कां परंतु तुमची मुखद्युती
पूर्ववत् मुळिंहि ना दिसेचि ती!
झांकितें वरुनि जेधवां धुकें
तारतेजहि* असेंचि अंधुकें! १९

वज्र जें धरित वृत्रसूदन
कां न तेज झळके तयांतुन ?
दाविना धनु सुरंगि आपलें
तीक्ष्णसार जणुं सर्व लोपलें! २०

हा धरी वरुण जो स्वहस्तकीं
मूळचा अरिगणां अभेद्य कीं
पाश दीन दिसतो असा कसा
मंत्ररुद्ध हतवीर्य सर्पसा! २१

---

* तार = तारका.

तें कुबेरमनिं शल्यसें असे
जें पराभवचि सांगतें जसें
हस्त नष्टगद तो, पहा, करी
भग्नशाख तरुची बरोबरी! २२

अस्तदीप्ति निजदण्ड घेउनी
रेखितो यमहि तेविं मेदिनी
तो अमोघ परि आजिं भासत
दंड दीन, विझलेंचि कोलित! २३

दुर्निरीक्ष्य परि आजि केवळ
क्षीणताप रवि केविं शीतळ
ते जणों गमति चित्रिं रेखिले
प्रेक्ष्यरूप सहजींचि देखिले! २४

स्तब्धसेचि दिसती अकारण
सप्तसप्तहि पहा मरुद्गण
वाहतें उलट वारि तें जसें
अंबुवेग जयिं रुद्ध होतसे २५

वांकवोनि अकराहि मस्तकां
रुद्र ते करिति हुंकृतीसि कां!
चंद्रकोरिच जटांमधील त्या
हुंकृतींसि कथितात हालत्या. २६

सुप्रतिष्ठ तुम्हि त्या तुम्हांप्रति
कोण ते अति बलिष्ठ पाडिती?
नित्य शास्त्रनियमांसि सारुनी
येति जेविं अपवाद ते जनीं. २७

वत्स हो ! म्हणुनि येथ येउनी
प्रार्थितां मजसि काय जें मनीं ?
लोकसृष्टि जरि ती मला पडे
पाळणें सकल ती तुम्हांकडे." २८

मंद वायु जणुं काय हालवी
पद्मपंक्ति सरसींतली नवी
तेविं लोचनसहस्रही तदा
प्रेरि इंद्र गुरुतें म्हणे 'वदा.' २९

त्या सहस्रनयनाहुनी बरी
दृष्टि ज्यामधिं वसे खरोखरी,
तो द्विनेत्र जणुं चक्षु वासवी
हात जोडुनि विधीसि ऐकवी— ३०

"बोलतां जि भगवन् ! खरेंचि तें
कीं पदें अमुचिंही परांकितें;
जो हृदिस्थ सकलांत राहशी,
तो स्थिती, सकल नेणशी कशी ? ३१

आपुला वर तयासि लाभुनी
तारकासुर बलिष्ठ हो जनीं
लोकपीडन करावया जसा
धूमकेतु उगवे, गमे तसा. ३२

त्याचिया नगरिं सूर्य तापतो
होइना परि असह्यताप तो
दीर्घिकाकमलिनी विकासती
एवढेंच जणुं कार्य त्यांप्रति ! ३३

नित्य सर्वहि कलांसि घेउन
चंद्रमा करि तयासि सेवन
जी कला हरशिरीं विराजते
इंदु योजित न तेवढीच ते. ३४

पुष्पचौर्य करणार मारुत
भीतिनें उपवनीं न वाहत
त्याचिया निकटिं संचरे हळू
जेविं कीं व्यजनवात कोमळू ! ३५

सोडती क्रम, ऋतूहि आपला
देति सर्व सुमराशि त्याजला
ते ऋतू न, जणुं माळि शोभती
त्याचिया उपवनांत राबती ! ३६

द्यावयासि जणुं त्या उपायन
रत्नसंचय सुयोग्य निर्मुन
वाट पाहि उदधि प्रतिक्षणीं
निर्मितांचि वितरी तया क्षणीं. ३७

वासुकिप्रभृति नागही तसे
ज्यांचिया शिरिं मणिप्रभा वसे
सेविती असुरराज तारका,
रात्रिंचे अचलतेज दीप कां ! ३८

देवराजहि अनुग्रहास्तव
त्यासि कल्पतरुजन्य वैभव
भूषणें विपुल नित्य पाठवी
सेवकांकरविं आपुल्या नवीं. ३९

त्यासि तुष्ट करुनीहि यापरी
क्लेश दे त्रिभुवनासि तो तरी
दुर्जनासि उपकार ना बरा;
त्या उपाय अपकार तो खरा ! ४०

कल्पवृक्षसुमपल्लवांप्रति
देवताहि सदयेंचि काढिती
नंदनीं सुरतरूंसि तो अशा
तोडि, पाडि; अजि त्यां अशी दशा ! ४१

निद्रिता, चवरिंनीं सुरांगना
बन्दिनी करिति नित्य वीजना
त्यांत निःश्वसनवायुही मिळे
अश्रु त्यांतच तुषारसे गळे ! ४२

क्षुण्ण जीं रविहयांचिया खुरीं
ऐशिं मेरुशिखरें तयें पुरीं
आणुनी उपटुनी महाबळें
केलिशैल निजगेहिं निर्मिले ! ४३

स्वधुंनीमधुनि वारि केवळ
राहि दिग्गजमदेंचि आविल
तेथ सांप्रत न हैम अंबुजें,
तें तदीय सरसींत बीं रुजे. ४४

व्योमयानिं कधिं घात तो करी
भीति ही नच सरे सुरांतरीं
पाहुं लोक अशि आवडी मनीं
देति तेहि भिउनीच टाकुनी. ४५

यज्ञिं शास्त्रविधियुक्त जें हवि
देति याज्ञिक अम्हांप्रती भुवीं
अग्निरूपि अमुच्या मुखांतुनी
घेइ देखत अम्हां हिरावुनी. ४६

घेतला असुरनायकेंचि या
अश्वरत्न हरिचा हिरोनियां
जो गमे यशचि शुभ्र मूर्तसें
जें चिरार्जित सुरेश्वरें असे. ४७

होति निष्फळ उपाय आमुचे
क्रूर त्या असुरिं, कांहिं ना सुचे
वीर्यवन्तहि विशेष औषधी
सान्निपातिकिं न सिद्धि दे गदीं. ४८

जें सुनिश्चितपणें जया वरी
आस ठेविलि अम्ही जयावरी
तें स्वचक्र हरि मारि तारकीं
त्या परी रुचिर होय हार कीं ! ४९

जिंकुनी हरिगजासि, तत्करी
वप्रकेलि करिती घनांवरी
रेटुनि स्वशिर पुष्करादिकीं
देति टक्कर गिरीवरीच कीं ! ५०

तारकासि वधण्यासि, यास्तव
सैन्यनायक हवा अम्हां नव
कर्मबंध मुळिं जो विलोपवी
धर्म इच्छिति मुमुक्षु तो भवीं. ५१

सैन्यरक्षक अशा जयाकरीं
नायकत्व निज देउनी हरि
बन्दिनीपरि जयश्रियेप्रति
तो हरील फिरुनी शचीपति." ५२

यापरी गुरु वदोनि थांबला
तोंचि आत्मजनि बोलुं लागला
तैं गुरूक्ति जणुं मेघगर्जना
ब्रह्मभाषण सुवृष्टि हो मना ! ५३

" पूर्ण होय भवदीय कामना,
कांहिं काल करणें प्रतीक्षणा
सैन्यनायकविनिर्मिती पण,
मी स्वतां न करिं आज आपण. ५४

दैत्य तो मजकडूनि वर्धिला
त्यास मीच वधणें नको मला;
वाढवूनि विषवृक्षही स्वतां
केविं आपणचि तोडणें अतां ? ५५

पूर्विं हेंचि मज याचिलें तयें,
मीहि ' होय ' म्हटलें तपोभयें
लोक दग्ध करितें तप त्वरें
मी जरी न करिं शांत तें वरें ! ५६

तो उठेल जर कां रणांगणा
योग्य हो कवण तन्निवारणा ?
शंभुवीर्यजचि अंश केवळ
बाळगी उचित त्यासि तें बळ ! ५७

दिव्य तेज तिमिरापलीकडे
  एक शंकरचि होय रोकडें
तत्प्रभाव मजसीहि ना कळे
  विष्णुलागिंहि तसाच नाकळे ! ५८

शंभुचित्त रत आत्मसंयमीं
  घ्या जि ! ओढुनि उमागुणें तुम्ही
ओढितां सहज येइ कीं निकें
  जेविं लोहशकलासि चुंबकें. ५९

दोघि केवळ समर्थ धारणा
  वीर्यसृष्टि उभयांचिया, गणा
शंभुबीज, गिरिजाच एकली,
  तें मदीय, हरमूर्ति जी जली* ६०

सैन्यनायकपदा वरोनियां
  आपदाहि तुमच्या हरोनि या
शंभुपुत्र अपुल्या पराक्रमें
  तारका वधिल उत्तमोत्तमें. " ६१

विश्वयोनि वदुनी असें सुरां,
  गुप्त होय तितुक्यांत सत्वरां
तेहि चित्तिं निजकार्य योजुनी
  स्वर्गिं जाति सुरही तया क्षणीं. ६२

इंद्र चिंतन करी निजांतरीं,
  कार्यसिद्धि करि कोण ही खरी;
निश्चयें करिल काम जाणुनी,
  तो स्मरा स्मरत सत्वरा मनीं. ६३

* जलात्मक.

( शार्दूलविक्रीडित )

ज्याच्या कोटि सुचारु शोभति जशा कीं सुंदरीभ्रूलता
त्या चापा रतिकंकणांकित गळां घेवोनि पुष्पांचिता
देवोनी सहकारमंजरिशरां मित्रा वसंताकडे
राहे अंजलि जोडुनि स्मितमुखें कंदर्प इंद्रापुढें. ६४

'ब्रह्माभिगमन' नामक द्वितीय सर्ग
समाप्त

# सर्ग तिसरा

[श्लोक १-२२ इंद्रमदनसंवाद, २३ रति व वसंत यांसह मदनाचें हिमालयांतील शंकराश्रमाकडे आगमन, २४-३९ तेथील वसंतोद्भवाचें वर्णन, ४०-५१ श्रीशंकराची योगसमाधि व मदनाचें तेथें लपून राहणें, ५२-६३ पार्वती सख्यांसह शंकरसेवेस येते. योगसमाधि संपवून शंकर पार्वतीस दर्शन देतो. पार्वती वंदन करते व शंकराचा आशीर्वाद घेते, ६४-७२ पार्वती कमल-बीजमाला शंकरास अर्पण करीत असतां त्यावर मदन संमोहनशर सोडतो. त्यानें शंकराच्या मनोवृत्तींत किंचित् चांचल्य होत आहे तोंच इंद्रियक्षोभाचें कारण जो मदन तो शंकराच्या दृष्टीस पडतो. शंकर संतापानें भालनेत्रांतील अग्नीचा लोळ फेकून मदनाला भस्म करतो! ७३ रतिमूर्च्छा, ७४ शंकराचें अंतर्धान पावणें, ७५-७६ पार्वतीचें विषण्ण मनानें घरीं येणें.]

(शिखरिणी)

तदा देवेन्द्राचीं दशशतहि तीं नेत्रकमळें
स्मरा एक्या वेळीं बघति सुर सोडोनि सगळे;
जगीं कार्यापेक्षें कमिअधिक तें ज्यापरि नडे
प्रभूंच्या चित्तींचें श्रितजनिं तसें गौरव घडे. १

स्वतां हस्तें दावी निजनिकटिंचें स्थान मघवा
'बसें येथें' ऐसें वचन वदुनी मानसभवा
कृपा स्वीकारोनी सविनयचि माथां लवुनियां
सुरेन्द्रा एकान्तीं मदन तयिं बोले वचनिं या— २

"विभो! प्रत्येकाचें विदित गुणवैशिष्ट्य तुजला
वदावें त्वां मातें जगतिं तव कार्यासि सकला
कृपा जी त्वां केली स्मरुनि मजलागीं मजवरी
तिला संवर्धावें करुनि मज आज्ञा लव तरी. ३

कुणी मात्सर्यानें सुरपतिपदीं आस धरिली
तपस्येच्या राशी अगणित करोनि क्षितितलीं ?
तया भंगायाला पळहि मज नाहींच उशिर
जरी इंद्रा ! माझें धनु करिन मी सज्ज सशर ! ४

सरो संसारींचा जननमरणक्लेश म्हणुनी
भिवोनी, मोक्षाचा, वद, धरियला कीं पथ कुणी ?
करूं का मी त्यातें –जर तुज न तो संमत तर
कटाक्षीं सुभ्रूंच्या ललिततरलीं बद्ध सुचिर ? ५

असो शुक्रानेंही सकल निज नीती पढविला
असा आहे इंद्रा ! अरि तव कुणी सांग मजला
तयाच्या धर्मार्थां मिळविल धुळीतें मदन हा
विनाशी सिंधूच्या उभयहि तटां पूरचि, पहा ! ६

जिनें पातिव्रत्यें अति कठिन हृद्वृत्ति वरिली
अशी रामा कोणी तव मनिं सुलोलीं शिरकली
स्वलज्जा सोडोनी दृढ बिलगुनी कंठिं तुझिया
रहावीशी वाटे जरि तुज सती सांग मज या ! ७

असे झाली किंवा हृदयदयिता कोण कुपिता
तुझ्या पाहोनीयां सुरतिं अपराधा अनुचिता
करी त्वद्धिक्कारा, जरि तिजसि गेलासि शरण
तिला पश्चात्तापें किसलय करूं काय शयन ? ८

जरा दे विश्रांती तव पविस, वीरा ! मम शरीं
करावें म्यां कोणा तव अरिमधीं अंकित तरी ?
हिरोनी मी त्याच्या सकल भुजवीर्यासि जरि घें,
स्त्रियांचेही क्रोधें अधर हलतां, त्या भय रिघे ! ९

तुझ्या आशीर्वादें, मम शर जरी कौसुम असे,
मला साहाय्या दे जरिहि मधु हा एकचि तसें—
हराच्याही धैर्या हरिनचि पिनाकीहि जरि तो
दुजा धन्वी माझ्यापुढतिं मग तो काय करितो ?" १०

अशा ऐकोनी त्या मदनवचनां, ऊरुवरला
सुरेशें काढोनी चरण पदपीठीं वितरला
स्वसंकल्पा ऐशी प्रकट करि जो शक्ति, करणी,
रतीशा त्या बोले सुरपति अशी वाक्यसरणीः— ११

" सखे ! सारें जें तूं वदसि मज तें तथ्य म्हणतों,
तुला वज्राऐसें खचित मम मी अस्त्र गणतों,
न वज्राचें चाले बल मुनिजनीं किंचिदपि रे !
तुझें नोहे तैसें; सकलगति तूं जिंकिशि खरें. १२

प्रभावातें जाणें मजसम तुझ्या यास्तवच मी
तुला योजूं पाहें अतिशय महत्कार्यि परमीं
बघोनी कीं शेष क्षितिभरहि घेई निजशिरीं
तया लावी कृष्ण स्वभरहि वहाया तनुवरी. १३

'हराही बाणांनीं ' म्हणसि ' निज ' जें ' जिंकिन ' असें
गमे अस्मत्कार्या करिसि तयिंच स्वीकृत जसें !
हवें देवां सर्वां अजि खचित रे ! तेंचि; न दुजें
तयांना संत्रास प्रबल अरि देतात, समजें. १४

म्हणोनी ज्यासाठीं अमर हृदयें लालस अति
असा तो सेनानी शिवतनुज व्हायासि जपती
परी साऱ्यां मंत्रां उगम शिव तो ब्रह्मनिरत
तया जिंकाया कीं शर तवचि तो धैर्य धरत. १५

हरा ब्रह्मध्यानीं नियतहृदया अद्रिगुरुची
   यता कन्या व्हावी प्रिय अशि तया लावि सुरुचि
वहाया तद्बीजा जगतिं गिरिजा, एकचि सती
   समर्था आहे हें विधिकथित, अन्या न दिसती. १६

असे जेथें शंभू तप करित, ती तेथ चतुरा
   पित्याच्या आज्ञेनें हिमगिरिवरी सेवित हरा
अशी वार्ता मातें सुरयुवति येवोनि कथिती
   तुला आहे ठावें मम चरचि* त्या गूढ युवती १७

म्हणोनी जा, साधीं सकलसुरकार्यार्थ पुरता;
   असे त्वत्कार्यार्थावरिं अमरकार्यार्थ तरता
जगीं बीजालागीं सलिल जरि कां साह्य न करी
   फुटेना त्या कामा! कधिंहि बरवा अंकुर तरी. १८

सुरांच्या सिद्धीचा गमत सदुपायैकचि हर
   तयातें साधाया शकति अवघे ते तव शर
असेना का साधी अति लघुहि अख्यातहि, जरी
   न जी अन्या साधे कृति जगतिं ती कीर्तिसि करी. १९

तुला कामा! सारे सुर करिति अभ्यर्थन, पहा
   त्रिलोकी ताराया अवसर उदेला तुजसि हा
तुझ्या चापालागीं अति अदयही कार्य न जरा
   किती वानूं तूंतें? तुजसम नसे धन्य दुसरा! २०

तुझ्या साहाय्याला सहचर तुझा हा मधु असे,
   नको सांगाया ज्या 'कर मज सख्या! साह्यहि' असें
जगीं अग्नीतें जो करि अमित साहाय्य पवन
   करायातें त्या तें करिति विनती काय कवण?" २१

---

* हेर.

प्रसादाचीं पुष्पें अशिंच जणुं तीं भर्तृवचनें
  महेन्द्राचीं माथां धरुनि धरिला मार्ग मदनें
स्वयें हांकोनी हो सुरकरिसि जो कर्कश कर
  तयें स्पर्शी हर्षें मदनतनुतें तैं सुरवर. २२

स्मरासंगें तेव्हां अनुसरलिं दोघें सभयशीं—
  सखा प्रेमी त्याचा मधु, सहचरी ती रति तशी—
तनूच्याहि त्यागें सुफल सुरकार्यासि करिन
  अशा कामें रुद्राश्रमिं हिमनगीं जाय मदन. २३

तदा त्या कांतारीं प्रकट मधु झाला अति भरें
  स्वतांचें जाणोनी मदनहृदयीं गौरव बरें
समाधीच्या मार्गीं उपजवित विघ्नां मुनिजनां
  तयांच्या चित्तांना विचलित करी संयमधनां. २४

रवी लागे जाया, त्यजुनि समया उत्तरदिशे,
  कुबेराची गुप्ता हृदयदयिता ती जरि असे;
तदा दुःखें सोडी मलयपवनोच्छ्वास जणुं कीं
  प्रियाच्या त्या त्यागा न सहुन दिशा दक्षिण मुखीं! २५

अशोकांच्या वृक्षीं सुभग कुसुमें पल्लव नवे
  उदेले स्कंधींही सकलतरुभागीं मधुसवें
पदीं ज्यांच्या मंजुस्वनिं रुणझुणीं नूपुर करी
  अशा वामाक्षींचे चरण न तयां लागति जरी! २६

वसंतें निर्मोनी अभिनव असे चूतशर ते
  तदारंभीं केले नवकिसलयें पक्ष वरतें!
द्विरेफां ठेवोनी तदुपरि शराग्रीं असितशां
  स्मराच्या नामातें जणुं लिहित तो अक्षरिं तशां! २७

फुलें पांगाऱ्यांचीं किति तरि अहा ! रंगित खरीं
तरी निर्गन्धत्वें करिति मन तीं खिन्नचि परी
असो सामग्र्यानें गुणनिकर एकत्र जमुनी
अशी वृत्ति प्रायः विलसत विधीच्या नच मनीं ! २८

पलाशां आलेल्या अविकसित त्या लाल कलिका
शशीच्या कोरेचें कुटिलपण ज्यां येइल तुका
वसंतें कीं केलीं दयितवनभूतें निजनखीं
क्षतें ताजीं तीं जीं अभिनवसखीसंगमिं निकीं ! २९

निळ्या भृंगांगाचा अति सुबकसा भालिं तिलक
मधुश्री लेवोनी करि निज अलंकारित मुख
गमे कीं आम्रांच्या नव किसलयीं रंगवित ती
निजोष्ठांना देवी; वन बघुनि व्हावी अशि मति. ३०

कुरंगांच्या नेत्रीं कुसुमित पियालांतिल कण
परागाचे जातां, बनति जणु ते अंधनयन;
मदौद्धत्यानें ते उलट पवनाच्याहि पळती
वनीं जेथें पर्णें खळखळ तरूंतूनि गळती. ३१

वनीं आस्वादोनी बहुसुरभि चूतांकुर नवे
यदा झाले गाते पिक रसिक ते मंजुळ रवें
तदा त्यांचे शब्द प्रकट मदनाचेच गमले
जयांयोगें क्रीडाकुपितललनारोष शमले ! ३२

हिमाभावें ज्यांनीं अधरिं अपुल्या रंग न दिले
कपोलांनीं किंचित् फिकटपण ज्यांच्या वरियलें
अशा योषा रम्या वसति युवती किन्नरि तिथें
उदेले तत्पत्रावलिंवरि* तदा स्वेदकण ते. ३३

* पत्रावली—कपोल, वक्षःस्थल वगैरेवर काढलेली वेलबुट्टी.

अकालीं ती होतां मधुर मधुची निर्मिति वनीं
हराच्या जे होते तप करित त्या आश्रमिं मुनि
तयांच्या चित्तांची अति विचलता तेथ घडली
जिला वारायाची किति यतिमतिभ्रान्ति पडली! ३४

तया स्थानीं जेव्हां कुसुमधनुतें सज्ज करुनी
रतीसंगें आला मदन मधुसाहाय्य वरुनी;
मनीं नांदे प्रेमा रमणरमणींच्या अतिशय
वनीं तेव्हां त्यातें प्रकटिति कृतीनेंचि उभय. ३५

प्रियेमागें मागें गुणगुणत गेला अलि सुखीं
तिच्या संगें पी तो मधु कुसुमरूपीं सुचषकीं
मृगीतें शृंगाग्रें मृग सुखवि तो खाजवुनि या
सुखस्पर्शा तीही अनुभवित नेत्रां मिटुनिया. ३६

परागें पद्मांच्या सुरभि जल घेऊनि गुळणी
अति प्रीतीनें दे प्रियकर करीलागिं करिणी
बिसार्धा खावोनी वदनपुटिंच्या शेष शकला
दिलें चक्राह्वानें जिवलग अशा स्वीय सखिला. ३७

पदें गातां गातां दमुनि वदनीं स्वेदलव ये
कपोलीं रंगांची छवि ढळलि थोडी तरि तयें
पिऊनी माध्वीका तरल नयनीं चारुतम जें
तया चुंबोनीयां रमणिवदना किन्नर भजे. ३८

जयांना पुष्पांचे स्तबक कुचसे शोभति अति
प्रवालांचे ज्यांचे द्युतिधर तसे ओष्ठ गमती
अशा वेलीही त्या निज विनतशाखामय करीं
प्रिया आलिंगोनी धरिति तरुनाथां बहुपरीं. ३९

सुरस्त्रींचीं गाणीं जरि पडति कानीं तरिहि तीं
तदा आत्मध्यानीं गढुनि नच मानी पशुपति
मनोवृत्ती ज्यांनीं स्ववश करुनी धैर्य कसलें
समाधी भंगाया शकत न तयां विघ्न कसलें! ४०

लतागेहद्वारीं तदवसरिं नंदीश्वर बली
—जयें डाव्या हस्तीं निज कनकयष्टी धरियली—
खुणावी लावोनी वदनिं अपुल्या अंगुलिस तो,
गणांलागीं 'कोलाहल नच भला!' हें सुचवितो. ४१

तदाज्ञेनें तेव्हां लव न तरुही तेथ हलती
द्विरेफांचीं वृंदें हळुहि करिती गुंजन न.तीं
धरी मूकत्वातें खगगण, मृगें निश्चल उगीं
जणों चित्रावस्था सकलहि वना पावलि जगीं! ४२

समोरीं शुक्राच्या गमन न करावें, स्मर तसें
तयाच्या दृक्क्षेत्रा चुकवुनि तदा तो शिरतसे
नमेरूच्या शाखा जिकडुनि हरातें दडविती
तिथें ध्यानस्थानीं शिरुनि लपला तो रतिपति. ४३

दिसे तेव्हां शर्व स्थित अमरदारुद्रुमतळीं
जिथें वेदी व्याघ्राजिनयुत अशी शोभलि भली.
समाधीच्या ठायीं नियमनिरत त्र्यंबक दिसे
रतीशाला, ज्याला लयसमय आला द्रुत असे. ४४

स्थिर ग्रीवा, वक्षस्थल सरल, वीरासनिं हर
तसे बाहू किंचिन्नत, उभय अंकस्थित कर,
तशा ध्यानस्थाचें करपुट तसें तें विलसलें
जसें कीं उत्फुल्लांबुजयुगल अंकीं विकसलें! ४५

भुजंगांच्या रज्जू कसुनि कसिल्या मस्तकिं जटा
  दिसे रुद्राक्षस्रक् श्रुतिपुटिं विलंबोनि दुपटा
असे केलें कृष्णाजिन वसनसें गांठुनि वरी
  निळ्या कंठस्थानीं द्युति अधिक ज्या कृष्णचि करी. ४६

स्वभावें अत्युग्रें गिरिशनयनें अर्ध मिटलीं
  छटा चांचल्याची सकल लपली भ्रूकुटिंतली
स्वनासाग्रीं दृष्टि स्थिर करुनि खालीं वळवुन
  बघे एकाग्रत्वें अनिमिषपणें तो त्रिनयन. ४७

जसा वृष्टिक्षोभाविण गगनिं अंभोद दिसतो;
  जसा कीं कासार स्तिमित लहरींवीण असतो
निवातीं निष्कंपें अचल दिसतो दीपहि जसा
  निरोधें प्राणांच्या विलसत तिथें शंकर तसा. ४८

कपाळींच्या नेत्रामधुनि अनलज्योति निघती
  जसे कीं तेजाला फुटति नव ते अंकुर किती !
तयांनीं लुप्ता हो अतिनिकट बालेन्दुसुषमा
  मृणालांच्या तंतूहुनिहि सुकुमारा निरुपमा ४९

मनोवृत्तिद्वारीं नउहि करुनी संयम हरें
  समाधीनें चित्त स्थिर निज हृदीं स्थापुनि पुरें
जया क्षेत्रज्ञातें म्हणति अविनाशीच अवघे
  तशा आत्म्या स्वान्तीं निरखि हर तो, ज्या स्मर बघे. ५०

मनानेंही ज्याचा परिभव नसे शक्य कवणा
  अशा शर्वा तैसें जवळुनि बघोनि त्रिनयना
स्मराचीं भीतीनें शर, धनुहि हातून गळलीं
  स्मरा भीतिग्रस्ता गळलिं परि तींही न कळलीं ! ५१

दिसे किंचिन्नम्रा कुचकलशभारें नगसुता । जिला बालार्काची वसनिं अति साजे अरुणता; ।।
फुलांच्या गुच्छांनीं जाशि भरुनि व्हावी लव नता । गमे गौरी तैशी किसलययुता चालति लता ! ५४

—सुश्लोककुमार, सर्ग ३

"अकस्मात् शंभूच्या निटिलनयनांतूनि उठला । स्फुरज्ज्वालाग्नींचा प्रकट सहसा लोळ कुठला !"
"स्मरातें जाळोनी हरनयनजन्मा अनळ तो । तयाची रांगोळी करि, अवधि लागे न पळ तों !!"

—सुश्लोककुमार, सर्ग ३ श्लो. ७१-७२

## मदन-दहन



तब सिव तीसर नयन उघारा । चितवत काम भयउ जरि छारा ॥

—श्रीतुलसीरामायण, बालकांड तरंग १७

GITA PRESS GORAKHPUR

बला नष्टप्राया निखिल मदनाच्या वितरती
वपुःसौंदर्यानें पुनरपि समृद्धी अशि सती
नगेन्द्राची कन्या दिसलि तितुक्यामाजिं मदना;
सख्या संगें दोघी असत वनदेवी सुवदना. ५२

अशोकांनीं लज्जा उपजविलि कीं माणिकिं निकी,
सुमें पांगाऱ्यांचीं कनकरुचिही पाडिति फिकी,
तशी मुक्तातुल्या अति रुचिर निर्गुंडि दिसली,
वसंताच्या पुष्पाभरणिं अशि गौरी विलसली. ५३

दिसे किंचिन्नम्रा कुचकलशभारें नगसुता,
जिला बालार्काची वसनिं अति साजे अरुणता;
फुलांच्या गुच्छांनीं जशि भरुनि व्हावी लव नता,
गमे गौरी तैशी किसलययुता चालति लता. ५४

जिची रम्या कांची बकुलकुसुमांची सरकते
नितंबापासोनी, जरि कितिकदा सांवरित ते;
गमे कीं कंदर्पें निज कुसुमचापास्तवचि जी
तिथें स्थानज्ञें ती अडकविलि मौर्वी जणुं दुजी! ५५

तिच्या बिंबोष्ठाच्या जवळि जवळीं भृंग फिरतो,
सुगंधी निःश्वासें अधिकचि तिथें लुब्धतर तो;
करींच्या लीलाब्जें तरलनयना भीरुललना
निवारी त्या भृंगा घडिं घडिं, तरी येतचि पुन्हां! ५६

सुरम्या सर्वांगीं हिमनगसुता ती निरखुनी
बघोनी जी व्हावी रतिहि गतगर्वा निजमनीं
वशिश्रेष्ठा शर्वा अजि सहजिं मी जिंकिन खरें
अशी आशा चित्तीं धरियलि पुन्हांही रतिवरें. ५७

उमा आली आलींसहित उटजद्वारिं जंवरी
तिचा भावी भर्ता हर तप करी त्या गिरिवरी,
निजध्यानीं केला उपरम हरें त्याच समयीं
परब्रह्मज्योती परम निरखोनि स्वहृदयीं. ५८

जधीं शंभू वीरासन निबिड संन्यस्त करुन
निरुद्ध प्राणांचें हळुंहळुं ढिलावी नियमन,
फणाग्रीं तोलाया अवनिभर तैं थोर चढला
अहीन्द्रा पाताळीं अधिक किमपि त्रास पडला. ५९

विभो ! आली सेवेस्तव तुमचिया शैलतनया
असें सांगे भर्त्या करुनि नति नंदीश्वर तया,
प्रवेशा भ्रूक्षेपेंकरुनिच हरें जैं अनुमति
दिली, तेव्हां नंदी प्रविशवि हरासन्निध सती. ६०

स्वतांच्या हस्तांनीं खुडियलिं वसन्तोद्भव फुलें,
जयांमध्यें कांहीं किसलयहि तैसें विलसलें,
सख्या त्या दोघीही प्रणति करुनी शंभुचरणीं
अशीं पुष्पें पत्रें वितरिति तिथें रास करुनी. ६१

उमेनेंही केलें शिर लववुनी वंदन तया
तिच्या तैं कर्णींचें किसलय पडे तें हलुनिया
विराजे पांगेरी नव सुमन जें कृष्ण अलकीं
तिच्या, तेंही हाले नमन करितां त्या लवुनि कीं. ६२

‘ अनन्यत्वें सेवी तुजसिच, अशा पाव पतिला ! ’
असें शंभू तीतें अवितथचि जें तेंचि वदला;
जगीं जें कीं सांगे प्रकट करुनी ईशभणिति
कधींही पोषीना खचित विपरीतार्थ जनिं ती. ६३

शरातें सोडाया अवसर बघे काम इकडे
–पतंगाऐसें जो ज्वलनमुखिं जाया धडपडे–
शरव्या शंभूतें टपुनि बघि तो गौरिपुढतीं
स्वचापाची दोरी फिरुनि फिरुनी स्पर्श करि ती. ६४

वियद्गंगेच्या ज्या विकसति जलौघीं कमलिनी
असे तद्बीजांची रविकिरणिं केली सुकवुनी
तपस्वी शंभूतें, असलि जपमाला सुरचिता
समर्पी रक्ताब्जप्रभ निजकरें अद्रिदुहिता. ६५

दिलेली अक्षस्रक् पशुपतिहि घ्यायास्तव करी
–भुकेला भक्तांचा– निज कर पुढें जों झडकरी,
स्वचापींही जोडी कुसुमशर तों सायकवर
अमोघा ज्या आख्या प्रथित जगिं 'संमोहन शर.' ६६

चळे शंभूचेंही पळ तरि तदा धैर्यबळ तें
पयोधीचें चंद्रोदयिं जळ जसें कीं उसळतें
तिन्हींही तन्नेत्रें विहरति उमाचारुवदनीं
सुपक्का बिंबांची द्युति यदधरीं येत दिसुनी. ६७

तनू रोमांचांनीं सकल गिरिजेचीहि फुलली,
तिचीं अंगें त्यांणीं जणुं नव कदंबेंचि तुललीं;
अधोदृग् लज्जेनें अधिक तिरपें वक्त्र खुललें
तयें सारे तीचे हृदयरतिचे भाव कळले. ६८

उडाली जी स्वान्तीं खळबळ हरीं संयमपरीं,
तिचा तो तत्काळ त्रिनयन बळें निग्रह करी;
सभोंवारीं दृष्टी सकलदिशिं फेकूनि हुडकी
कशानें चित्तीं ही विकृति घडली तेंचि निरखी. ६९

दिसे त्यातें मुष्टी धरुनि उजव्या कोणिं नयनीं
नतांसें जो बैसे निज चरण डावा मुरडुनी
धनुर्ज्या कर्षोनी करित धनु जो वर्तुल जणूं
शरें हाणायाला टपुनि बसला मानसजनू.* ७०
तपोविक्षेपानें अधिकचि तया मन्यु चढला
मुखीं पाहों देना भयद भ्रुकुटी तीहि कुटिला
अकस्मात् शंभूच्या निटिलनयनांतूनि उठला
स्फुरज्ज्वालाग्नीचा प्रकट सहसा लोळ कुठला ! ७१
" प्रभो! थांबा! थांबा! नच नच जि! व्हा क्रुद्ध इतुके!"
सुरोद्गारांनीं या गगन भरलें जों न तितुकें
स्मरातें जाळोनी हरनयनजन्मा अनळ तो
तयाची रांगोळी करि, अवधि लागे न पळ तों !! ७२
अशा तीव्राघातीं बघुनि सहसा आत्मपतिला
रती मूर्च्छा पावे, नुरत कसलें भानचि तिला
तिला मूर्च्छेनें त्या क्षण नुमजली भर्तृमृतिहि
गमे मोहें केली उपकृतिच कांतेवरति ही ! ७३
जसें वृक्षा टाकी त्वरित अशनी भंगुनि पुरें
तपोविघ्ना तैसें झणिं मनसिजा नाशुनि हरें,
स्त्रियांच्या सान्निध्यीं उबग धरिली. तत्क्षणिं तिथें
लपे भूतांचा तो पति, गणहि घेऊनि सह ते. ७४

( मंदाक्रांता )

हेतू झाले विफल अपुल्या उच्चशीर्षी पित्याचे
गेले वायां सकल समजे रूपसौंदर्य साचें;
लज्जादायी अधिकचि पुन्हां, कीं सख्यांच्या समोरी—
ऐसी खिन्ना, कशि तरि गृहा चालली तेथ गौरी ७५

---

* मदन

( हरिणी )

नयन मिटले शंभुक्षोभा भिऊनि जिनें अति
आशि झणिं करीं अद्री घेई सुता अनुकंप्य ती
सुरगज जसा दंतीं लग्ना धरोनि सरोजिनी
प्रसृततनु हो शीघ्रत्वें तो तसा पथिं धावुनी. ७६

‘ मदनदहन ’ नामक तृतीय सर्ग

समाप्त

# सर्ग चवथा

[ श्लोक १-४ रति शुद्धीवर येऊन मदन जिवंत असेल अशा समजानें त्यास क्षेम विचारते, तोंच त्याचें भस्म झालेलें दृष्टीस पडतांच विह्वल होऊन अतिशय विलाप करते. ५-२४ पतीचे अनेक गुण व विलास आठवून तिला दुःखाचे पूर येतात. २५-३८ जीवितत्याग करण्याचा निश्चय करून ती मदन-मित्र जो वसंत त्यास चिता करावयास प्रार्थिते ३९-४४ इतक्यांत गगनवाणी होते व रतीस सांगते कीं, 'ब्रह्मदेवाच्या शापानें मदनास ही दशा आली, व पार्वतीच्या तपश्चर्येनें शंकर प्रसन्न होऊन तिचें पाणिग्रहण करील तेव्हां मदनालाहि पुनः त्याचा पूर्ववत् देह देईल असा ब्रह्मदेवाचा उःशाप असल्यानें तोंपर्यंत वाट पहा.' ४५-४६ आकाशवाणीवर विश्वास ठेवून रति त्या सौख्यकालाची प्रतीक्षा करीत काल कंठते. ]

( मालिनी )

मग मदनवधूटी[*] मूर्छिता शोकयोगें
उठविलि विधिनें ती मोह नाशूनि वेगें;
प्रियपतिनिधनाच्या नव्य दुःखीं असह्यीं
अनुभव तिज द्याया तो विधाताचि पाही ! १

पुनरपि रति जेव्हां पावली स्वीय भान,
उघडुनि अवलोकी लोचनें सावधान;
दयित न दिसतां तो तृप्ति कोठोनि त्यांना ?
पति निज मृत झाला, हेंहि ठावें तिला ना ! २

उठुनि रति म्हणे ती कीं, " अहो ! प्राणनाथा !
कुशल तुम्हि अहां कीं ? " हें पुसे जों स्वकांता—
तिजपुढतिं दिसे तों आकृती ती नराची,
ज्वलनिं हररुषाच्या[†] झालि जी भस्म साची ! ३

---

[*] वधूटी = वधू. [†] हरक्रोधाच्या.

मग पुनरपि झाली विह्वला शोकमग्ना,
स्तन धुळिं भरले तैं भूमि आलिंगितांना !
रति करित विलापा, ज्यामधें त्या स्थलीतें
वनिं जणुं समदुःखें शोकिं ती वाह्वीते ! ४

" अवयव तव सारे होति सौंदर्यसारें
उचित उपमितीला जे विलासी जनां रे !
अशि बघुनिहि त्यांची ही दशा मी न भंगें,
खचित कठिन भारी अंगनांचींच अंगें ! ५

दयित ! तव अधीन प्राण जीचे अशीसि
त्यजुनि क्षणिंच जासी तोडुनी प्रेमराशी !
निघुनि सकल जातां, फोडुनी सेतुबंधा
जलचय, उरल्यें मी पद्मिनी भाग्यमंदा ! ६

कधिंच न तुम्हि केलें मन्मना नावडेसें,
प्रिय नचहि तुम्हां जें, म्यांहि केलें न तैसें;
विलपन करतीला या रतीलागिं आजि
अयि दयित ! दिसाना कारणावीण कां जी ? ७

चुकुनि अपरनामीं नाम घेत्या तुम्हां मी
कवळुनि दृढ बांधीं मेखलापुष्पदामीं,
नयनिं रज विभूषांभोजिं वा ताडितांना
उडविं तुमचिया मी, हें स्मरा ! हो ! स्मरा ना ! ८

'वससि हृदिंच माझ्या, हे प्रिये !' बोल ऐसे
प्रियहि गमति मातें धूर्ततेचेच जैसे !
जरि नच उपचारी ते तुझे शब्द, कांता !
अतनु अजि कसा तूं ! न क्षता केविं कांता ! ९

अचिरचि पथ घेशी स्वर्गिचा तूं इथून,
अनुगमन करोनी त्वत्पथा मी धरीन;
इतर जन विधीनें वंचिले मात्र, हाय !
खचित तव अधीन प्राणिसौख्यार्थ होय. १०

तिमिरिं नगरमार्गीं रात्रिं जातां प्रियांतें
स्तनित जरि घनांचें अंतरा भीववी तें;
प्रियवसतिस ऐशा कामिनी पाववाया
तुजविण कवणा हें होय सामर्थ्य, राया ! ११

भ्रमवित ललनांचीं सुंदरें लोचनाब्जें,
अडखळवित त्यांतें शब्दि चालींहि माजें;
मद मधुमदिरेनें आलिया कामिनींस
तुजविण मदना ! तो व्यर्थ आतां प्रहास ! १२

कळुनि विधुसि येतां आपुल्या सत्सख्याची
स्मर ! तव तनु झाली नामशेषाच साची,
विफल उदय त्यातें वाटुनी न त्यजील
निज तनुपण शुक्लीं पक्षिही शोकशील ! १३

अरुण–हरितवर्णें शोभती देंठ ज्यांचे,
सुचविति पिक ज्यांच्या आगमा मंजु वाचें;
प्रसव नवरसालीं येउनी संप्रती तो
स्वशर, वद, तयाला कोण कामा ! करीतो ! १४

अयि मदन ! कितीदां त्वां तुझ्या कार्मुकातें
सुरुचिर अलिपंक्ती योजिली ज्यासमा* ते !
निरखुनि गुरुदुःखा या मदीया करी ती
अति करुण रवातें, दुःखिता याच रीतीं ! १५

* ज्या=धनुष्याची दोरी.

निज तनु अति रम्या ती पुन्हा घेउनीया
 उठुनि मदन! आज्ञा कोकिळांना करीं या;
दयित! सुरतदूतीस्थानिं रे! योजिं त्यांना
 सहजमधुर वाणी तेविं कोणां दुजां ना. १६

लववुनि शिर मातें, गूढशीं कंपयुक्तें
 स्मरति मज रतें तीं प्रार्थिलीं त्वां सुरक्तें;
स्मरतिहि मज कांता! गाढ आलिंगनें तीं
 स्मृतिहि मम जयांची लोपवी चित्तशांति! १७

रतिनिपुण! मदंगीं त्वां वसंतोद्भवांनीं
 रचिलिस दयिता रे! मंडनश्री सुमांनीं;
अजुनिहि तनुलागीं माझिया शोभवी ती,
 परि न दिसत नाथा! कां तुझी कांत मूर्ति? १८

पद अजि मम डावें लागशी रंगवाया
 स्मरुनि तुजसि नेती क्रूर तों देव, राया!
म्हणुनि चरणभूषा जी अपूर्णाचि राही
 लवकरि परिपूर्णा ती करायासि येईं! १९

शलभसम मला मी होमुनी आजि तूर्ण
 पुनरपि तव अंका आश्रयोनी बसेन,
जंवरचि मदना! तूं मोहियेलासि नाहीं–
 अति चतुर अशांहीं स्वर्गिंच्या अंगनांहीं! २०

क्षणभरिं तरि मागें ही जिती कामकांता
 निजरमणविनाही राहिली येथ, कांता!
मजसि चिकटला हा बोल रे! केविं जाई?
 जरिहि अनुसरोनी तूज येत्येंचि मीही! २१

अजिं तुज मुकल्यें मी जासि लोकांतरासि
करुं तरि तव आतां अंतभूषाहि कैसी?
कळत न, गति तूतें एक काळींच ही रे!
समचि घडलि नाथा! केविं जीवें, शरीरें! २२

धरुनि निज धनूसी आपुल्या अंकदेशीं
स्वशरहि मग त्यातें जोडुनी ओढिलासि
मधुसह करिशी तैं सस्मिता गोष्टि नाथा!
निरखिशिहि कटाक्षीं, आठवे सर्व चित्ता. २३

प्रिय रमण! कुठें तो लाडका मित्रराजा –
सुमधनु तुज देता माधव प्रेमि तूझा?
कळत नच तयाही उग्रकोपेंचि काय
सहचरसम केलें त्र्यंबकें दग्धकाय!" २४

अशि करुण रतीची ऐकुनी शोकवाणी
मधु हृदिं विषदिग्धीं हो जणूं विद्ध बाणीं
विकळ रतिसि द्याया धीर तैं सांत्वनाचा
प्रकट तिजपुढें तो जाहला मूर्त साचा. २५

रति रडलि किती तैं देखुनीयां तयातें
उर बडवुनि घेई सुस्तनां क्लेशवी ते
स्वजन जवळि येतां शोकसंवेग साच
उलघडुनि कवाडें लोटतो पूरसाच! २६

वदलि मग मधूतें दुःखसंविग्नचित्ता
"बघ तव सुहृदाचें राहिलें काय आतां!
मदनसख वसंता! ही कपोताभ त्याची
भुरभुर उडवीती राख या वायुवीचि! २७

अयि मदन! मधू हा दर्शनाकांक्ष तूझा
सुखविं अजिं तयाला दर्शनें मित्रराजा;
स्थिर न जरि नरांची प्रीति नारीजनांशीं
परि न कधिं सख्याशीं दावि ती रीत तैशी. २८

सहचरमधुसाह्यें पाळितें विश्व सारें
असुर, सुरहि आज्ञा त्वद्धनूची सदा रे!
जरिहि तव धनुष्या बाण पुष्पें मृदूशीं
मृदुलचि विसतंतुज्याहि त्यालागिं तैशी. २९

सहचर तव गेला तो न ये मागुता रे!
गमत जणुं विझाला दीप लागोनि वारें;
अजि ममहि दशा ती जी दशा तद्दशेची
कठिण असह धूमग्रस्ततेची न कैंची? ३०

रमण मम वधोनी जो मला मात्र राखी
करित विधि अशानें अर्धहिंसाचि ही कीं!
तरुसि करि करी जैं, आश्रयाच्या विदीर्ण
पतन नच चुकावें वल्लरीलागिं तूर्ण. ३१

म्हणुनि करिं वसंता! एवढें रे! अगत्य
खचित उचित आतां हें तुला बंधुकृत्य;
मज दयितविहीनेलागिं अग्नींत होमीं!
पतिनिकटचि व्हावी पोंचवीली अहो! मी. ३२

शशिसहितचि अस्ता जातसे कौमुदीही
सहचि जलधराच्या वीजही जाय, पाहीं;
धरितिच पतिमार्गा कामिनी सर्वरीतीं
जडहि जणुं जगीं या हेचि रीती वरीती! ३३

प्रियतमतनुभस्में पावनें याच आतां
मम कुचयुगभागा चर्चुनीयां समस्ता,
रचिन मम तनूतें अग्निमाझारिं मी या
मृदुल नवदलांची मानुनी ती सुशय्या ! ३४

अयि मधुर वसंता ! आमुची पुष्पशय्या
रचलिस कितिदां तूं ! येशि आम्हांस साह्या;
कर जुडुनि नमूनी याचितें मी चितेतें
तुजसि; झणिं मला दे संप्रती येवढें तें ! ३५

अनलिं मम तनूतें अर्पुनी चेतवावा
त्वरित मलयवातें तो चिताग्नी सख्या ! त्वां;
क्षणहि मजविना ना कांत माझा सुखावे,
खचित तुजसि मित्रा ! हें असे सत्य ठावें. ३६

करुनि सकल ऐसें, तूं आम्हांलागिं दोघां
वितर मग जलाची एकली अंजली गा !
मजसहचि मनोभू तो तुझा बंधु नाकीं
विभजन न करोनी एक सेवील ती कीं. ३७

तशि करिशिल जेव्हां और्ध्वदेहक्रियाही
प्रिय मम पतिसाठीं, देइं रे ! त्यासि, पाहीं;
नवकिसलययुक्ता मंजरी आम्रजाता,—
प्रिय अतिशय त्या कीं त्वत्सख्याला, वसंता !" ३८

रति, जंवर अशी हो जीवितत्यागकामा
तंवर गगनवाणी बोलली देत शर्मा
हृदचि सकळ होतां शुष्क जी होय कष्टी
शफरिवरि अशा कीं ती गळे आद्यवृष्टि ! ३९

“ अयि सुमशरभार्ये ! सत्य हें, भेटशील,
लवकरिंच तुझ्या तूं वल्लभातें सुशील
शलभसम गती ही शंभुनेत्राग्निपातें
पतिस तव कशानें पातली, ऐक त्यातें. ४०

हृदयिं, सुमशराच्या प्रेरणेनें विरिंचि
जयिं धरि अभिलाषा आपुल्या कन्यकेची;
शमवुनि सुविवेकें विक्रिया तैं तयानें
तव पतिसि दिला जो शाप, तो त्या लया ने. ४१

‘ हर गिरितनयेच्या पाहुनीयां तपातें
वरिल जयिं तियेतें सुप्रसन्नें स्वचित्तें,
वितरिलचि अनंगा सांगता तो तदीया
हृदयिं अनुभवोनी सौख्यराशी अमेया. ’– ४२

वदत विधि अशीही उक्ति जैं धर्म याची,
अवधि कथि मनोभूशापनिर्मुक्ततेची
अशनि, अमृत –दोनीं निर्मिण्याचा प्रभाव
वशिवर, घन –दोघांमाजिंही या सदैव. ४३

म्हणुनि तव वपू हें रक्षिं गे ! कामकांते !
पतिसह भवितव्या संगमा योग्य हो तें;
खरतर रवितापें जी नदी शुष्क झाली
पुनरपि सलिलौघा पावते वर्षकालीं. ” ४४

( मंदाक्रांता )

ऐशा रीतीं रतिसि वदलें कोणसें गूढमूर्ति,
प्राणत्यागीं मति करविली मंद तेणें तिची ती;
विश्वासोनी गगनवचनीं तो सखाही स्मराचा
आश्वासी त्या सतिसि वदुनी सत्यशब्दार्थवाचा. ४५

( वसंततिलका )

कालप्रतीक्षण करी विपदस्त व्हाया,
    दुःखें कृशा मलिनशी मग कामजाया;
तेजोविहीन दिवसां शशिमूर्तिशी हे
    जी कीं दिनान्त घडण्यास्तव वाट पाहे. ४६

'रतिविलाप' नामक सर्ग चवथा
समाप्त

# सर्ग पांचवा

[ श्लोक १–६ गौरीचा शंकरासाठीं तप करण्याचा निश्चय, ७–२९ हिमालयाच्या गौरीशिखरावर तिचें तपोव्रत, ३० गिरिजाश्रमांत एक तेजस्वी ब्रह्मचारी येतो. ३१–५० गौरीनें केलेलें स्वागत स्वीकारून तो तिला कुशलप्रश्न व यौवनांत अशा तपश्चर्येचें काय कारण तें विचारतो. ५१–६१ गौरी लज्जेनें हृद्गत सांगूं शकत नाहीं तेव्हां तिची सहचरी ' शंकर वर मिळावा यासाठीं हिचें हें तप आहे ' असें सांगून तिचें शंकरप्रेम वर्णन करते. ६२–६४ तो बटु पुनः, ' हें खरें काय ? ' असें आश्चर्यानें पार्वतीस विचारतो. व ती 'होय' म्हणून आपली उच्चपदाची आकांक्षा व्यक्त करते. ६५–७३ ब्रह्मचारी सर्वप्रकारें शंकराचें दोषवर्णन करतो व असा वर तूं वरूं नयेस असा तिला आग्रह करतो. ७४–८४ बटूनें शंकराची निंदा केल्यामुळें गौरीला त्वेष येऊन ती शंकराचें समर्थन करते व तो बटु पुनः कांहीं बोलणार असें पाहतांच ती तेथून जाऊं लागते तोंच बटुवेष टाकून श्रीशंकर प्रकट होतो व तिला धरतो. ८५ गौरीसात्त्विकभाववर्णन. ८६ इष्टप्राप्तीनें गौरीचे तपःक्लेश नाहींसे होतात. ]

( वसंततिलका )

जाळी समक्षचि तसें मदना पिनाकी,
यासाठिं चित्तिं हतकामचि होय जी कीं,
निंदी मनीं गिरिसुता निजरूप खेदें;
सौंदर्य तें विफल, जें न सुख प्रिया दे. १

गौरी तपश्चरणिं साधुनियां समाधि
पावो स्वरूप सफलत्व अशी धरी धी;
सत्प्रेम एरविं तसें मिळणें कुठोनी ?
भर्ताहि केविं तसला ? न सुलभ्य दोनी. २

जाणोनियां सुतपिं निश्चय तो सुतेचा
संपादण्यास्तव गिरीशचि कांत साचा,
मेना तियेसि हृदयीं कवळूनि सांगे
" बाले ! मुनिव्रत महान् नच तूं करीं गे ! ३

ज्या देवता तुज हव्या, असतीच गेहीं
   बाले! कुठें तप? कुठें तव गे! तनू ही!
साहेल कोमल शिरीष षडंघ्रिभार,
   त्यातें कसा विहगभार सहेल थोर?" ४

ऐशी जरी करि तिला उपदेश मेना
   तीतें तिचा सुदृढ निश्चय वारवेना;
इष्टार्थसक्त मन, निम्नग वारिवेग —
   हे दोन कोण फिरवूं शकणार ओघ? ५

सुज्ञा सखीकरविं ती, मन जाणत्याला
   धीरा पित्यास वदली मग एकवेळां,
व्हाया फलान्वित समाधि अरण्यवास
   प्रार्थी तयासि निजनिश्चयपूरणास. ६

तो योग्य आग्रह तिचा सुखवी पित्यातें,
   दे तो तदा अनुमती अतिपूज्य त्यातें
गौरीहि जाय शिखरीं शिखिसन्निवासीं
   झालें पुढें प्रथित नाम तिचेंच ज्यासी. ७

जो लोल हार करि चंदन लुप्त वक्षीं,
   तत्त्याग ती दृढमती करि सारसाक्षी;
बालार्कपिंगल अशा वरि वल्कला ती,
   तुंगस्तनें जरिहि योग्य न बंध होती. ८

शोभे तिचें मुख सुसंस्कृत केशिं जेवीं
   तेवींच शोभत जटा जरि ठेवि देवी;
साजे सरोरुह न केवळ भृंगसंघें,
   शैवालसंगतिहि तें तितुकीच भा घे. ९

बांधी व्रतास्तव गुणत्रययुक्त मौंजी,
जी स्पर्शनें उपजवी तिज रोमराजी,
अभ्यास नाहिंच जिचा तिज पूर्वकाळीं,
आली तिनें कटितटीं अतिमात्र लाली. १०

बिंबाधराप्रति न रंगविण्यांत रंगे,
ना चेंडु घे अरुणित स्तनलिप्तरंगें,
दर्भांकुरव्रणित जो धरि अंगुलींतें,
रुद्राक्षमाळ वरिली अजि त्याच हस्तें. ११

निर्मूल्य सच्छयनिं लोळुनि वेणिंतून
पुष्पें गळोनि दुखवीति जिला रुतून,
ती स्थंडिलावरिच केवळ घे बसोनी
निद्रा, करोनि शिर बाहुलतोपधानीं. १२

घेतां व्रता दिलिं तिनें जणुं ठेवशीं हीं
घ्याया पुन्हां उभयतां उभयांकडेही—
तन्वी लतांसि अपुल्या सविलास लीला,
तैशा मृगींप्रति विलोल कटाक्षमाला. १३

पाजूनि वाढवि घटस्तनिंच्या पयें ती,
गौरी स्वतां निरलसा तरुबालमूर्ती,
वात्सल्य पुत्रसम ज्यांप्रति अग्रजातां
ये ना गुहासहि पुढें मुळिं घालवीतां. १४

चारी मृगां निजकरीं वनधान्यबीजें,
विश्वास त्यां उपजवी इतुक्यापरी जें,
तन्नेत्रयुग्म कुतुकें मृगलोचनांशीं
यावें सख्यांनिकट देखिल मापण्यासि ! १५

स्नानादि आचरि करी, विधियुक्त होम,
लेऊनि वल्कल करी जप मंत्रनाम,
ऐशा तिला ऋषिहि येति पहावयातें;
न श्रेष्ठ आचरणिं ते बघती वयातें. १६

सोडूनि वैर मुळचें, पशुवृंद वर्ते,
जेथील वृक्ष अतिथींसि अभीष्टकर्ते,
प्रत्येक नव्य उटजांतरिं होमदीप्ति,
तें होय पावन तपोवन विश्वतृप्ति. १७

जें वाटलें तिजसि, कांक्षित त्या तपानें
नोहेचि लभ्य तिचिया तितुक्या प्रमाणें,
तैं लागली तप सुदुष्कर आचराया
चित्तीं गणोनि न मुळीं मृदु आत्मकाया. १८

जी कंदुकें विहरतांहि दमूनि जाई
ती आचरी मुनिजनव्रत तीव्र तेंही;
केली सुवर्णकमलीं जणुं तत्तनू ती
जात्याच जींत मृदुता, तशि थोर शक्ति, १९

ग्रीष्मातपांत, जळत्या चतुरग्निमाजीं
राहे शुचिस्मितमुखी तनुमध्यमा जी
नेत्रद्वयें दिपवित्या सवित्यासि पाहे
एकाग्रदृष्टि, बघते नच अन्यथा हे. २०

ऐसें तिचें वदन तें अति तापलेलें
सूर्यातपीं कमलसुंदर कांति ल्यालें;
त्या मात्र दीर्घतमशा तिचिया अपांगीं
आली च्छवी हळुहळू अलिकृष्णरंगीं. २१

६०३६

हो प्राप्त जें जल अयाचित, तेवढें ती
सेवी, तसेंचि अमृतात्म शशाङ्कदीप्ति;
आहार हाच करुनी उपवास सोडी;
तद्वृत्ति, तेविं तरुवृत्ति, अभिन्न जोडी. २२

जी काष्ठसिद्ध अनलें, रविनेंहि तेवीं
हो तापली बहुपरी अतिमात्र देवी,
ग्रीष्मांतिं काय भिजतां नवबिंदुपातें
सोडीत बाष्प अवनीसह ती किती तें ! २३

राहोनि पांपणिवरी क्षण खालिं आले,
नीचौष्ठ ताडुनि बृहत्कुचिं चूर्ण झाले,
अब्बिन्दु* ते नव अडोनि वलित्रयान्तीं
नाभ्यंतराप्रति तिच्या उशिरांचि येती. २४

पर्जन्यवातिं उघड्यांत शिलेवरी ती
झोंपे, जिणें त्यजियली वसती गृहान्तीं
ऐसें तपश्चरण तें कठिनात्म, नेत्रीं
विद्युत्कटाक्षिं अपुल्या बघतात रात्री. २५

वारा हिमोत्किर असा अति शीत वाहे,
त्या पौषरात्रिंहि उभी उदकांत राहे;
तैं चक्रवाक-मिथुनें विरहार्त साचीं
येतां पुढें तिज दया उपजे तयांची. २६

तैसें तिचें वदन, पद्मसुगन्ध ज्यास,
ज्या पाकळीच हलता अधरोष्ठ खास,
देई जला जणुं सरोजविभा गुणानें,
संपत्ति पद्मवनिंची हिम जैं लया ने. २७

* पाण्याचे बिंदु.

पर्णें स्वयें गळलिं केवळ वृत्ति तेणें
सीमा तपश्चरणिं ही परि तींहि घेणें
टाकी, वदे प्रियचि जी म्हणुनी सुवर्णा
तीतें पुराविदिं दिली पदवी ‘अपर्णा’. २८

ऐसें मृणालसम कोमलगात्र गौरी
रात्रंदिन श्रमवुनी व्रतिं त्या प्रकारीं
संपादि जें तप, तयें दृढगात्रशाली
देहें कृता मुनितपावरि मात झाली ! २९

पालाशदंड, हरिणाजिन घेतलेला
जो ब्रह्मतेजिं तळपे, धरि जो जटांला,
ये प्रौढवाक् कुणि असा गिरिजाश्रमांत,
भासे जणों प्रथम आश्रम मूर्तिमंत. ३०

आतिथ्यशील गिरिजा बहुमानचित्तें
सामोरि जाउनि तया करि सत्कृतीतें
ज्यांची मति स्थिर असे सुजनीं विशिष्टीं
तुल्यीं गुणींहि अतिगौरवपूर्णदृष्टि ३१

पूजा तिची विधियुता सकलाहि घेतो,
झालाचि आर्तिपरिहार निदर्शवी तो;
गौरीमुखा सरलदृष्टिच पाहि, बोले,
ना सोडितां किमपि सज्जनरीति चाले. ३२

“ होमा समित्कुश मिळे तुज अप्रयासें !
स्नानासि योग्य असतें जल, जेविं सोसे !
तूं आत्मशक्त्युचित कीं तप आचरीसि !
गे ! आद्य साधन तनूच शुभार्जनासि. ३३

तूं पाणि घालिशि जयांप्रति, त्या लतांना
येतात पल्लव नवे अतिवैभवें ना ?
ज्यांना तुला करवते तव ओष्ठसंगें–
भूषा अलक्तकिं न ज्या चिर केलि रंगें. ३४

स्नेहें करस्थ तव दर्भ हरोनि नेती
त्या तूं प्रसन्न असशी मृगिं ना स्वचित्तीं ?
हे अंबुजाक्षि ! निज लोल विलोचनीं या
ते पाहती नयनसाम्य तुझें कराया ! ३५

जें बोलती जगतिं ‘ रूप न पापवृत्ति ’
ती वाटते निरपवादचि सत्य उक्ति,
कीं सुंदरांगि ! अनुकार तुझ्या गुणांचा
सुज्ञे ! तपस्विजनही करितात साचा. ३६

जेवीं विशुद्धचरितीं तुझिया नितांत
होई पवित्र सकुटुंबहि अद्रिनाथ,
स्वर्गच्युतीं सुरसरिज्जलिं तेविं नाहीं
सप्तर्षिदत्त बलिपुष्पिं विराजितांहीं. ३७

धर्मार्थकाममय या त्रितयीं अदोष
भासे वरिष्ठ मज धर्म अजीं विशेष–
कामार्थ सोडुनि तुवां सुविचारशीले !
धर्मीच जें मन असे विनिमग्न केलें. ३८

सत्कारिलें अजि तुवां मज ज्या विशेष
त्या तूं मला पर असें समजूं नयेस.
हे सुंदरांगि ! म्हणती मुनि सर्व मुख्य
कीं, सज्जनीं घडत सप्त पदींच सख्य. ३९

यासाठिं शांतहृदये ! कुतुकेंचि मातें
माझें द्विजातिचपलत्व विचारवीतें
नोहे रहस्य जरि कांहिं विशेषसें गे !
मी जें विचारुं म्हणतों, मजलागिं सांगें. ४०

आद्य प्रजापतिकुलामधिं जन्मलीस,
त्रैलोक्यसुंदर अशी तनु पावलीस,
ऐश्वर्य लोळत पदीं, वय यौवनाचें,
याहून तें फल तपें, वद होय कैचें ? ४१

कांहीं अनिष्ट विपदोघनिवारणार्थ
धीरा स्त्रिया तप असें करिती समर्थ,
आलोकितां परि विचार करूनियांही
भासे न सुंदरि ! तुझी तशि गोष्ट कांहीं. ४२

सौंदर्य हें तव न योग्य विपत्ति याया,
व्हावाहि केविं अपमान पित्याघरीं या ?
कोणाकरीं न तव धर्षण सुभ्रु ! होई;
घ्याया मणी, फणिपुढें कर कोण नेई ? ४३

तूं भूषणें त्यजुनि यौवनिं कां बरें गे !
वार्धक्ययोग्य तरुवल्कल लेशि, सांगें.
कैसी प्रदोषिंच विभा शशितारकांची
टाकूनि घेइ रजनी अरुणासि साची ? ४४

स्वर्गार्थ हें तप, तरी श्रमसी वृथाचि,
तातप्रदेशचि तुझे वसती सुरांची;
पत्यर्थ वा व्रत, तरी नलगे समाधि;
हो रत्न शोध्य जगिं, तें न कुणासि शोधी. ४५

अनुक्रम ५५
विभाग ३/०४
क्रमांक
नों. दि.

निःश्वास उष्ण तव सांगति चित्तहेतु
  मच्चित्त हें तरिहि संशय घे, परंतु;
त्वत्प्रार्थनोचित असा न कुणी दिसेचि,
  त्वां प्रार्थितांहि न मिळे अशि गोष्ट कैंचीं! ४६

लोंबेचि पिंगटशि लोंबति शालिचीं कीं,
  निर्बन्धना अशि जटातति गाल झांकी;
–कर्णांबुजद्युति किती दिन जेथ नाहीं–
  कैसा त्वदिष्टवर निष्ठुर हें न पाही? ४७

कष्टीं मुनिव्रतिं तनू तव कार्श्य त्याली,
  भूषास्थलें दिनकरातपिं कृष्ण झालीं,
ऐशा तुला बघुनि कोण न दुःख पावे?
  इंदुच्छवीसि दिवसां न गमे बघावें. ४८

नेत्रांबुजें मधुकटाक्षिं विलोकणारीं,
  ज्यां पांपणी कुटिलकेशिं विराजणारी;
ऐशा तुला अजुनि दाखवि जो न तोंड
  तो रूपगर्व करि कांत तुझा उदंड! ४९

तूं थांबणार अजुनी किति काल? गौरि!
  मद्ब्रह्मचर्य तप संचित आजवेरी;
घे तूं तदर्ध, मिळवीं तव इष्ट कांता;
  गे! सांग, दे कळुं भलें मज त्यासि आतां." ५०

ऐसें शिरोनि हृदयीं द्विज तो विचारी,
  सांगों शके न निज हृद्गत त्यासि गौरी;
नेत्रें अनंजन अशीं वळवूनि पाहे
  पार्श्वस्थिता सहचरीप्रति आपुल्या हे. ५१

बोले सखी मग तिची अशि त्या द्विजातें
“ साधो ! कुतूहल जरी तरि ऐक कीं तें –
ज्यासाठिं ही निजतनू तपिं योजि बाला,
जैसें सरोरुह उन्हासि निवारण्याला. ५२

ही मानिनी अवगणोनि दिशाधिनाथ
इंद्रादि चार जण तेहि महर्धिमन्त,
इच्छीतसे प्रभु पिनाकधरा वराया,
सौंदर्य ज्या स्मरहरा न शके हराया. ५३

हुंकार भीषण करूनि निवृत्त केला
जो त्र्यंबकें विशिख, मन्मथ सोडि ज्याला
तो पोंचतां न गिरिशा, गिरिबालिकेला
लागे हृदीं, जरि शिवें स्मर दग्ध केला ! ५४

हो तेथपासुनि समन्मथचित्त बाला,
यत्केशही मळवि चन्दन लिप्त भाला
बैसे जरी हिमशिलांवरि तातगेहीं
नोहे सुखी तरि सखी लवही कदा ही. ५५

लागे जशी शिवकथानक गावया ती
बाष्पें गळा भरुनि ये, नुमटे तदुक्ति
ती तत्स्थिती बघुनि किंनरराजकन्या
संगीतिं मैत्रिणि तिच्या रडल्याहि वन्या. ५६

यामीं तृतीयिं सहसाचि विनिद्र, रात्रीं
होऊनि, लोचन मिटी क्षण चारुगात्री,
शून्यस्थलींच करुनी कर कंठपाशीं
बोले “ कुठें असितकंठ ! निघोनि जाशी ! ” ५७

"जो वानिलासि बुधिं तूं सकलाधिवासी
मत्प्रीति ना विदित त्या तुज होय कैसी!"–
शंभूसि मुग्धहृदया अशि बोल दे ते,
एकांतिं काढुनि हरप्रतिमा स्वहस्तें. ५८

चिंतूनिही, नच दुजा सदुपाय पाहे
विश्वंभरासिसि, तदा अमुच्या सवें हे
आली तपोवनिं सखी तप आचराया
घेऊनियां अनुमती गुरुची व्रता या. ५९

जे लाविले तरु हिनें, फल त्यांसि आलें,
ज्यांहीं हिचें फल समग्रहि पाहियेलें;
हीच्या अजूनिहि, तथापि, मनोरथाला
शंभुश्रिता, मुळिंच अंकुरही न आला. ६०

पाहूनि जीस नयनाश्रु सखींस लोटे
त्या या तपःकृश उमे कधिं शंभु भेटे?
जो प्रार्थिलाहि न मिळे!–कधिं इंद्र वर्षी
शुष्का क्षताकुलित नांगरिल्या क्षितीसि?" ६१

हृद्भावना प्रकटती सखिची ऋजूक्ति
घे ब्रह्मचारिवर सुंदर ऐकुनी ती;
तो हर्षचिह्न लपवोनि उमेसि बोले –
कीं 'हें खरें सकल, कीं, परिहास बाले?' ६२

वाटे कळीच जणुं कीं सरसीरुहाची
ऐशा करीं स्फटिकमाळ धरोनि साची
बोले मिताक्षर कसें तरि पार्वती ती
योजूनि शब्द किति काल तरी स्वचित्तीं:– ६३

"जें तूं श्रुतिश्वर! ऐकसि, सत्य सारें
मद्ध्येय हो खचित तुंग अतीव हें रे!
हें अल्प काय तप साधन त्यास होतें?
नाहींच वस्तु, न धरी मन हांव ज्यातें." ६४

तैं बोलला द्विज "महेश्वर ठाउका गे!
आहे; पुन्हां तव तदर्थंचि चित्त वागे?
ती चिंतितां परि अमंगल वृत्ति त्याची
ना देववे मज रुकार तुला कदाचि! ६५

हे तुच्छकाग्रहपरे! न कळे विवाहीं
त्वद्धस्त कौतुक धरोनिच केविं साही –
त्या नागकंकणकरें पहिलेंचि तैसें
केलें करग्रहण सुंदरि! सांग खासें? ६६

याचा विचार तरि तूंचि उमे! करावा
संयोग केविं उभयांप्रति योग्य व्हावा –
हंसांकिता नववधूधृत त्या दुकूला
त्या तेविं रक्तमय कांतगजाजिनाला? ६७

जीं पुष्पकीर्ण अवनीवरि रम्यगेहीं
जातीं पदें तव अलक्तकरंजितें हीं
भूरंजनार्थ शवकेशयुत स्मशानीं
देईल त्यां अरिहि संमति काय कोणी? ६८

याहून काय दुसरें घडणें अयुक्त?
कीं प्रेतभस्म हरवक्षिं भलें निषक्त,
तें लागणें तव कुचांतरिंच्या विभागीं
ज्या लेपलें सुरभिचंदन हो शुभांगि! ६९

होईल हीच तव आधिं विडंबना ना ?—
  कीं श्रेष्ठवारणिंच वाहन योग्य याना
ती वृद्ध बैलिं बसलीस बघूनि तूतें
  होतील सस्मित महाजन सर्वही ते. ७०

व्हावा कपालिसह संगम तो म्हणोनि
  हीं जाहलीं खचित संप्रति शोच्य दोन्हीं—
ती कीं कला प्रचुरकांति कलाधराची,
  आणीक तूं सकललोचनचंद्रिकाचि ! ७१

काया विरूपनयना, कुलही न ठावें,
  त्याचें दिगंबरपणें धनही कळावें;
जें कीं कुरंगनयने ! बघती पतींत
  त्याचा धरी लव तरी, वद, भूतनाथ. ७२

सोडूनि देइं तव हा अनभीष्ट हेतु
  तैसा कुठें हर ? कुठें शुभलक्षणा तूं ?
शूला स्मशाननिहिताप्रति वेदमार्गें,
  यूपा जसी, करिति सत्कृति साधु का ? गे !" ७३

ऐशा विरुद्ध वदत्या बटुलागिं गौरी
  कंपें जिचा अधर दावित कोप भारी,
मोडोनियां भृकुटि लोचनिं रक्तकोणीं,
  ती वक्रदृष्टि करुनीच बघे वळोनी. ७४

बोलेहि त्या "हर न जाणसि तथ्यतेनें;
  मातें म्हणोनिच वचें वदतोसि हीनें;
यद्धेतु ना कळत, भिन्न परांहुनी जें
  ऐसें महच्चरित निंदिति मंद माजें. ७५

व्हावा विपत्तिलय यास्तव मंगलांतें
  संसेविती विभवकामुक वा तसे ते
जो कीं शरण्य जगता, मनिं जो निरिच्छ,
  आशाळभूतिं धृत तीं, परि त्यासि तुच्छ. ७६

आहे अकिंचन, परी विभवें विसर्जी;
  त्रैलोक्यनाथहि, वसे शवभूमिमाजीं;
रूपें भयंकर, परी 'शिव'नाम ज्याला,
  ज्ञाता यथार्थपणिं त्यासि न कोणि झाला! ७७

तें विश्वमूर्ति वपु ना कळतें कुणाही,
  हो भूषणाढ्य, अथवा विलसो धृताहि
हो हस्तिचर्मधर, पांघरुं वा दुकूल,
  कीं हो कपालि, शिरिं वा धरुं इंदु बाल. ७८

संसर्ग तत्तनुशिं येत चितारजाला,
  पावित्र्यकारि गुण त्या म्हणुनीच आला,
जें कीं पडे गळुनि तांडवनृत्यकालीं
  तें लाविती सुरहि सादर आत्मभालीं. ७९

जाई वृषावरुनि कांचनशून्य, पाहीं,
  त्या दिग्गजीं मदयुतीं बसला वृषाही
वंदी पदीं, करि तदंगुलि मस्तकींच्या
  मंदारफुल्लसुमनोरजिं रक्त साच्या. ८०

उद्घाटितांहि हरदोषचि नीचशीलें
  त्वां एक मात्र गुणगान तदीय केलें–
जो आत्मभूप्रतिहि कारण आद्य झाला,
  त्याचा कळेल तरि जन्म कसा कुणाला! ८१

कां हा विवाद ? तुजला श्रुत ज्या प्रकारें
तैसेंचि सर्व असुं दे हरवृत्त तें रे !
तेथेंचि एक वसली मम वृत्ति सारी,
निंदाविचार न मुळीं करि कामचारी. ८२

थांबीव या सखि ! बटूसि, पुन्हांहि कांहीं
बोलूं बघे, स्फुरति ओष्ठ तदीय, पाहीं;
जो निंदि साधुसि, न केवळ तोच पापी,
तें ऐकि त्यासिहि तयापरि पाप लेपी. ८३

वा मीच दूर रिघत्यें !" म्हणुनी निघे ती,
तद्वल्कलेंहि कुच झांकतिं खालिं येती;
तेव्हां वृषध्वजहि तो निजरूपधारी
मंदस्मितें हंसत तीस धरी स्मरारी. ८४

( हरिणी )

निरखुनि तया कांपे, स्वेदें तदंगहि तें भिजे,
पद उचलिलें जाण्यासाठीं तथोद्धृत तें सजे;
गति अडविता मार्गीं येतां गिरी, सरिता जशी
पुढतिं न सरे, ना वा थारे नगेन्द्रसुता तशी. ८५

( शार्दूलविक्रीडित )

"झालों सुंदरि ! आजपासुनि तुझा मी दास गे ! घेतलें
ज्यालागीं स्वतपें तुवां विकत" हें शर्वेंच सांगीतलें,
तैं तत्काळचि ते व्रतश्रम तिला झालेच ना वाटले;
होतां कांक्षितलाभही न सरती आयास, ते कोठले ! ८६

'तपःफलोदय' नामक सर्ग पांचवा
समाप्त

# सर्ग सहावा

[ श्लोक १-४ गौरी सखीमुखानें श्रीशंकरास कळविते कीं विवाहाची मागणी पिता हिमालय याकडे करावी. तेव्हां शंकरानें चिंतन करून सप्तर्षींना बोलावून घेतलें, ५-१० ऋषिवर्णन, ११ अरुन्धतीवर्णन, १२ त्यांचें स्वागत, १३ अरुन्धतीस पाहून शंकराचे विचार, १४ मदनास पुनः आशांकुर, १५-२४ ऋषींचें शंकरास भाषण, २५-३३ शंकराचें प्रत्युत्तर, ३४ विवाहोत्सुक शंकरास पाहून ऋषींचा विचार, ३५-३६ ऋषींचें हिमालयाच्या ओषधिप्रस्थ नगरीकडे जाणें, ३७-४७ नगरीचें वर्णन व ती पाहून ऋषींचे मनांत विचार, ४८-५२ नगरींत ऋषींचा प्रवेश व हिमालयाकडून त्यांचें स्वागत, ५३-६४ हिमालयाचें ऋषींस भाषण, ६५-८३ अंगिराचें भाषण–हिमाद्रिस्तुति व आपल्या येण्याचा उद्देश सांगणें, ८४-८६ पार्वतीभाववर्णन. हिमालयाचें मेनेस मत पुसणें व तिची संमति, ८७-८९ हिमालय पार्वतीस सांगून, ऋषींना तिजकडून शंकरवधू या नात्यानें वंदन करवितो, ९० ऋषींचा गौरीस आशीर्वाद, ९१ अरुन्धती गौरीस आपल्या मांडीवर घेते, ९२ कन्यावियोगार्त मेनेचें अरुन्धतीकडून सांत्वन, ९३ तीन दिवसांनंतर लग्न व्हावें असा निश्चय. ९४ ऋषींचें शंकराकडे परत येणें व कार्यसिद्धि निवेदन करून स्वस्थानीं जाणें, ९५ शंकराची उत्कंठा. ]

( इंद्रवज्रा किंवा उपजाति )

सखीमुखानें मग विश्वरूपा
एकांतिं गौरी कळवी निरोपा –
‘ विवाहिं देता मज अद्रिराज,
संपादणें त्याकरवीं स्वकाज. ’ १

संदेश सांगोनि सखीमुखें ती
उभी हरापाशिं दृढानुरक्ति,
कीं चूतयष्टी परभृन्मुखी जे
जैशी वसंतानिकटीं विराजे ! २

रुकार देऊनि तदा तयातें
तो जाउं दे गौरिसि कष्टचित्तें;
स्मरे स्मरारी अपुल्या मनांत
ज्योतिर्मयां त्या ऋषिंलागिं सात; ३

अरुन्धतीयुक्त तपोनिधी ते
ज्यांची प्रभा व्यापित अंबरातें;
महेश्वराच्या पुढतीं क्षणांत
सप्तर्षि झाले अवतीर्ण तेथ. ४

तीरींचिया कल्पतरूंवरील
पुष्पें जयांच्या लहरींत लोल,
ये दिग्गजांचा मदगन्ध ज्यांही,
त्या स्नात ते व्योमसरित्प्रवाहीं. ५

यज्ञोपवीतें जयिं मौक्तिकांचीं
ज्यां वल्कलें कांचनपूर्ण साचीं
रत्नांकिताही जपमाळ घेते
संन्यासधारी सुरवृक्ष कीं ते! ६

खालींच ज्यांच्या अपुल्या रथाला
स्थापूनियां स्वध्वज वांकवीला,
सहस्ररश्मी रविनेंहि केला
प्रणाम, पाहोनि वरी, जयांला. ७

स्वबाहुवल्ली कवळूनि राही
वराहदंष्ट्रेसि वसुंधरा ही
तिच्याच सान्निध्यिं मुनीहि तेथें
विश्रान्तितें जे लयिं घेत होते. ८

जी ब्रह्मदेवाकडुनी न झाली
ती राहिली सृष्टि, जयांहिं केली
ब्रह्म्याचिया नंतरचे विधाते
पुराविदीं ख्यात असे जुने ते. ९

जन्मान्तरींचीं बहुशुद्ध ऐशीं
तपें तयांचीं, सुफलें जयांसि —
होतीं जरी प्राप्त, तरीहि ज्यांनीं
तपस्विता सोडियली न कोणी. १०

अरुन्धती त्या मुनिमंडळांत
साध्वी उभी भर्तृपदीं पहात
जी शोभली त्यांत अतीव साची
सिद्धीच त्यांच्या जणुं कीं तपाची ! ११

तीतें, मुनींतेंहि समान मानें
तैं स्वागता आचरिलें शिवानें;
स्त्री कीं, पुमान् कीं, न विचारणा ही;
चारित्र्यपूज्यत्वचि साधु पाही. १२

देखोनि तीतें शिवही मनांत
दारार्थ अत्यादरयुक्त होत;
होतात निःसंशय धर्मकृत्या
पतिव्रता कारण आद्य कीं त्या. १३

धर्मेंच पत्न्यर्थ मनःप्रवृत्ति
होतां शिवाची गिरिजेकडे ती,
पूर्वापराधें भय घेतलेल्या
कंदर्पिं आशालहरी उदेल्या ! १४

ते सांगवेदज्ञ मुनींद्र सारे
विश्वेश्वरा पूजुनि सत्प्रकारें
ते बोलले यापरि, भक्तिभावें–
यदंग रोमांचित सर्व व्हावें, १५

“ अधीत केली श्रुति चांगली जी,
जें सद्विधीनें हुत अग्निमाजीं,
जीं कीं अम्ही थोर तपेंहि केलीं,
तीं आज आम्हांस फळास आलीं ! १६

कीं, जें जगाचा अधिराज होसी
आम्हांसि चित्तामधिं वागवीशी
जें चित्त तूझें सकलज्ञ, ईश !
कोणासही आकळलें न लेश. १७

ज्याच्या मनीं राहसि तूं अनन्य
सर्वांमधें तो सविशेष धन्य,
ज्या चिंतिसी, हे विधिच्याहि धात्या !
धन्यत्व यावें मग ना कसें त्या ! १८

सूर्याहुनी तेविंच इंदुहूनी
असूं खरें हे अम्हि उच्च मानीं,
या त्वत्कृपेच्या स्मरणें अम्हांतें
उच्चत्व त्याहूनिहि आजि ये तें ! १९

सत्कार आम्हांप्रति तूं दिलासि
तेणें बहू मानुं अम्ही अम्हांसि;
सन्मानिती उत्तम लोक साच
विश्वास वाटे स्वगुणीं तदाच. २०

देवा ! अम्हां जें स्मरलेंसि चित्तीं
  आनंद त्याचा वदवे न उक्तीं,
आहेसि तूं आंतरसाक्षि सर्वां
  तूं जाणसी केविं न त्यासि, शर्वा ! २१

समक्ष तूतें जरि पाहतों हें,
  तुझें खरें ज्ञान अम्हांसि नोहे;
प्रसन्न होईं, निजरूप सांग
  ज्याचा न लागे मतिलागि थांग. २२

जो कीं सृजी व्यक्त चराचराला,
  कीं पोषिता जो सृजिल्यासि झाला,
कीं विश्वनाशाप्रति जो करीतो,
  हा अंश तूझा वद कोणता तो ? २३

विचारणा ही गहना अतीव
  राहोच किंवा अजि देवदेव !
त्वां चिंतितां हे अम्हि पातलों जे
  त्या तूं अम्हां कार्य निवेदिं तूझें. " २४

भालस्थिता बालकलाधराभा
  दन्तद्युतीनें बहुवृद्धशोभा
करीत, देई परमेश त्यांतें
  प्रत्युत्तरातें मग या सदुक्तें:— २५

" आहेच तुम्हां विदित स्थिती ही,
  स्वार्थी न माझी कृति कोणतीही;
माझ्या तनू अष्टहि सूचवीती
  परार्थभूता मम ही प्रवृत्ति. २६

तृष्णेमुळें चातकपक्षि कष्टी
  विद्युद्धरा प्रार्थिति अंबुवृष्टि;
सारे मला प्रार्थिति त्याच रीतीं
  ते शत्रुसंत्रस्त सुर, प्रसूति. २७

यासाठिं मी नंदनकाम वाहें,
  गौरी वधू व्हावि म्हणोनि पाहें;
हविर्भुगुत्पत्ति करावयासि
  यष्टा[†] जसा तो अरणीसि कांक्षी. २८

म्हणोनि अद्रीश्वरकन्यका ती
  प्रार्था गिरीन्द्रासि तुम्ही मदर्थी,
संबंध जे सज्जनिं जोडिलेले
  न ते कदाही अयशस्य झाले. २९

नगेन्द्र जो उन्नत सत्प्रतिष्ठ
  धुरा धरेची धरि जो वरिष्ठ
संबंध त्याशीं मम हा घडोनी
  येतां, मला अल्पहि नाहिं हानि. ३०

कन्यार्थ बोला तुम्हि हें म्हणोनि
  सांगावयातें नलगेचि कोणी;
आचार जे सांगतसां तुम्हीच
  होती बुधां संमत तेच साच. ३१

अरुन्धतीही गुणिवंद्य आर्या
  करील या साह्य विवाहकार्या;
कार्यी अशा या बहुधा अतन्द्रीं
  घेती पुढाकार भला पुरन्ध्री. ३२

---

[†] यज्ञ करणारा.

जा ओषधिप्रस्थपुरासि आतां
या हेतुसिद्ध्यर्थ नगाधिनाथा
येथें महाकोशिसरित्प्रपातीं‡
भेटूं अम्ही त्वत्पुनरागमान्तीं." ३३

त्या संयमिश्रेष्ठ विभूसि तैसें
विवाहकामा बघुनी विशेषें,
व्रीडा मुनींना स्वपरिग्रहाची
प्रजापतीच्या तनयां न जाची. ३४

'तथास्तु' ऐसें म्हणुनी निघाला
तेव्हां ऋषींचा सगळाच मेळा;
संकेत केल्या स्थलिं ईश तोही
जावोनियां वाट पहात राही. ३५

गेले उडोनी मुनि अल्पकाळीं
ते खड्गवत् श्यामल अंतराळीं.
ते ओषधिप्रस्थपुरीं त्वरेंचि
येती रयें ज्या उपमा मनाची. ३६

संपन्मयी जी अलकाचि तेथें
गमे निविष्टा उचलोनि कीं ते,
स्वर्गा भरोनी उरल्या सुरांनीं
कीं वासिली जी नगराजधानी! ३७

गंगाप्रवाहें परिखा सभोंतीं,
प्राकारिं दीप्त्यौषधि नित्यकांति,
तटीं महारत्नशिला जियेला,
शोभे वृताही नगरी विशाला. ३८

‡ महाकोशी नदीच्या धबधब्याजवळ.

सिंहांसही भीति न हत्ति जेथें,
जेथील वाजी बिलयोनि* जे, ते
यत्पौर ते किन्नरयक्ष साच,
पौरांगना त्या वनदेवताच ! ३९

जेथील हर्म्याग्रि पयोधरांची
जी गर्जना चालतसे सदाचि;
तिच्यांत संमिश्र मृदंगनाद
टाळ्यांमुळें ओळखुं येइ भेद. ४०

शाखांवरी सुंदरवस्त्रगर्भा
हो कल्पवृक्षांवरि जेथ शोभा;
घरोघरीं चारु अशा पताका
अयत्नसिद्धा सजल्या अनेका. ४१

जेथील त्या स्फाटिकपूर्णधामीं
गच्चीवरी शोभति पानभूमी,
तारागणांची प्रतिबिंबपंक्ति
भासे तिथें कीं सुमहारशी ती. ४२

रात्रौ जिथें औषधिसुप्रकाशें
अंधार तो दुर्दिनिंही न भासे,
येई दिसोनी अभिसारिकांना
स्वमार्ग, ठावेंहि तमिस्र त्यां ना ! ४३

जेथील आयुर्मिति यौवनाची,
तो जेथ पुष्पायुध मात्र जाची,
ये ग्लानि जी जेथ रतिश्रमानें,
ती तेवढी चेतनलुप्ति होणें ! ४४

---

* विशिष्ट दिव्य जातीचे घोडे.

रामा जिथें भ्रूकुटिभंगचिह्नें
ओष्ठांचिया त्या परिकंपनानें
सुरम्यशा अंगुलितर्जनांनीं
प्रियासि कोपें वळवीति मानीं. ४५

उद्यान बाहेरिं सुगंधि सर्व
आख्या जया 'मादन' 'गंध'पूर्व,
यत्कल्पवृक्षातळिं झोंप घेती
प्रवासि विद्याधर शांतचित्तीं. ४६

हिमाद्रिच्या त्या बघुनी पुरीतें
दिव्यर्षि चिंता करिती मनीं ते,
वाटे तयां स्वर्ग मिळो म्हणोनी
केलीं तपें तीं सगळीं फसोनी! ४७

नगाधिपाच्या गृहिं अल्पकाळें
सप्तर्षि वेगें उतरोनि आले
जटाभरें चित्रित वह्निसे ते
ज्यां उन्मुख द्वाःस्थ पहात होते. ४८

नभांतुनी ती अवतीर्ण होतां
क्रमें यथावृद्ध पुढें रहातां,
विराजली सन्मुनिपंक्ति तैं ती,
जसी जलीं भास्करबिंबपंक्ति. ४९

घेऊनियां अर्घ्य करीं गिरीही
त्यां स्वागता दूरवरूनि येई,
वसुंधरेतें नमवीत भारें
अशीं पदें टाकित पूर्णसारें. ५०

जो धातुताम्राधर उन्नतांग
कीं देवदारूत्तमबाहु चांग
दिसे शिलोरस्क असा स्वभावें,
तो हा हिमाद्री सहजीं कळावें. ५१

पूजा करूनी विधियुक्त त्यांची
दावीत त्यांतें पथ तो स्वतांचि
नेले स्वशुद्धांतिं नगाधिराजें
शुद्धात्म ते शुद्धकृती मुनी जे. ५२

वेत्रासनस्था मुनिमंडलातें
जोडोनियां पाणि विनीतचित्तें
बैसोनिही आपण त्यांसमेत
बोले तदा यापरि अद्रिनाथ.– ५३

" अभ्राविना जाहलि काय वृष्टि ?
पुष्पाविना कीं फल येत दृष्टीं ?
तैशीच वाटे मजलागिं आजि
ही आपुली भेट अकल्पिता जी ! ५४

जो मूढ तो मी जणुं बुद्ध झालों,
जो लोह तो स्वर्णपणासि आलों,
भूमीवरूनी जणुं दिव्यधामीं
या त्वत्कृपेनें रिघलों, गमे, मी. ५५

मी आजपासोनिच गम्य लोकां
शुद्ध्यर्थ तीर्थांसम हो, विलोका;
कीं जेथ संतीं स्वनिवास केला
तीर्थत्व येई जगिं त्या स्थलाला. ५६

मी याच दोहींस्तव मानितांईं
शुद्धत्व माझें द्विजवर्य हो ! हें —
शिरावरी स्वर्धुनिच्या प्रपातें,
तैसें भवत्पादविशुद्धतीर्थें ! ५७

विभक्त माझें वपु रूपयुग्मीं
कृतार्थसें मानितसें परी मी —
त्वत्सेवनीं जंगम मत्तनू ही,
ही स्थावरा त्वत्पदचिह्नितांहीं. ५८

अनुग्रहानें अपुल्या विशेष
मदन्तरीं वाढत थोर तोष,
त्यातें मदंगें पुरती न माया
जरी दिगन्तां भरतात तीं या. ५९

हें आपुलें दर्शन नाशवीतें
गुहांतल्या केवळ ना तमातें,
रजोयुता तें द्युतिमन्त भारी
मदन्तरींच्याहि तमा निवारी ! ६०

देखें न कांहीं भवदीय कार्य
असे जरी, साध्य तुम्हां न काय !
वाटे करायासिच शुद्ध मातें
झालां तुम्ही हें अवतीर्ण येथें ! ६१

तथापि मातें कसल्याहि कार्यीं
आज्ञा तुम्हीं द्याविच विप्रवर्यों,
आज्ञा प्रभूंची जणु सत्प्रसाद
वाटेचि भृत्यांप्रति निर्विवाद. ६२

मी हा, तशी हे मम धर्मजाया,
कन्या कुलप्राणचि हे मदीया,—
यांतूनि तुम्हां कुणि कार्य कीजे?
वस्तू अशी नाहिं अदेय कीं जे." ६३

बोलोनि ऐशापरि, तेंच सांगे
गुहांतरींच्या प्रतिशब्दमार्गें,
जणों द्विरुक्ती निजभाषणाची
करी तदा पर्वतराज साची! ६४

कथाप्रसंगांमधिं अग्रगण्य
जो अंगिरा, त्या ऋषिवर्य अन्य
तैं प्रेरिती उत्तर द्यावयातें
हिमालया तो वदला सदुक्तें:— ६५

"जें बोलशी तें, तव योग्य सारें,
त्याहूनि भारी करिशील तूं रे!
मना जशी, त्वच्छिखरांहि तैसी,
समुन्नती सारखि या द्वयासि. ६६

तें योग्य वाटे स्थिर रूप तूझें,
'विष्णू' असें वर्णियलें असे जें
त्वत्कुक्षि कीं सर्व चराचराला
आधार हा मुख्य असे जहाला. ६७

रसातलापासुनि तूं धरेसी
जरी न आधार मुळींच देसी,
कैसा धरी शेष तरी धरा ही
मृणालवत् कोंवळियां फणांहीं? ६८

ज्या स्वच्छ अच्छिन्नपणें वहाती,
ज्यां अब्धिवीचीहि न वारिताति,
अशा तुझ्या कीर्तिनद्या अनेका
करीति पुण्येंचि पवित्र लोकां. ६९

श्रीविष्णुपादोद्भव याजसाठीं
गंगानदी ज्यापरि सर्वदृष्टीं
हो श्लाघ्य ती, तेविं नद्या दुज्याही
त्वत्तुंगशीर्षप्रभवेंहि, पाहीं. ७०

बाजूसि, तैसें वरतींहि, खालीं,
जी विष्णुची व्याप्ति महत्त्वशाली,
त्रिविक्रमीं मात्र तशी तयाची,
तुझी स्वभावेंचि परी सदाची. ७१

यज्ञीं जयां भाग असे, तयांत
त्वां मेळवूनी पद अद्रिनाथ!
केलें तुवां व्यर्थचि मेरुशृंग,
जरीहि तें हैम, तसेंचि तुंग. ७२

काठिन्य तूं स्थावरिं त्या स्वदेहीं
समर्पिलें भासत सर्वथाही;—
हा भक्तिभावें, परि, नम्र काय
पूजीतसे सज्जन पूजनीय. ७३

आलों अम्ही कां तरि ऐक कीं तें,
जें व्हायचें कार्य तुझ्याच हस्तें;
कल्याणकारी पथ दाखवावा,
कार्यांश आम्हांकरिं हाच व्हावा. ७४

जें दर्शवीतें अणिमादि शक्ति,
   लागे न अन्यांप्रति जें सुयुक्ति,
ऐसें धरी 'ईश्वर' नाम सार्थ,
   तैसेंचि जो इंदुकला समर्थ. ७५

अन्योन्यसाहाय्यक शक्तिमूर्ति
   जीं आत्मरूपें वसुधादिकें तीं
योजोनि जो चालवि सर्व विश्व,
   रथा पथीं जोडुनि जेविं अश्व. ७६

देहामधें आंतरभागवासी
   संशोधिती योगिसमूह ज्यासि
पदाति ज्याची भवभीति नाशी,
   ऐसें मुनी बोलति जे मनीषी. ७७

तो शंभु साक्षात् जगदेकसाक्षी
   कन्या तुझी प्रार्थित सारसाक्षी,
अस्मन्मुखें पाठवि तो निरोप,
   स्वयेंचि देता वर जो अमूप. ७८

जैसी सदर्थाप्रति भारती, ते
   द्यावीस तू आत्मसुता तयातें;
कन्या दिली सत्पतितें विवाहीं
   चिंतावहा ती पितया न कांहीं. ७९

विश्वांतरीं जेवढिं निर्मिलेलीं
   चराचरें तेवढिं सर्वकालीं
मानोत माता तव आत्मजेला,
   जगासि कीं ईश्वर तात झाला. ८०

श्रीनीलकंठासि नमूनि, देव
  हीतेंहि त्यानंतर भक्तिपूर्व
वंदोनियां रंगवु देत हीचे
  पदां स्वचूडामणितेजिं साचें. ८१

उमा वधू, आपण तूं प्रदाता,
  हो आम्हि हे याचक, अद्रिनाथा !
शंभू वरस्थानिं, घडी अशी हे
  कुलोद्धृतीतें तव योग्य आहे. ८२

जो स्तव्य विश्वा, स्तवि ना दुजाला
  नान्यासि वंदी, जगिं वंद्य झाला
संबंध त्या जोडुनियां सुतेनें
  हो तूं गुरू विश्वगुरूसि तेणें." ८३

देवर्षि तो यापरि बोलतांना
  पित्याच्चिया बाजुस भावलीना
अधोमुखी होति तदा कुमारी
  मोजीत लीलाब्जदलांसि गौरी. ८४

स्वकामनेची जरि होय पूर्ति
  मेनामुखा पाहि नगेन्द्रमूर्ति
प्रायः स्वकन्यार्थिं असे कलत्र
  कुटुंबिलोकांप्रति मुख्य नेत्र. ८५

अभीष्ट भर्त्यांप्रति जाहल्यानें,
  मेनेसही मानस तोचि मानें;
कीं होय जें ईप्सित भर्तृचित्तें,
  पतिव्रतांतें बहु इष्ट हो तें. ८६

अनुक्रम
क्र
नों. दि.

शैलेन्द्र तैशा मुनिभाषणान्तीं
चिंतोनि योग्योत्तर हेंचि चित्तीं,
करें धरी तो निजकन्यकेला,
जिनें शुभालंकृति वेष केला– ८७

" ये गे ! मुली ! तूं अजि शंकरास
भिक्षा अशी निश्चित जाहलीस,
मागावयातें मुनिवृंद आला
माझा गृहस्थाश्रम ये फळाला ! " ८८

सुतेसि ऐसें वदुनी, नगेशें
ऋषींप्रती सांगितलेंहि तैसें
कीं " त्र्यंबकाची मुनि हो ! वधू हे
सर्वां तुम्हां सादर वंदिताहे. " ८९

स्तवोनियां तें गिरिवाक्य थोर,
अभीष्टकार्यी बहु जें उदार,
गौरीसि देती मुनिवर्य आशी,
यावी त्वरें सत्फलसिद्धि ज्यांसी. ९०

वंदावया सादर नम्र झाली,
तों कुंडलें हैम जिची सरालीं,
सलज्ज ऐशा गिरिबालिकेतें,
अरुन्धती तैं निज अंकिं घे ते. ९१

सुतावियोगें जिस दुःख झालें,
स्नेहें जिचें लोचन होत ओलें,
मेनेसि त्या सांत्वि वसिष्ठजाया
अनन्यपत्नी हर त्रानुनीयां. ९२

तत्काल त्यांना हरबन्धु भावी
पुसे ‘ विवाहा तिथि कोण व्हावी ? ’
‘ दिनत्रयानंतर.’ बोल ऐसा
बोलोनि ते ऊठति चीरवासा. १३

हिमाद्रितें सांगुनियां निघाले
पुन्हां शिवासन्निध सर्व आले,
उद्देशसिद्धी कळवूनि त्यातें,
तत्संमतें जाति नभःपथें ते. १४

( मालिनी )

गिरिशहि बहुकष्टें घालवी काल तोही,
अतिशय गिरिबालासंगमोत्कंठ होई;
अधिवश करिती जे त्या प्रभूतेंहि शर्वा,
करितिल मग कां ते भाव न क्रांत सर्वा ? १५

‘ उमाप्रदान ’ नामक सर्ग सहावा
समाप्त

# सर्ग सातवा

[ श्लोक १–३ शिवपार्वतींच्या विवाहाची सिद्धता करण्याचा ओषधिप्रस्थ-पुरींत सर्वत्र उत्साह, ४–५ पार्वतीवर पित्याचें व स्वकीयांचें प्रेम, ६ गौरीस वस्त्रभूषणादींनीं सजविणें, ७–१० तिची स्नानभूषा व स्नानसमारंभ, ११–२६ नंतरची वेषभूषा, २७–२८ गौरीकडून कुलदेवतादिवंदन आणि आप्त वडील स्त्रीजनांचा तिला आशीर्वाद, २९ श्रीशंकराची प्रतीक्षा, ३०–३६ त्याची वेष-भूषा व खड्गांत प्रतिबिंबावलोकन, ३७–५० नन्दीवर आरोहण, शिवपरिवार, मातृका, गंगा-यमुना, ब्रह्मा, विष्णु व इतर देवगंधर्वप्रभृति यांचें वर्णन, हिमालयाच्या नगरीकडे प्रयाण, ५१ श्रीशंकरास पाहून पौरांस साश्चर्य आनंद, ५२–५३ हिमालयाचें शंकरास स्वागत, ५४ शिवाचें हिमालयास नमन, ५५ नगरप्रवेश, ५६–६२ शंकरास पाहण्यासाठीं नागरिक स्त्रियांची लगबग व उत्कंठा, ६३–६९ राजमार्गानें शंकर जातांना नागरिक स्त्रियांचे आपापल्यांत धन्योद्गार व लाह्यांचा मंगल वर्षाव, ७०–७२ प्रासादमंडपांत प्रवेश व मधुपर्कादि विधि, ७३–७५ शंकरास पार्वतीपाशीं नेणें, परस्पर दृष्टादृष्ट, ७६ शंकराकडून उमेचें पाणिग्रहण, ७७–७८ सात्त्विकभाववर्णन व नवदंपतीची शोभा, ७९–८० होमाग्निप्रदक्षिणा विधि, ८१–८४ लाजाहोम व आचार्यांचा आदेश, ८५ ध्रुव-दर्शन, ८६ ब्रह्मदेवास शिवपार्वतींचें वंदन व त्याचा त्यांस आशीर्वाद, ८८ अक्षतारोपणविधि, ८९–९० लक्ष्मीनें त्यांवर छत्र धरणें व शारदेनें त्यांचें स्तवन करणें, ९१-९२ अप्सरांचा नाट्यप्रयोग व शेवटीं देवकृत शंकरप्रार्थना, ९३ शंकराचा मदनावर अनुग्रह, ९४–९५ दंपतीचा शयनागारप्रवेश. ]

( मंदाक्रांता )

भर्तृस्थानीं शुभगुण तदा पाहुनी शुद्धपक्षीं,
जेव्हां चंद्रद्युति दिनिंदिनीं वाढणारीहि लक्षी,
भूभृन्नाथ प्रिय निकटचे घेउनी आप्तबंधु
कन्यापाणिग्रहणविधितें आचरी हर्षसिंधु. १

गेहीं गेहीं हिमनगपुरीं ओषधिप्रस्थनारी
लग्नाची त्या करिति कुतुकें सिद्धता तेथ सारी;
त्याचें अन्तःपुर, पुरहि तें दंग तीमाजिं होतें,
राजप्रेमें उभयहि तयां कीं कुलैकत्व ये तें. २

मंदारांचीं विखुरलिं सुमें दिव्य जीं राजमार्गीं,
होत्या चीनांशुकमय तशा केतुमाला सुरंगी,
सौवर्णी तीं लखलखितशीं तोरणें लावलेलीं,
जेणें तेथें जणुं गमत कीं पातला स्वर्ग खालीं ! ३

होत्या त्यांतें जरिहि दुहिता अन्यही, पुत्र तैसे
मेनाद्रींच्या हृदिं जणुं उमा प्राणशी एक बैसे
आतां पाणिग्रहण घडुनी जायची या विशेषें
वाटे दृष्टा बहुदिनिं तयां, कीं मृता ऊठलीसे ! ४

जाई अंकावरुनि दुजिया अंकिं ती घेत आशी
भूषेपाठीं मिळवि दुसऱ्या हृष्ट भूषांसि तैशी,
प्रेमस्थानें जरि इतरही बंधुवर्गांसि होतीं,
अद्रीशाच्या सकलहि कुलीं प्रीतिचें केंद्र हो ती. ५

येतां मैत्राभिध मग भला लग्नकार्या मुहूर्त,
योगीं जातां उडुपति तसा उत्तराफाल्गुनींत,
आप्तांच्या ज्या पतिसुतवती अंगना तेथ होत्या
गौरीलागीं सजविति तदा वस्त्रभूषादिकीं त्या. ६

जो सिद्धार्थी* सजत धवलीं मिश्र दूर्वादलांशीं,
जेथें लेई वसन बरवें रेशमी नाभिदेशीं,
हातीं घे ती शरहि§ युवती; यापरी स्नानभूषा;—
अभ्यंगाच्या समुचित तशा शोभवी तीच वेषा. ७

* सिद्धार्थ = मोहरीचे दाणे. § क्षत्रियांच्या लग्नविधींतील आचारविशेष.

तेव्हां ताम्रांगुलि कर तिचा घेउनी स्त्रीय हातीं ।
देई ईशाप्रति गिरिपती, ज्या धरी अष्टमूर्ति, ॥

# शिव-विवाह

जो गौरीच्या तनुमधिं दडे भीत कीं त्र्यंबकाला ।
त्या कामाचा उदित पहिला कोंभसा हस्त ठेला! ॥७६॥

—सुश्लोककुमार, सर्ग ३



गहि गिरीस कुस कन्यापानी । भवहिं समरपी जानि भवानी ॥
पानिग्रहन जब कीन्ह महेसा । हिय हरखे तब सकल सुरेसा ॥

—श्रीतुलसीरामायण,
बालकांड तरंग १८

No. 356.

THE GITA PRESS, GORAKHPUR.

विषय ...........

तैसा दीक्षाविधिसमयिंचा दीप्तिमान् बाण हातीं
घेऊनीयां बहुतचि तयें शोभली बालिका ती,
भासे तेव्हां, खचित अशि कीं, कृष्णपक्षावसानीं
चान्द्री रेखा जणुं रविकरें पोषिली होय मानीं. ८

तत्तैलातें तयिं हरविलें लावुनी लोध्रचूर्ण,
अंगीं तीच्या दिधलिं उटणीं केशरी गंधपूर्ण;
होती ल्याली उचितचि असें वस्त्र जी न्हावयाला
सारा नारीजन मग तिला चौकिं घेऊनि आला. ९

होत्या जेथें मरकतशिला ज्यांवरी मोतियांच्या
कौशल्यानें सुभग रचिल्या आकृती रम्य साच्या;
तेथें तीतें बसवुनि तदा नाहवीती जलांनीं
सोन्याचे त्या कलश भरुनी, चालल्या तूर्यगानीं. १०

गौरी जेव्हां विमलतनु ती मंगलस्नान होतां
अंगीं ल्याली धवलवसना लग्नयोग्या सुकांता,
शोभे तेव्हां जशि वसुमती मेघधारांहिं न्हाली
साजावी कीं धवलित अशा काशपुष्पांसि ल्याली. ११

गेल्या साध्वी तिजसि मग त्या घेउनी सुंदरांगी
स्नानस्थानाहुनि शुभ अशा वेदिच्या मध्यभागीं,
जीतें होते मणिखचित ते स्तंभ कोणांस चारी
खालीं क्लसासनिं, वरि तशी जी छतें शोभणारी. १२

तन्वंगीतें बसवुनि तिथें प्राङ्मुखी तीपुढें त्या
साऱ्या ठेल्या क्षण चकितशा तीप्रती भूषवीत्या;
होतीं त्यांच्याजवळि जरिही भूषणें भूषवाया
रूपें तीच्या सहजमधुरें जाति त्या मोहुनीयां. १३

कोणी तेव्हां सुकवि चतुरा उष्ण गंधाढ्य धूमें
तत्केशांला, बसविहि सुमें त्यांमधें दिव्यधामें,
वेणी त्यांची विरचिलि तिनें चारुबंधा नितान्त
दूर्वायुक्ता धवल मधुकी मालुनी माळ त्यांत. १४

तीच्या अंगीं धवल अगरू लावुनी त्यावरूनी
चित्रें त्यांनीं कुशल रचिलीं पीत गोरोचनांनीं,
स्वर्गंगेच्या पुलिनिं बसले कीं जणों चक्रवाक
पावे शोभा अधिकचि तयांहूनि गौरी सुरेख ! १५

अंभोजाभा परिभवुनियां झांकिती भृंग जीसी,
बिंबश्रीही विमल शशिची अंबुदच्छन्न तैसी,
गौरीच्या त्या असित अलकीं भूषवील्या मुखाची
लक्ष्मी कोठें लवहि नुरवी प्रश्न तत्साम्यवाची ! १६

लोध्री चूर्णा लिपुनि तिचिया लाविलें गंडदेशीं,
ज्याची वर्णच्छवि अतिशयें गौर गोरोचनेसीं;
तेथें लोंबे बहुरुचिरसा तो यवांचा प्ररोह
जो तत्कर्णावरि विलसुनी प्रेक्षकां पाडि मोह. १७

रम्या रेखा विभजन करी ज्याप्रती मध्यमार्गीं,
शोभे ज्याच्यावरि विरलसा लेप लाखी सुरंगी,
लावण्याचा फलसमयही ज्याचिया पातलासे,
चार्वंगीचा अधर विलसे कंपनें तो विशेषें. १८

तत्पादाब्जां करि कुणि सखी रक्त आलक्तकें ती
बोले थट्टा करित चतुरा तैं विनोदें प्रियोक्ति —
"स्पर्शीं यानें सखि ! पतिशिरीं बैसल्या चंद्रलेखे."—
ऐशा तीतें न वदतचि ती मारिते माळ धाकें ! १९

न्हावीं जैसीं सरसिजदलें चांगलीं पोसवोनी
गौरीनेत्रें बघुनिहि तशीं, भूषवील्या स्त्रियांनीं
तत्सौंदर्यीं भर म्हणुनि ना कज्जला लेववीलें,
ना सोडावें शुभविधिसि या बुद्धिनें तेंहि केलें. २०

येतां येतां रुचिर कुसुमें वल्लरी जेविं साजे,
तारा जैशा नभिं उगवतां शर्वरीही विराजे,
शोभूं लागे जशिहि सरिता बैसल्या चक्रवाकीं,
तैशी गौरी विलसलि तदा भूषणीं त्या अनेकीं. २१

देखोनीयां स्तिमित पृथुलीं लोचनांहीं अमूप
बाला गौरी अति सुभग तें दर्पणीं आत्मरूप,
भेटायातें पतिसि हृदयीं होय सोत्कंठ भारी,
भूषावेषा धरिति रमणा हर्षवायाचि नारी. २२

मांगल्याचें मनशिल तसें, तर्जनीमध्यमांनीं
घेई आर्द्रा स्वकरिं हरितालासिही अद्रिपत्नी
गौरीवक्त्रा वरतिं करि ती कर्णिं ज्याच्या विराजे
वर्णें शुभ्रें वलययुग तें हस्तिदंती असे जें;— २३

वक्षीं तीच्या कुचयुग जसें उद्भवायासि लागे
वाढूं लागे झणिंच मग जो कामही त्याजसंगें,
त्या कामातें तिलक करुनी लग्निंचा लावि मेना
कन्याभाळीं कशि तरि मुदें अश्रुंनीं जैं दिसेना. २४

मेना ऊर्णावलय तनयाहस्तकीं बांधितांना
हर्षाश्रूंनीं नयन भरुनी नीट पाहूं शकेना
बांधी तें ती चुकुनि वरतीं कोठल्या अन्य भागीं,
धात्रीनें तें सरकवुनियां आणिलें योग्य जागीं. २५

क्षीराब्धीची जसि विलसते फेनपुंजाढ्य वेला,
पूर्णेन्दूनें चढत जसि भा शारदी पौर्णिमेला,
तैशी शोभे अतिशय उमा रेशमी वस्त्र ल्याली,
पाहायातें निजतनु यदा दर्पणा घेति झाली. २६

वंदायाला निजकुलिंचिया अर्चितां देवतांतें
लावी मेना तिज, निजकुलीं जी प्रतिष्ठाचि वर्ते
दक्षा, योग्या कृति करविती, सत्स्त्रियांलागिं मानें
माता कन्येकरविं करवी वंदनें ती क्रमानें. २७

" तूंतें लाभो! सतत दयितप्रेमधारा अखण्ड "—
ऐशा आशी तिजसि दिधल्या त्यांहिं तेव्हां उदण्ड
कांताधांही परि करुनियां आत्मसात् त्या उमेनें
आशी आप्तोदितहि सगळ्या न्यून केल्याच मानें! २८

उत्साहाला उचित, अपुल्या वैभवाही सजावे
ऐसे कन्याविधि सकलही सारिले अद्रिदेवें;
येवोनीयां कुशलगिरि तो सभ्य बैसे सभेंत,
येतो केव्हां शिव अशि बघे वाट आप्तांसमेत. २९

कैलासींही पुररिपुपुढें त्याच कालीं नवीन
माता साऱ्याजणि वितरती भूषणें प्रीतिपूर्ण;—
जीं लग्नाच्या समयिं पहिल्या त्या तशा योग्य होतीं
घालायातें तनुवरि वरें शंकरें दिव्यकांति. ३०

मांगल्याचीं विविध अशिं तीं मंडनें ईश्वरानें
तत्पूज्यत्वें सकल नुसतीं स्पर्शिलीं आदरानें
त्याच्या होता तनुवरि जसा वेष जो आधिं, तोच
झाला रूपांतरित बरवा जो वरा योग्य साच! ३१

त्याच्या भस्माप्रतिच मुळच्या शुभ्रगंधत्व येई;
शीर्षीं भूषा द्युतिमय अशी, तें कपालास्थि होई;
तैसें त्याच्यावरिल करिचें चर्म झालें दुकूल,
ज्याच्या कांठावरि ठसविले रोचनानें मराल. ३२

भालप्रांतस्थितनयन तो ज्यामधें शोभणारी
शोभे पिंगद्युतिमय अशी तारका कांतिकारी
आलें त्यातें रुचिरपण तें पीतवर्णी टिळ्याचें
जें तद्भालीं बहु विलसलें; न्यून तेथें न कैचें ! ३३

ज्या ज्या ठायीं हरतनुवरी शोभणारे भुजंग
त्या त्या जागीं उचित नगसे होति ते सर्व सांग
तैसें होतां, क्रमण अवघें सर्पकायींच होई
त्यांच्या शीर्षांवरिल मणि ते राहिले त्याच ठायीं ! ३४

ज्याची ज्योत्स्ना तळपत असे ती दिसांही सदाचि
बालत्वानें लवहि नुरली ज्या छटा लांछनाची
भाळीं ऐसा विधु विलसतां नित्य त्या शंकरासि,
व्हावा चूडामणि अपर तो कासया त्यास शीर्षीं ? ३५

आश्चर्याचा प्रभवचि असा आपुल्या जो प्रभावें
नाना वेषां विरचित असे विश्वि या नाट्यभावें,
सान्निध्यस्थें अनुचरगणें आणिलें जें समीप
त्या तो खड्गामधिं निरखिता जाहला आत्मरूप. ३६

आरोहे तो वृषवरिं जणों मूर्त कैलासशीर्षी
टेकोनी तैं निज भर जरा नंदिच्या स्कंधदेशीं
जो, भक्तीनें जणुं, पृथुलता सोडुनी सान झाला,
होतें पृष्ठावरि सजविलें व्याघ्रचर्म तयाला. ३७

शंभूमागें अनुसरुनि त्या मातृका जाति सप्त
यानक्षोभें हलति किति तत्कुंडलें कांतिमंत
तद्वक्त्रश्री द्युतिवलयिता रेणुगौरा बघोनी
वाटे पद्माकर नभ जणों जाहलें त्या मुखांनीं ! ३८

माता साऱ्या कनकरुचि त्या चालल्या तेथ काली
जाई त्यांना अनुसरुनियां जी कपालास्थिशाली
तेव्हां भासे जणुं विलसली नील मेघालि ती कीं
जीच्या विद्युद्वलय पुढतीं, मालिकाहि बलाकी ! ३९

श्रीशंभूच्या पुढतिं गण जे चालती त्यांहिं केले
तूर्यें मोठे गजर शुभ जे देवगेहीं रिघाले;
त्या घोषांहीं सकलहि सुरां ज्ञात हें होइ वृत्त
कीं सेवेचा अवसर असे तो तयां प्राप्त होत. ४०

जें त्वष्ट्र्यानें नव रुचिरसें निर्मिलें आतपत्र
त्यातें हस्तें धरि हरशिरीं तेधवां देव मित्र;
छत्राखालीं हर विलसला झालरीच्या दुकूलीं,
गङ्गौघाच पतन घडतां तो जसा पूर्वकालीं. ४१

गंगा जैशी, तशिच यमुना या नद्या मूर्तिमंत
श्रीशंभूच्या वरतिं धवलें चामरें ढाळितात,
ज्यांच्या योगें गमत जणुं कीं हंस ते तेथ आले
होतें त्यांचें जरिहि मुळचें आपगारूप गेलें ! ४२

भेटायाला प्रथम विधि ये त्या विभुत्र्यंबकास,
श्रीवत्सांका उरिं मिरविता विष्णुहि श्रीनिवास;
त्या दोघांच्या ' जय ! जय ! ' अशा उक्ति त्या ईश्वराच्या
माहात्म्याला करिति हविशा वह्नितें वृद्ध साऱ्या.— ४३

त्या तीन्हीही परमविभुच्या होत एकाच मूर्ति
त्यांचें मोठेंपण, लघुपणा, त्यांसि सामान्य होती; —
केव्हां विष्णूहुनि हर महान्, त्याहुनी विष्णु केव्हां,
वेधा त्यांच्याहुनि कधिं तसा, तेहि त्याहून केव्हां! ४४

त्यातें इंद्रप्रमुख सगळे तेधवां लोकनाथ,
स्वश्रीचिन्हें त्यजुनि धरिला वेष ज्यांनीं विनीत,
ते नंदीतें खुणविति, शिवा भेट व्हावी म्हणोनी
त्यानें शंभुप्रति कळवितां वंदिती बद्धपाणि. ४५

तो ब्रह्यातें शिर लववुनी आचरी स्वागतासी,
श्रीविष्णूतें वच वदुनियां, वृत्रहन्त्या सुहासीं,
शेषां देवांप्रति सकल त्या केवळें दृष्टिपातें
तद्योग्यत्वा अनुसरुनियां त्यां करी स्वागतातें. ४६

सप्तर्षी जैं ‘जय जय विभो!’ यापरी देति आशी
बोलें तैं तो त्रिनयन तयां सस्मितें उक्ति ऐशी —
कीं तुम्ही हे परिणयमखीं योजिले विस्तृतीं या
अध्वर्युत्वीं सकल पहिल्यापासुनी प्रार्थुनीया. ४७

ज्याच्या गाति त्रिपुरविजयी कीर्तिच्या रम्य गाना
तेथें विश्वावसुमुख किती घेउनि स्वीय वीणा,
ऐसा शंभू तिमिर न जया आक्रमी केधवांही
लंघी मार्गाप्रति, शशिकला जो शिरोभागिं वाही. ४८

ज्याच्या कंठीं रुणझुणति त्या स्वर्णघंटा लहान,
ऐसा नंदी नटत गगनीं वाहतो त्यासि तूर्ण,
मेघांमध्यें शिरलिं बहुधा हालवी जो स्वशृंगें,
वप्रक्रीडा जणुं करित तो पंकतुल्याभ्रसंगें! ४९

पावे नंदी त्वरितचि पुरा, गुप्त जें पर्वतेशें,
केलें नाहीं कधिंच अरिंनीं ज्या पराभूत ऐसें;
वाटे कीं ती हरनयनिंच्या दृष्टिच्या स्वर्णसूत्रीं
ओढी वेगें धरुनि पुढतीं त्या पुरी सर्व गात्रीं ! ५०

आला जैं त्या नगरिजवळीं शंभु तो विश्वयोनि
आकाशाचा त्यजुनि पथ तैं चालला भूवरूनी;
उत्कंठेनें बघति सगळे पौर त्या ईश्वरातें,
ज्याची कंठच्छवि मिरविते नीलमेघांशिं नातें. ५१

शंभू येई म्हणुनि हृदयीं हर्षला अद्रिनाथ,
सामोरा त्याप्रति रिघतसे घेउनी स्वीय आप्त,
जे हत्तींच्या वरतिं बसतां वैभवें, येइ चित्तीं
कीं अद्रीचे अवयवचि ते फुल्लवृक्षाढ्य, हत्ती ! ५२

दोन्ही तेव्हां पुरगण तसे ते सुरांचेहि संघ
आले वेगें झणिं उघडल्या त्या पुरद्वारिं ओघ;
जाणों सिंधुद्वय मिसळलें भंगुनी सेतुबंध
ज्याचा व्यापी ध्वनि सकलदिग्भाग घोषें अमंद. ५३

जो त्रैलोक्याप्रति सकलही वंद्य कीं नित्य होत,
त्या शंभूनें नमन करितां लाजला अद्रिनाथ;
तन्माहात्म्यें स्वशिर परि जें नम्र आधींच झालें
ना तें त्यातें मुदितहृदया अद्रिराया कळालें ! ५४

शैलेन्द्राचें मुख विकसलें प्रीतियोगें नितान्त,
जामाताच्या पुढतिं सरुनी तो पुरा स्वीय नेत,
जेथें केली सकलपरिची ऋद्धि ती काय वानूं ?
मार्गीं पुष्पें किति पसरलीं, लोपती ज्यांत जानू ! ५५

तेव्हां कार्यें नगरयुवती टाकुनी आपुलालीं
  साऱ्या ठेल्या भुवनिं भुवनीं पाहण्या चंद्रमौली,
अत्युत्कंठा हृदयिं वसतां जैं त्वरा थोर झाली,
  वामाक्षींच्या सहजिं घडल्या रम्यशा हालचाली. ५६

देखाया त्या लगबगिं निघे जेधवां एक नारी
  गेली माला निसटुनि तिची कुंतलां बांधणारी;
हातीं तैं ती धरुनिच चले आपुला केशपाश,
  बांधायाचें अजि विसरली घाइघांइत ज्यास ! ५७

कोणी दासीकरविं चरणां रंगवी रक्तरंगें
  ती तों अर्ध्यावरिच उठुनी पाहण्या धावुं लागे.
ओल्या पायीं झडकरि तशी ती गवाक्षासि जातां
  केलें वर्णांकित युवतिनें आपुल्या सर्व पंथा ! ५८

रामा कोणी भरित नयनीं आपुल्या अंजनातें
  डोळ्यामाजीं भरुनि उजव्या, वामिं जों ती भरी तें
जातां वातायननिकट ती संभ्रमें दर्शनोत्का
  हातीं तीच्या तशिच सजली अंजनाची शलाका ! ५९

अन्या कोणी नगररमणी जाळिवाटे पहातां
  नीवी तीची शिथिलित जरी हो त्वरेनेंचि जातां,
ना ती बांधी पुनरपि, करें सांवरी अंबरातें,
  हस्तीं रत्नद्युति वलयिंची नाभितें भूषवीते. ६०

अंगुष्ठाग्रीं गुण धरुनियां मेखलेचा, तयांत
  ओंवी बाला कुणि मणि, उठे तों त्वरें दर्शनार्त,
जातां जातां सकळ गळले तैं मणी ओंविलेले –
  अंगुष्ठीं जें अडकवियलें सूत्र तें मात्र ठेलें ! ६१

सोत्कंठा त्या युवति बघती जें गवाक्षांमधूनी
तें वाटे कीं जणुं सरसिजीं टाकिलीं तीं भरूनी;
त्यांचीं नेत्रें विलसलिं तदा भृंगशीं कीं विलोलें,
मद्यामोदें मधुरवदना ज्यांचिया भूषवीलें! ६२

आला तों तो शशिधर विभू राजमार्गें, जयांत
होते केले ध्वज बहु उभे, तोरणेंही सुकांत,
प्रासादांच्या शिखरिं दिनिंही मौलिच्या चंद्रतेजें
शर्वें कांति द्विगुण रचिली जी विशेषाचि साजे. ६३

देखोनियां निजनयनिं, त्या एकल्या दृष्टिसारा,
नारीचित्तीं इतर विषया लाधला नाहिं थारा;
जाणों नेत्रांतरिं सकलही पूर्णभावेंचि साची
त्यांच्या वृत्ति प्रविशलि तदा सर्व शेषेंद्रियांची. ६४

"जें यासाठीं प्रखर तपली कोमलांगीहि गौरी,
तें सर्वस्वीं उचितचि गमे पाहतां हा स्मरारी;
जी कीं याचें मिळवि नुसतें दास्यही, धन्य हो ती;
अंकीं शय्या मिळवि, मग ती धन्य कैसी न होती!" ६५

"सौंदर्यानें सकलहि जनां लोभवीत्या अशांची
या दोघांची जरि न मिळणी घालिता तो विरिंचि,
जाते व्यर्थ श्रम सकलही जे करी तो विधाता
निर्मायाला जगतिं उभयां या अशा रूपवंतां." ६६

"यानें क्रोधें सुमशरतनू दग्ध केली असें जें
येतें वृत्त श्रवणपथिं तें सद्विचारा न साजे;
पाहोनी हें अनुपम असें शंभुसौंदर्य उच्च
वाटे काम त्यजि निज तनू लाजुनीयां स्वतांच." ६७

" चित्तीं ज्याला अभिलषियलें त्या महेशासि दैवें
  शैलाधीश प्रियतम असा थोर संबंध पावे,
तेणें त्याचा क्षितिधरणिं जो मूळचा उंच माथा
  तो सन्मानें अधिकचि गडे ! उंच होईल आतां. " ६८

एकामेकां कथित असतां ओषधिप्रस्थनारी
  ऐशा गोष्टी श्रवणसुखदा शंभुतें होति भारी;
अद्रीशाच्या सदनिं मग तो पातला चंद्रमौलि
  केयूरांना अपटुनि जिथें लाजवृष्टी चुराली ! ६९

लक्ष्मीशाचा कर धरुनियां नंदिपृष्ठावरून
  खालीं शंभू उतरि, रवि कीं शारदाब्दा त्यजून;
ब्रह्म्यामागें अनुसरत तो दाविल्या जागिं पायीं
  शैलेन्द्राच्या सुभगसदनीं श्रीमहादेव येई. ७०

तेव्हां इंद्रप्रमुख अवघे मागुनीं जाति देव
  मोठे मोठे ऋषिहि मग ते सर्व सप्तर्षिपूर्व
त्यांच्या मागें शिवगण तसे येति शैलेशगेहीं;
  श्लाघ्यारंभा अनुसरति कीं अर्थ जे श्रेष्ठ तेही. ७१

तेथें शंभू बसुनि अपुल्या आसनीं सर्व जें जें
  शैलेंद्रानें विधिसह दिलें मंत्रयुक्तें विराजे,
तें तें अर्घ्यादिक, मधु, दधी गव्य, रत्नें न थोडीं,
  घेई सारें, तशि नव दिली रेशमी वस्त्रजोडी. ७२

ल्लेवोनी तीं धवल वसनें शोभणाऱ्या हराला
  नेती अंतःपुरचतुर ते, जेथ ती अद्रिबाला,
जैसे नेती नवशशिकर स्वच्छफेनांबुराशि
  वेलेपाशीं, उपमिति अशी शोभली रम्य त्यासी. ७३

पूर्णेंदूची द्युति अशि तिची पाहतां वक्त्रकांति
झालीं फुल्लें नयनकुमुदें शंभुचीं तेधवां तीं,
त्याचें चेतःसलिलहि वरी सुप्रसन्नत्व तैसें
वाटे आला शरदृतु जणूं, लोकसा कांत भासे ! ७४

दृष्टादृष्ट प्रकट घडतां होति ते कातराक्ष
पाहों जाती तंवरि नयनें आंवरी युग्म दक्ष,
अन्योन्यातें जरिहि बघण्या नेत्र त्यांचे भुकेले
लज्जायोगें अतिशय परी तूर्ण त्यां रुद्ध केलें ! ७५

तेव्हां ताम्रांगुलि कर तिचा घेउनी स्वीय हातीं
देई ईशाप्रति गिरिपती, त्या धरी अष्टमूर्ति,
जो गौरीच्या तनुमधिं दडे भीत कीं त्र्यंबकाला
त्या कामाचा उदित पहिला कोंभसा हस्त ठेला! ७६

रोमांचांनीं तनु डवरली पार्वतीची, तसाच
शंभूच्याही करकिसलयीं उद्भवे स्वेद साच;
त्यांचें पाणिग्रहण घडतां सर्वथा चित्तवृत्ति
कंदर्पानें जणुं विभजुनी वांटिली सारखी ती ! ७७

होतां पाणिग्रहण नुसतें शोभती कोणतेही
यत्सान्निध्यें जगिं वरवधू कांतिमत्त्वें विवाहीं
त्या या दोघां गिरिशगिरिजादंपतींची स्वतांची
वर्णायाला अभिनव विभा व्हावि ती शक्य कैंची ? ७८

होमाग्नीच्या भंवतिं करिती जेधवां सव्य फेरी
तेव्हां दोघे अति विलसती दंपती शंभुगौरी,
वाटे जोडी दिवसरजनी मूर्त एकत्र आली,
एकामेकां धरुनि फिरती मेरुच्या भोंवतालीं ! ७९

स्पर्शानंदें नयन मिटुनी घेतल्या दंपतीतें
होमाग्नीला परिणयनही घालवूनि त्रिधा तें
अग्नीमध्यें हवन करवी तैं वधूच्या करांहीं
लाजामुष्टी भरुनि भरुनी तो पुरोधाचि कांहीं ! ८०

लाजाहोमीं निघत सुरभी धूम जो त्यांत ती ने
बाला गौरी निजवदन तें सांगतां त्या गुरूनें,
तेव्हां शोभा पळभरिं तरी होमधूमास आली
जेणें कर्णोत्पलचि गमला तो तियेच्या कपोलीं ! ८१

झाल्या किंचित् अरुणित तशा आर्द्रही गंडलेखा,
नेत्रीं शोभा द्रवुनि रिझली अंजनाची सुरेखा
कर्णींचेही यवज नव ते अंकुर म्लान होती
धर्म्यें धूमें अशि नववधूवक्त्रिची होय कांति. ८२

सांगे तेव्हां अवितथ वचें तो पुरोधा वधूला
"बाळे ! साक्षी परिणयविधीलागिं हा वह्नि झाला;
आतां भर्ता तव शिव, तयासंगतीं आचरीं तूं
सारें धर्माचरण; न मुळीं त्वां धरावासि किंतु !" ८३

आचार्यांनें तिज कथियलें जें असें सद्विचारें,
गौरीनें तें वच परिसिलें कान लावून सारें;
वाटे तेव्हां जणुं वसुमती तप्त जी ग्रीष्मकालीं
पर्जन्याचें प्रथम जल कीं शोषुनी घेति झाली. ८४

तीतें दावी ध्रुव पति तिचा, कांत जो का नितांत,
जेव्हां तारा ध्रुव निरखिण्या, उत्तरेचा दिगन्त
लज्जायुक्ता कशितरि मुखा उंचवोनी वदे ती
अस्पष्टत्वें कलमधुरशी 'देखिला' ऐशि उक्ति. ८५

ऐसे सारे परिणयविधी त्या विधिज्ञें गुरूनें
केले तेव्हां जनकजननी जे जगा होति मानें,
ते हे गौरीहर उभयही वंदना आचरीती
देवा पद्मासनिं विलसत्या ब्रह्मया नम्ररीतीं. ८६

बोले गौरीप्रति विधि तदा गौरवोनी असें कीं
'हे कल्याणि! प्रथितसुतिनी वीरसू हो त्रिलोकीं!'
होता वाचस्पतिहि जरि तो, ना शके बोलण्या तें
द्यावें आशीर्वचन कसलें अष्टमूर्ति प्रभूतें! ८७

पुष्पादींनीं बहु सजविली जी चतुष्कोण वेदी,
तेथें स्वर्णासनिं बसुनियां शंभुगौरी प्रमोदीं,
लोकाचारा अनुसरिति ते, भालिं आर्द्राक्षताही
लावायाचा विधि, रुचत जो सर्व लोकां विवाहीं. ८८

श्रीलक्ष्मीनें कमल धरिलें त्यांवरी छत्रसें जें
वाटे दंडासमचि बरवा देठ जो त्यास साजे,
अंभोबिन्दू लटकति किती पाकळ्यापाकळ्यांस,
मुक्ताजालाहुनि अधिकचि श्री धरी तद्विलास. ८९

वाग्देवीही स्तवन करि त्या दंपतींना सहर्ष
योजोनीयां द्विविध रचना वाङ्मयाची विशेष,—
प्रौढा शुद्धा वचनसरणी संस्कृताची वराशी,
सौख्यग्राह्या सुगमसरला ती वधूलागिं तैसी. ९०

देवस्त्रींचा मग बघति ते नव्य नाट्यप्रयोग,
होत्या रीती समुचित कथायोग्यशा ज्यांत सांग,
संगीताची मधुररचना ज्यांत भावानुकूला,
शोभे तैशी ललितसुभगा ज्यामधें नृत्यलीला. ९१

नाट्यान्तीं ते अमर सगळे जोडुनी हस्त शीर्षी
वंदोनी हें विनविति तया लग्न केल्या गिरीशा,—
कीं, 'शापाचा अवधि सरुनी काम पावो! निजांग;
आतां त्याच्या करविं करुनी घ्याजि! सेवा अभंग.' १२

गेला सारा विरुनि भगवत्क्रोध कामावरील
बोले, 'हाणो मदन मजही कोण त्या आवरील?'
याच्ञा केली प्रभुसि चतुरीं जाणुनी काळवेळ
जाते सिद्धिप्रति खचित हें आढळे सर्वकाळ. १३

(शार्दूलविक्रीडित)

सोडोनी सुरमंडळी, धरुनियां हस्तें उमेचा कर
शय्यामंदिरिं तो प्रवेश करिता झाला तदा शंकर
जेथें कांचनकुंभ, पुष्परचना तैशी असे साजिरी,
शय्याही अवनीवरी विरचिली होती जयाअंतरीं. १४

लज्जेनें नटली उमा नववधू शय्यागृहीं शोभली,
वक्त्रातें वळवी जरी हरमनोवृत्ती तिथें लोभली;
ना दे उत्तर ती, जरी तिज तिच्या शय्यासख्या बोलती,
कांतें दाखवितां गणास्यविकृती हांसे परी आंत ती. १५

'उमापरिणय' नामक सर्ग सातवा

समाप्त

# सर्ग आठवा

[ श्लोक १–११ नववधूच्या मुग्धावस्थेंतील शृंगारसेवन, १२ मुलीचें सौख्य पाहून मेनेचें समाधान, १३-२० नवदंपतीच्या शृंगारांतील प्रौढावस्थेचें वर्णन, २१–२७ मेरु, कैलास, मंदर, मलय, स्वर्गंगा व नंदनोद्यान यांत शिव-पार्वतींचा विहार, २८–४८ गंधमादन पर्वतावर विहार व संध्यासौंदर्यवर्णन, ४९–५० शंकराचें संध्यावंदनास जाणें व पार्वतीची किंचित् असूया, ५१–७४ संध्या, अंधकार, रजनी, चंद्रोदय व ज्योत्स्ना इ. चें वर्णन, ७५–९१ वनदेवतेनें दिलेल्या मधूचें सेवन व शृंगारोत्कर्ष. ]

( इंद्रवज्रा किंवा उपजाति )

झाल्यावरी लग्नविधी हराची
प्रेमान्विता भीति उमेसि जाची,
जें पाहतां कांतमनीं उदेली
वृत्ति स्मरोद्दीपक सौख्यशाली. १

ती बोलवीतांहि न कांहिं बोले,
जाया बघे आकळिलीहि चैलें,
पराङ्मुखी त्यासि जरी निजे ती,
तरी हरा हर्षचि देइ चित्तीं ! २

तो कौतुकें घे लटकीच निद्रा
पाहे उमा संमुख भालचंद्रा;
हांसोनि त्यानें बघतांचि घेते
नेत्रां मिटोनी, बघि वीज कीं ते ! ३

तन्नाभिदेशीं कर शंभु घाली —
रोधी उमा त्याप्रति कंपशाली,
परी स्वयें तें शिथिलत्व पावे
दुकूल तीचें सहजस्वभावें ! ४

" तूं शंकरा धीटपणेंचि ऐसें
   एकांतिं गे ! सेव गडे ! विलासें "—
सख्या तिला सांगति हें तरी ती
   प्रियापुढें विस्मरलीच रीति ! ५

बोलो म्हणोनी, नसतेचि कांहीं
   जरी तिला प्रश्न करोनि पाही,
तरी कटाक्षें निरखीत नाथा
   ती उत्तरीं हालवि मात्र माथा ! ६

करद्वयें लोचनयुग्म झांकी
   हृतांशुका लाजुनियां प्रिया कीं,
तो भालनेत्रें परि पाहुं लागे,
   एकांतिं ती निष्फळयत्न भागे. ७

तो चुंबितांही नच ओष्ठ दे ही,
   आलिंगितांही शिथिलाचि राही;
न मन्मथा पोषि सलज्ज बाला,
   तरी रतें तुष्टचि ईश झाला. ८

दंतक्षतावीणाचि चुंबनासि
   नखार्पणेंही क्षतशून्य तैसीं
दयायुता ती सुरतासि साहे
   साहे न ती तें जरि तेविं नोहे ! ९

सख्या विचारीत तिला प्रभातीं
   जो रात्रिवृत्तांत, परी उगा ती;
लज्जा वदों देइ न तीज कांहीं,
   सांगायला यद्यपि उत्सुका ही. १०

ती भोगचिह्नें बघि दर्पणांत
तों पाठिमागें स्थित पाहि कांत;
तें पाहतां बिंब तसें तदीय
लाजे न बाला करि काय काय ! ! ११

भोगी जिचें यौवन नीलकंठ,
मेना तिला पाहुनि होइ तुष्ट;
भर्तृप्रिया जाणुनियां मुलीला
हो कीं समाधानचि माउलीला, १२

कष्टेंचि कांहीं दिन यापरी ती
प्रविष्ट केली पतिनें सुरीति,
हळूं हळूं सौख्य कळोनि येतां
न कष्टली कांहिंच शंभुकांता. १३

आलिंगितां, त्या कवळी उरीं ती,
तो चुंबुं जातां मुख दे मुखांतीं,
कांचीस गेला पतिहस्त लोल
तरी न ती रोधित त्या सलील. १४

भावें कळे, अप्रिय जेथ नोहे,
क्षणावधीही न वियोग साहे,
चाटूक्तिनीं पूर्ण असें झणींच
त्यांचें चढे प्रेम दिनीं दिनींच. १५

प्रीती जशी योग्य वरीं तियेची
तैशीच त्याची तिजठायिं साची;
गंगा जशी सोडि न सागरासि,
मुखीं तिच्या तोहि रसाभिलाषी. १६

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.
वाचनालय

एकांतिं शिष्या रतिशास्त्रि केली
  जी शंकरानें गिरिराजबाळी,
दाऊनि त्याच्याच सुकौशलातें
  देई जणों त्या गुरुदक्षिणा तें! १७

प्रियौष्ठ तो खंडित, तोंचि गौरी
  ती वेदनार्ता करिं त्या निवारी;
तन्मस्तकींच्या शशिखंडसंगें
  ती दुःख तें घालवि सर्व वेगें ! १८

ती चुंबित्ये तों शिवभालनेत्रीं
  पडे तियेचें कचचूर्ण रात्रीं
गौरीमुखांभोजसुगंधवातें
  घे काढुनी शंकर तेधवां तें ! १९

ऐशापरी इंद्रियसौख्यमार्गें
  कृपा करोनी रतिकांतिं भर्गें *
अद्रीशगेहांतरिं एक मास
  केला उमेसंगतिं सन्निवास. २०

घे तो अनुज्ञा गिरिराजयाची –
  कन्यावियोगागम ज्यास जाची,
करी विहारा वृषिं बैसुनीयां
  यथारुची, यद्गति अप्रमेया. २१

मेरूवरी येउनि वायुवेगीं
  आलिंगिला गाढ उमाकुचांगीं,
तो धन्य शंभू रतिं रात्र भोगी,
  सुवर्णपर्णीं निजुनी पलंगीं. २२

---

* शंकरानें.

शिला जयाच्या हरिकंकणाङ्का,
जेथें सुधेच्या नत्र बिंदुलेखा,
वसोनि त्या मंदरभूनितंबीं
गौरीमुखाब्जा शिवभृंग चुंबी. २३

जी रावणाच्या ध्वनिनें भियाली
मिठी, म्हणोनी, प्रियकंठिं घाली;
भोगी निशा यापरि चांदण्यांत
शंभू कुबेराद्रिवरी सकांत. २४

तो एकवेळीं मलयाद्रिदेशीं
रमे, तदा गौरिरतिश्रमांसि
निवारिलें चंदनशीतवातें
लवंगगन्धें प्रियशब्दिं कीं तें ! २५

ताडी प्रियाला कनकांबुजें ती
तद्वारिघातें मिटि तीहि पातीं
ते क्रीडती स्वर्धुनिमाजिं ऐसें
मीनालि तीतें दुजि कांचि भासे ! २६

तो नंदनोद्यानिं उमालकांत
घाली शचीयोग्यचि पारिजात
तेव्हां तया देखति सस्पृहा कीं
देवांगना त्या कितिवेळ नाकीं ! २७

गौरीसवें पार्थिव दिव्य ऐसीं
सेवूनि सौख्यें सगळीं विलासीं,
संध्यारुणीं आतपिं गंधमादीं ‡
ये एकदा सांब महाप्रमोदीं. २८

‡ गंधमादन पर्वतावर.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. ६०३५०

बैसे तिथें हेमशिलातलीं कीं
घेऊनि कांतेप्रति वाम अंकीं,
देखोनि संध्यारुण सूर्यकांति
सांगे प्रियेला शिव वर्णुनी ती:–

" त्वल्लोचनांच्या अरुणीं अपांगीं
स्थापूनियां पद्मविभा सुरंगी,
अहा ! रवी संपवितो दिनातें
लयीं जगन्नाथ जगा तसें तें ! ३०

हा खालिं खालीं दिनराज जाई
तुषारसंपर्क करां न होई;
सुरेन्द्रचापोद्भव रम्य कांति
तेणें लपे त्वत्पितृनिर्झरान्तीं ! ३१

हें चक्रवाकद्वय गाढ शोकीं
चंचूपुटींचा बिसतंतु टाकी.
आक्रोशती ते वळवूनि माना
सान्निध्य दैवें सरिं दूर त्यांना ! ३२

सोडोनि जागा दिवसाश्रयाची
तृष्णा हराया करिसंघ येचि,
पितो जला सल्लकिभंगगंधा,*
पद्मीं जिथें पावत भृंग बंधा. ३३

प्रिये ! रवीची प्रतिमा दिगन्तीं
सरीं सुदीर्घा बघ पश्चिमे ती,
सूर्यें जसा काय सरोवराला
हा वाटतो कांचनसेतु केला ! ३४

---

* सल्लकी = एक वनस्पतिविशेष.

गे! गाढपंकीं जलिं पल्वलांत
दिनातपा घालवुनी निवांत,
येतात हे सूकरयूथराजे,
दंष्ट्रा जयांची त्रिसशी विराजे ! ३५

वृक्षाग्रिं हा राहुनियां मयूर,
ज्याचा पिसारा कनकाभ गौर,
दिनान्तिचें आतप कीं पिताहे
ऐसा गमे हें करभोरु! पाहें ! ३६

नभःसरीं पूर्वदिशेस हा जो
अंधार ये तो जणु पंक साजो,
शोषी रवी आतपवारि भारी
किंचित् गमे पश्चिमिं शेष वारी ! ३७

येती मृगें हीं उटजांगणांत,
मूलीं तरूंच्या जलसेक होत,
प्रविष्ट होती मुनिहोमधेनू,
होमाग्निभा आश्रमिं दीप्त वानूं ! ३८

मिटे जरीं पद्म तरीहि, पाहीं,
अद्यापि थोडें उघडेंचि राही,
करूं बघे जो भ्रमर प्रवेश
सप्रेम त्या वाटचि द्यावयास ! ३९

हे दूर ज्याचे मित अंशु गेले,
सुरक्त ऐसें रविबिंब ठेलें;
जेणें गमे पश्चिम रम्य नारी
सकेसरीं बंधुकिं* शोभणारी ! ४०

* पुष्पविशेष.

सहस्रशः सूर्यरथासवें हे
   जे जाति सूर्योष्म पिऊनि, पाहें,
स्तवीति सामीं निहिताग्नितेजा,
   सप्ताश्वही मोदति ऐकुनी ज्यां. ४१

दिनासि ठेवूनि महोदधींत
   तो हा असे पावत भानु अस्त
आयाळ भंगे युगिं, मान वांके,
   तैं चामरीं यद्धयनेत्र झाके. ४२

जातां रवी हो नभ सुप्तसें कीं
   महाद्युतींची गति हींच लोकीं!
आहेत ते तों सगळे विराजे
   जातांचि ते, लुप्तचि सर्व तेजें! ४३

अस्ताचलीं जों रवि वंद्य जाई,
   संध्याहि त्या मागुनि चालली ही;
पुरस्कृता त्यापरि जी प्रभातीं,
   कां आपदीं मागुनि जाय ना ती? ४४

प्रिये! घनाग्रें बघ रंगलेलीं
   ज्यां पीतता, पिंगटताहि, लाली,
तूं पाहशी यास्तव सांध्य देवी
   त्यां कुंचल्यांनीं जणु रंग लावी! ४५

सिंहांचिया केसरकेशसंघीं,
   सुकोमलीं पादपपल्लवौघीं,
त्या धातुपूर्णां गिरिसानुभागीं,
   संध्यातपा भानु जणूं विभागी! ४६

मुनींद्र, यत्पार्ष्णि† न टेकताति
भानूसि हे पूतजलार्घ्य देती
ध्याती परब्रह्म नितांतभावें
कीं सर्वथा निर्मल चित्त व्हावें. ४७

मलाहि संध्याविधिसाठिं जाया
द्यावी अनुज्ञा क्षण तूं व्रता या,
तूंतें सख्या चित्तविनोदकारी
ह्या तोंवरी रंजवु देत गौरि ! ४८

चावूनि किंचित् दशनच्छदातें
त्या भर्तृवाक्या अवमानि चित्तें,
समीपवर्ती विजयेसवें ती
बोले उमा कांहिं उगाचि उक्ति. ४९

समन्त्र संध्याविधि आटपोनी
माघारिं ये ईश, जिथें मृडानी
बोले न ती, चित्तिं जिच्या असूया
तैं कांत बोले तिज हांसुनीयां.— ५०

"सोडीं प्रिये! हा अनिमित्त रोष,
संध्येसि मी वंदित, ना दुजीस;
न जाणसी? हा सहधर्मचारी
त्या चक्रवाकासम भक्त, गौरि! ५१

ब्रह्मा करोनी पितृनिर्मितीला,
ज्या टाकिता आत्मतनूसि झाला,
ती हीच संध्या उदयास्ति वंद्या,
म्हणोनि मी पूजित ती अनिंद्या. ५२

† पार्ष्णि = टांच.

ती ही जिला स्पर्शित अंधकार,
भूमीच आतां जिस एक थार
जीचे तमालाकुल कूल एक
अशीच ती धातुनदी सुरेख ! ५३

अस्तास संध्यातप सर्व जातां
रेषा उरे पश्चिमिं एक रक्ता
रणांगणीं वांकडि रोंविलेली
सशोणिता ती जणुं खड्गवल्ली ! ५४

दिनक्षपासंधिभव प्रकाशा
जैं लोपवी मेरुगिरी अशेषा
तैं हा अनिर्बंधकृतप्रसार
दाही दिशा व्यापत अंधकार. ५५

न ऊर्ध्व, ना खालतिं जाय दृष्टि,
न बाजुला, ना पुढतीं, न पृष्ठीं,
संवेष्टिलासा तिमिरोल्बिं† लोक
हा गर्भवासीं जणुं राहि, देख ! ५६

चलाचलांना, मलिनामलांना,
कीं वांकड्यांना, अथवा ऋजूंना,
साऱ्यांसि केलें तिमिरें समान –
धिक् दुष्ट ! ना ज्यां गुणदोष भिन्न ! ५७

निशान्धकारा निरसावयास
हा येइ वाटे द्विजराज खास,
भासे जणों केतकिच्या परागीं
प्राचीमुखा व्यापियलें, शुभांगि ! ५८

† उल्ब = गर्भावरण.

हा मंदराआड शशी अशी हे
सतारका रात्र विराजताहे,
जैसी प्रिये ! तूंचि सखीसमाजीं
मी ऐकण्या त्वद्वच लोपतां जी ! ५९

दिनान्त हो तों प्रतिबंध ज्यातें;
ज्योत्स्नामिषें कीं स्मित पूर्विंचें तें;
रात्र्याग्रहें दिक् कथि निर्विलंब
तें कीं रहस्यासम इंदुबिंब ! ६०

प्रियंगुच्या पक्कफलासमान
हीं इंदुबिंबें नभिं, तोयिं, दोन.
सुदूरवासी जणुं चक्रवाक–
युग्मासि वेडावति हीं विलोक ! ६१

त्वत्कर्णभूषेस्तव, इंदुचे जे
हे कोंवळे अंशु सुरम्य तेजें –
सखेचसे बालयवांकुरांचे
तोडूंहि येतील नखाग्रिं साचे ! ६२

करांगुलींनीं जणुं केशपाशा,
करीं धरोनी तिमिरासि तैशा,
निशामुखा चुंबि जणों शशांक
तैं पद्मनेत्रें मिटलींत देख ! ६३

नभस्तलींचें तिमिरार्ध वेगें
नाशे शशीच्या नव अंशुयोगें
कीं मानसांबु द्विपभोगदुष्ट
प्रसन्न हो व्योम तमोविनष्ट. ६४

रक्तत्व चंद्र त्यजि सर्व, पाहीं,
तो शुभ्रबिंबें झळके पुन्हांही;
जे कीं स्वभावेंचि विशुद्ध, त्यांना
ती कालदुष्टा विकृती टिकेना. ६५

शशिप्रभा उन्नत जागिं शोभे,
निशातमा आश्रय नीच लाभे,
गुणान्वितां, दोषयुतां, समस्तां
स्वभावयोग्या स्थिति दे विधाता ! ६६

चंद्रांशुनीं पाझर चंद्रकांतीं
फुटूनि जे बिंदु गळोनि येती,
नितंबवृक्षीं निजल्या मयूरीं
अकालिं ते जाग करीति गौरि ! ६७

या कल्पवृक्षाग्रिं सखे ! करांहीं
सद्रत्नहारा जणुं मोजुं पाही,
मोजावया कौतुक थोर ज्यातें
ऐसा गमे हा रजनीश, कांते ! ६८

नतोन्नतत्वें गिरिच्या विशेष
तमासवें शुभ्र विधुप्रकाश
भासे जणों भूति बहुप्रकारीं
मत्तद्विपा लाविलि शोभणारी ! ६९

इंदुप्रभेचा रस फार प्यालें
आतां जया पान असह्य झालें
आवृन्त त्या हो कुमुदीं विकास
करी त्वरें मुक्तमिलिंदघोष ! ७०

तें कल्पवृक्षीं लटके दुकूल
ज्योत्स्नाचि भासे जणुं जें समूल;
जेव्हां प्रिये ! हालवि त्यासि वारा
तेव्हां लपे तो बघ भास सारा ! ७१

हे वृक्षपर्णांतुनि खालिं आले,
भूमीवरी शुभ्रसुमत्व ल्याले;
ज्योत्स्नांश ते गे ! उचलोनि केशीं
बांधूं तुझ्या येतिल कीं, सुकेशि ! ७२

सकंपबिंबा नभिं योगतारा
जियेसवें इंदु करी विहारा
वराचिया मीलनिं कंप पावे
नवा वधू, तेविंच ती स्वभावें ! ७३

तूं देखसी जें शशिबिंब ऐसें
गालीं तुझ्या तत्प्रतिमा विलासे;
जे गौर कीं पक्व शरासमान†
ज्योत्स्ना गमे उद्गत हो तिथून ! ७४

( वसंततिलका )

या सूर्यकांतमणिभाजनिं रक्तरंगीं
घे कल्पवृक्षमदिरा स्वकरीं शुभांगी,
आलीस तूं म्हणुनि पातलि ऐशि, पाहीं,
गे गंधमादनवनांतिल देवता ही. ७५

त्वद्वक्त्रगंध मुळचा बकुलासमान
स्वाभाविकीच नयनांतहि लालि पूर्ण,
वक्त्रीं विलासिनि ! तुझ्या, मदिरा निवास
लाभोनि काय करणार तरी विशेष ? ७६

† शर नांवाचें एक गवत आहे.

प्रेमा सखी करि तुझ्यावरि त्यास मान
  घ्याया, अनंगगुणवर्धन सेविं पान."
ऐसें वदोनि वच सुंदर शंकरें तें
  पाजीयलें मधु मनोरम अंबिकेतें. ७७

तैं पान तें उपजवी बहु विक्रियेस,
  जी विक्रिया परि मनोज्ञचि हो विशेष;
येतां अतर्क्य घटना विधिची घडोनि
  आम्रासि येइ सहकारपणा जडोनि. ७८

झाली अधीन मग ती युवती द्वया या –
  श्रीशंकरा तशि मदासहि हृष्टकाया;
लज्जेसि दूर करुनी, शयनासि नेतां
  केला प्रवृद्ध अनुरागचि त्यांहिं चित्ता. ७९

नेत्राब्ज गोल फिरती, वदतां चुकेही,
  घामेजली, वरि अकारण सुस्मिता ही,
ऐसें तिचें वदन लोचनिं जेविं कांत
  पी तो, मुखेंहि नच तेविं सुखें नितांत! ८०

कांची जिची सरकली मणिकांचनांची,
  झाली नितंबभरिं दुर्वह मात्र साची,
ऐशा प्रियेसि मणिमंदिरिं नेइ शर्व,
  संकल्पिं निर्मि विभु वैभव जेथ सर्व. ८१

आच्छादिलें शयन हंसविशुभ्र वासें
  मंदाकिनीपुलिनसें अतिरम्य भासे,
ऐशावरी प्रियकरीसह जाय शेजे,
  तैं रोहिणीपति शरद्घनिं तेविं साजे. ८२

क्लेशे हिमांशु, धरि जैं कच निर्घृणा ही,
रागें क्षतें नखिं करी भलत्याहि ठायीं,
तन्मेखलागुण तुटे जरि त्या रतांत,
झाला न तेविं रमतां मुळिं ईश तृप्त. ८३

ये त्यासि केवळ दया दयितेवरी ती,
नक्षत्रराजि उतरे जयिं कालिं अस्तीं,
तेव्हां मिटी नयन शंकर कौतुकेंचि,
वक्षःस्थळीं बिलगली रमणी जयाची. ८४

आलापयुक्त मधुकैशिकिं किन्नरांनीं
गातां उषःसमयिं मंगल ईशगाणीं,
होतां प्रबुद्ध कमलाकर कांचनाभ,
विद्वत्स्तवा उचित जागृत होय सांब. ८५

आलिंगनीं शिथिलता पळ आचरोनी,
आस्वादिती गिरिसुता परमेश दोनी
त्या गंधमादनवनोद्भव वायुवीचि,
ज्या मानसोर्मिकर, अब्जसुगंधवाची. ८६

तो ऊरुमूलिं निरखी नखचिह्नराजी
केली स्वयें सुरतसंगरिं खेळतां जी,
ती सांवरी वसन जों श्लथ जाहलेलें,
तों तीप्रति स्मरहरें करिं वारियेलें ! ८७

पाहे प्रियानयन, जागुनि लाल झाले,
दंतक्षतें अधरिं, कुंतल मोकळाले,
अस्पष्ट हो तिलक,— यापरि वक्त्रशोभा
देखोनियां रतिं धरी हर भारि लोभा. ८८

शय्योत्तरच्छदिं वळ्या पडल्या कितीही,
कांची विसूल पडली तुटुनी मधें ही
लाक्षारसांकित पदें उठलीं न थोडीं,
शय्या प्रभातिंहि अशी शिव नैव सोडी! ८९

लोभी प्रियामुखरसीं दिनरात्रिं झाला
हर्षाब्धिला विहरणीं अतिपूर आला.
ये दर्शनार्थ कुणि, ज्या विजया निवेदी,
त्यातें मुळींच निजदर्शन ईश नेदी! ९०

( मंदाक्रांता )

ऐसें रात्रंदिवस समचि प्रीतिनें क्रीडतांना
गेले रात्रीसम शत ऋतू सार्धही अस्तमाना
नाहीं आलें परि रतिसुखीं त्या वितृष्णत्व देवीं,
अब्ध्यौघांहीं कधिंच न शमे वाडवाग्नीहि जेवीं. ९१

‘ उमाविहारवर्णन ’ नामक सर्ग आठवा
समाप्त

श्रीकालिदासकवितारसमाधुरी ती
म्यां आणिली जरि असेलचि कीं सुरीतीं,
तच्छ्रेय सर्व दयिताहृदयाधिवासा
श्रीशंकरा कविवरप्रतिभाप्रकाशा. ९२

आठां सर्गिं ‘कुमारसंभव’ महाकाव्यावरी आवडीं
जी केली अनुवादकाव्यरचना ही प्राकृतीं तेवढी
श्रीखंडेकुलरामचंद्रकविनें अत्यादरें अर्पिली
तेणें श्रीपरमेशभक्तहृदयें होवोत संतर्पिलीं. ९३

श्रीचिंतामणिनाम तात, जननी श्रीजानकी माउली,
श्रीगौरीहरभक्ति हीच गमली संसारिं ज्यां साउली,
त्यांना वंदुनि, शंकराख्यहि तसें मद्बन्धुरायाप्रति,
हें 'सुश्लोककुमार' वाहुनि हरा हो 'राम' तेणें कृती. १४

देवी संस्कृत कालिदासकविता भव्या मनोज्ञा सती,
तीतें प्राकृत ही मदीय रचनाभूषाहि साजो! अति;
दूती मन्मति होउनी कळवुं दे तद्भाव त्या शंकरा,
जो राहोनि सदैव भूषवि महाराष्ट्राचिया अंतरा. १५

सुश्लोककुमार महाकाव्य
संपूर्ण

। श्रीगौरीशंकरार्पणमस्तु ।

अथ

महाकविश्रीकालिदासविरचितं

# कुमारसम्भवम् ।

॥ श्रीः ॥

# कुमारसम्भवम् ।

## प्रथमः सर्गः ।

अस्त्युत्तरस्यां दिशि देवतात्मा हिमालयो नाम नगाधिराजः
पूर्वापरौ तोयनिधी वगाह्य स्थितः पृथिव्या इव मानदण्डः १
यं सर्वशैलाः परिकल्प्य वत्सं मेरौ स्थिते दोग्धरि दोहदक्षे
भास्वन्ति रत्नानि महौषधीश्च पृथूपदिष्टां दुदुहुर्धरित्रीम् २
अनन्तरत्नप्रभवस्य यस्य हिमं न सौभाग्यविलोपि जातम्
एको हि दोषो गुणसंनिपाते निमज्जतीन्दोः किरणेष्विवाङ्कः ३
यश्चाप्सरोविभ्रममण्डनानां संपादयित्रीं शिखरैर्बिभर्ति
बलाहकच्छेदविभक्तरागामकालसन्ध्यामिव धातुमत्ताम् ४
आमेखलं संचरतां घनानां छायामधःसानुगतां निषेव्य
उद्वेजिता वृष्टिभिराश्रयन्ते शृङ्गाणि यस्यातपवन्ति सिद्धाः ५
पदं तुषारस्रुतिधौतरक्तं यस्मिन्नदृष्ट्वापि हतद्विपानाम्
विदन्ति मार्गं नखरन्ध्रमुक्तैर्मुक्ताफलैः केसरिणां किराताः ६
न्यस्ताक्षरा धातुरसेन यत्र भूर्जत्वचः कुञ्जरबिन्दुशोणाः
व्रजन्ति विद्याधरसुन्दरीणामनङ्गलेखक्रिययोपयोगम् ७
यः पूरयन्कीचकरन्ध्रभागान्दरीमुखोत्थेन समीरणेन
उद्गास्यतामिच्छति किंनराणां तानप्रदायित्वमिवोपगन्तुम् ८
कपोलकण्डूः करिभिर्विनेतुं विघट्टितानां सरलद्रुमाणाम्
यत्र स्रुतक्षीरतया प्रसूतः सानूनि गन्धः सुरभीकरोति ९
वनेचराणां वनितासखानां दरीगृहोत्सङ्गनिषक्तभासः
भवन्ति यत्रौषधयो रजन्यामतैलपूराः सुरतप्रदीपाः १०
उद्वेजयत्यङ्गुलिपार्ष्णिभागान्मार्गे शिलीभूतहिमेऽपि यत्र
न दुर्वहश्रोणिपयोधरार्ता भिन्दन्ति मन्दां गतिमश्वमुख्यः ११
दिवाकराद्रक्षति यो गुहासु लीनं दिवाभीतमिवान्धकारम्
क्षुद्रेऽपि नूनं शरणं प्रपन्ने ममत्वमुच्चैःशिरसां सतीव १२

लाङ्गूलविक्षेपविसर्पिशोभैरितस्ततश्चन्द्रमरीचिगौरैः
यस्यार्थयुक्तं गिरिराजशब्दं कुर्वन्ति बालव्यजनैश्चमर्यः १३
यत्रांशुकाक्षेपविलज्जितानां यदृच्छया किंपुरुषाङ्गनानाम्
दरीगृहद्वारविलम्बिबिम्बास्तिरस्करिण्यो जलदा भवन्ति १४
भागीरथीनिर्झरसीकराणां वोढा मुहुः कम्पितदेवदारुः
यद्वायुरन्विष्टमृगैः किरातैरासेव्यते भिन्नशिखण्डिबर्हः १५
सप्तर्षिहस्तावचितावशेषाण्यधो विवस्वान्परिवर्तमानः
पद्मानि यस्याग्रसरोरुहाणि प्रबोधयत्यूर्ध्वमुखैर्मयूखैः १६
यज्ञाङ्गयोनित्वमवेक्ष्य यस्य सारं धरित्रीधरणक्षमं च
प्रजापतिः कल्पितयज्ञभागं शैलाधिपत्यं स्वयमन्वतिष्ठत् १७
स मानसीं मेरुसखः पितॄणां कन्यां कुलस्य स्थितये स्थितिज्ञः
मेनां मुनीनामपि माननीयामात्मानुरूपां विधिनोपयेमे १८
कालक्रमेणाथ तयोः प्रवृत्ते स्वरूपयोग्ये सुरतप्रसङ्गे
मनोरमं यौवनमुद्वहन्त्या गर्भोऽभवद्भूधरराजपत्न्याः १९
असूत सा नागवधूपभोग्यं मैनाकमम्भोनिधिबद्धसख्यम्
क्रुद्धेऽपि पक्षच्छिदि वृत्रशत्राववेदनाज्ञं कुलिशक्षतानाम् २०
अथावमानेन पितुः प्रयुक्ता दक्षस्य कन्या भवपूर्वपत्नी
सती सती योगविसृष्टदेहा तां जन्मने शैलवधूं प्रपेदे २१
सा भूधराणामधिपेन तस्यां समाधिमत्यामुदपादि भव्या
सम्यक्प्रयोगादपरिक्षतायां नीताविवोत्साहगुणेन संपत् २२
प्रसन्नदिक्पांसुविविक्तवातं शङ्खस्वनानन्तरपुष्पवृष्टि
शरीरिणां स्थावरजङ्गमानां सुखाय तज्जन्मदिनं बभूव २३
तया दुहित्रा सुतरां सवित्री स्फुरत्प्रभामण्डलया चकासे
विदूरभूमिर्नवमेघशब्दादुद्भिन्नया रत्नशलाकयेव २४
दिने दिने सा परिवर्धमाना लब्धोदया चान्द्रमसीव लेखा
पुपोष लावण्यमयान्विशेषाञ्ज्योत्स्नान्तराणीव कलान्तराणि २५
तां पार्वतीत्याभिजनेन नाम्ना बन्धुप्रियां बन्धुजनो जुहाव
उ मेति मात्रा तपसो निषिद्धा पश्चादुमाख्यां सुमुखी जगाम २६
महीभृतः पुत्रवतोऽपि दृष्टिस्तस्मिन्नपत्ये न जगाम तृप्तिम्
अनन्तपुष्पस्य मधोर्हि चूते द्विरेफमाला सविशेषसङ्गा २७

प्रभामहत्या शिखयेव दीपस्त्रिमार्गयेव त्रिदिवस्य मार्गः
संस्कारवत्येव गिरा मनीषी तया स पूतश्च विभूषितश्च २८
मन्दाकिनीसैकतवेदिकाभिः सा कन्दुकैः कृत्रिमपुत्रकैश्च
रेमे मुहुर्मध्यगता सखीनां क्रीडारसं निर्विशतीव बाल्ये २९
तां हंसमालाः शरदीव गङ्गां महौषधिं नक्तमिवात्मभासः
स्थिरोपदेशामुपदेशकाले प्रपेदिरे प्राक्तनजन्मविद्याः ३०
असंभृतं मण्डनमङ्गयष्टेरनासवाख्यं करणं मदस्य
कामस्य पुष्पव्यतिरिक्तमस्त्रं बाल्यात्परं साथ वयः प्रपेदे ३१
उन्मीलितं तूलिकयेव चित्रं सूर्यांशुभिर्भिन्नमिवारविन्दम्
बभूव तस्याश्चतुरस्रशोभि वपुर्विभक्तं नवयौवनेन ३२
अभ्युन्नताङ्गुष्ठनखप्रभाभिर्निक्षेपणाद्रागमिवोद्गिरन्तौ
आजह्रतुस्तच्चरणौ पृथिव्यां स्थलारविन्दश्रियमव्यवस्थाम् ३३
सा राजहंसैरिव संनताङ्गी गतेषु लीलाञ्चितविक्रमेषु
व्यनीयत प्रत्युपदेशलुब्धैरादित्सुभिर्नूपुरसिञ्जितानि ३४
वृत्तानुपूर्वे च न चातिदीर्घे जङ्घे शुभे सृष्टवतस्तदीये
शेषाङ्गनिर्माणविधौ विधातुर्लावण्य उत्पाद्य इवास यत्नः ३५
नागेन्द्रहस्तास्त्वचि कर्कशत्वादेकान्तशैत्यात्कदलीविशेषाः
लब्ध्वापि लोके परिणाहि रूपं जातास्तदूर्वोरुपमानबाह्याः ३६
एतावता नन्वनुमेयशोभि काञ्चीगुणस्थानमनिन्दितायाः
आरोपितं यद्गिरिशेन पश्चादनन्यनारीकमनीयमङ्कम् ३७
तस्याः प्रविष्टा नतनाभिरन्ध्रं रराज तन्वी नवलोमराजिः
नीवीमतिक्रम्य सितेतरस्य तन्मेखलामध्यमणेरिवार्चिः ३८
मध्येन सा वेदिविलग्नमध्या वलित्रयं चारु बभार बाला
आरोहणार्थं नवयौवनेन कामस्य सोपानमिव प्रयुक्तम् ३९
अन्योन्यमुत्पीडयदुत्पलाक्ष्याः स्तनद्वयं पाण्डु तथा प्रवृद्धम्
मध्ये यथा श्याममुखस्य तस्य मृणालसूत्रान्तरमप्यलभ्यम् ४०
शिरीषपुष्पाधिकसौकुमार्यौ बाहू तदीयाविति मे वितर्कः
पराजितेनापि कृतौ हरस्य यौ कण्ठपाशौ मकरध्वजेन ४१
कण्ठस्य तस्याः स्तनबन्धुरस्य मुक्ताकलापस्य च निस्तलस्य
अन्योन्यशोभाजननाद्बभूव साधारणो भूषणभूष्यभावः ४२

चन्द्रं गता पद्मगुणान्न भुङ्क्ते पद्माश्रिता चान्द्रमसीमभिख्याम्
उमामुखं तु प्रतिपद्य लोला द्विसंश्रयां प्रीतिमवाप लक्ष्मीः ४३
पुष्पं प्रवालोपहितं यदि स्यान्मुक्ताफलं वा स्फुटविद्रुमस्थम्
ततोऽनुकुर्याद्विशदस्य तस्यास्ताम्रौष्ठपर्यस्तरुचः स्मितस्य ४४
स्वरेण तस्याममृतस्रुतेव प्रजल्पितायामभिजातवाचि
अप्यन्यपुष्टा प्रतिकूलशब्दा श्रोतुर्वितन्त्रीरिव ताड्यमाना ४५
प्रवातनीलोत्पलनिर्विशेषमधीरविप्रेक्षितमायताक्ष्या
तया गृहीतं नु मृगाङ्गनाभ्यस्ततो गृहीतं नु मृगाङ्गनाभिः ४६
तस्याः शलाकाञ्जननिर्मितेव कान्तिर्भ्रुवोरायतलेखयोर्या
तां वीक्ष्य लीलाचतुरामनङ्गः स्वचापसौन्दर्यमदं मुमोच ४७
लज्जा तिरश्चां यदि चेतसि स्यादसंशयं पर्वतराजपुत्र्याः
तं केशपाशं प्रसमीक्ष्य कुर्युर्बालप्रियत्वं शिथिलं चमर्यः ४८
सर्वोपमाद्रव्यसमुच्चयेन यथाप्रदेशं विनिवेशितेन
सा निर्मिता विश्वसृजा प्रयत्नादेकस्थसौन्दर्यदिदृक्षयेव ४९
तां नारदः कामचरः कदाचित्कन्यां किल प्रेक्ष्य पितुः समीपे
समादिदेशैकवधूं भवित्रीं प्रेम्णा शरीरार्धहरां हरस्य ५०
गुरुः प्रगल्भेऽपि वयस्यतोऽस्यास्तस्थौ निवृत्तान्यवराभिलाषः
ऋते कृशानोर्न हि मन्त्रपूतमर्हन्ति तेजांस्यपराणि हव्यम् ५१
अयाचितारं न हि देवदेवमद्रिः सुतां ग्राहयितुं शशाक
अभ्यर्थनाभङ्गभयेन साधुर्माध्यस्थ्यमिष्टेऽप्यवलम्बतेऽर्थे ५२
यदैव पूर्वे जनने शरीरं सा दक्षरोषात्सुदती ससर्ज
तदा प्रभृत्येव विमुक्तसङ्गः पतिः पशूनामपरिग्रहोऽभूत् ५३
स कृत्तिवासास्तपसे यतात्मा गङ्गाप्रवाहोक्षितदेवदारु
प्रस्थं हिमाद्रेर्मृगनाभिगन्धि किंचित्क्वणत्किंनरमध्युवास ५४
गणा नमेरुप्रसवावतंसा भूर्जत्वचः स्पर्शवतीर्दधानाः
मनःशिलाविच्छुरिता निषेदुः शैलेयनद्धेषु शिलातलेषु ५५
तुषारसंघातशिलाः खुराग्रैः समुल्लिखन्दर्पकलः ककुद्मान्
दृष्टः कथंचिद्गवयैर्विविग्नैरसोढसिंहध्वनिरुन्ननाद ५६
तत्राग्निमाधाय समित्समिद्धं स्वमेव मूर्त्यन्तरमष्टमूर्तिः
स्वयं विधाता तपसः फलानां केनापि कामेन तपश्चचार ५७

अनर्घ्यमर्घ्येण तमद्रिनाथः स्वर्गौकसामर्चितमर्चयित्वा
आराधनायास्य सखीसमेतां समादिदेश प्रयतां तनूजाम् ५८
प्रत्यर्थिभूतामपि तां समाधेः शुश्रूषमाणां गिरिशोऽनुमेने
विकारहेतौ सति विक्रियन्ते येषां न चेतांसि त एव धीराः ५९
अवचितबलिपुष्पा वेदिसंमार्गदक्षा
नियमविधिजलानां बर्हिषां चोपनेत्री
गिरिशमुपचचार प्रत्यहं सा सुकेशी
नियमितपरिखेदा तच्छिरश्चन्द्रपादैः ६०
इति उमोत्पत्तिर्नाम प्रथमः सर्गः ।

---

## द्वितीयः सर्गः ।

तस्मिन्विप्रकृताः काले तारकेण दिवौकसः
तुरासाहं पुरोधाय धाम स्वायंभुवं ययुः १
तेषामाविरभूद्ब्रह्मा परिम्लानमुखश्रियाम्
सरसां सुप्तपद्मानां प्रातर्दीधितिमानिव २
अथ सर्वस्य धातारं ते सर्वे सर्वतोमुखम्
वागीशं वाग्भिरर्थ्याभिः प्रणिपत्योपतस्थिरे ३
नमस्त्रिमूर्तये तुभ्यं प्राक्सृष्टेः केवलात्मने
गुणत्रयविभागाय पश्चाद्भेदमुपेयुषे ४
यदमोघमपामन्तरुप्तं बीजमज त्वया
अतश्चराचरं विश्वं प्रभवस्तस्य गीयसे ५
तिसृभिस्त्वमवस्थाभिर्महिमानमुदीरयन्
प्रलयस्थितिसर्गाणामेकः कारणतां गतः ६
स्त्रीपुंसावात्मभागौ ते भिन्नमूर्तेः सिसृक्षया
प्रसूतिभाजः सर्गस्य तावेव पितरौ स्मृतौ ७
स्वकालपरिमाणेन व्यस्तरात्रिंदिवस्य ते
यौ तु स्वप्नावबोधौ तौ भूतानां प्रलयोदयौ ८
जगद्योनिरयोनिस्त्वं जगदन्तो निरन्तकः
जगदादिरनादिस्त्वं जगदीशो निरीश्वरः ९

आत्मानमात्मना वेत्सि सृजस्यात्मानमात्मना
आत्मना कृतिना च त्वमात्मन्येव प्रलीयसे १०
द्रवः संघातकठिनः स्थूलः सूक्ष्मो लघुर्गुरुः
व्यक्तो व्यक्तेतरश्चासि प्राकाम्यं ते विभूतिषु ११
उद्घातः प्रणवो यासां न्यायैस्त्रिभिरुदीरणम्
कर्म यज्ञः फलं स्वर्गस्तासां त्वं प्रभवो गिराम् १२
त्वामामनन्ति प्रकृतिं पुरुषार्थप्रवर्तिनीम्
तद्दर्शिनमुदासीनं त्वामेव पुरुषं विदुः १३
त्वं पितॄणामपि पिता देवानामपि देवता
परतोऽपि परश्चासि विधाता वेधसामपि १४
त्वमेव हव्यं होता च भोज्यं भोक्ता च शाश्वतः
वेद्यं च वेदिता चासि ध्याता ध्येयं च यत्परम् १५
इति तेभ्यः स्तुतीः श्रुत्वा यथार्था हृदयंगमाः
प्रसादाभिमुखो वेधाः प्रत्युवाच दिवौकसः १६
पुराणस्य कवेस्तस्य चतुर्मुखसमीरिता
प्रवृत्तिरासीच्छब्दानां चरितार्था चतुष्टयी १७
स्वागतं स्वानधीकारान्प्रभावैरवलम्ब्य वः
युगपद्युगबाहुभ्यः प्राप्तेभ्यः प्राज्यविक्रमाः १८
किमिदं द्युतिमात्मीयां न बिभ्रति यथा पुरा
हिमक्लिष्टप्रकाशानि ज्योतींषीव मुखानि वः १९
प्रशमादर्चिषामेतदनुद्गीर्णसुरायुधम्
वृत्रस्य हन्तुः कुलिशं कुण्ठिताश्रीव लक्ष्यते २०
किं चायमरिदुर्वारः पाणौ पाशः प्रचेतसः
मन्त्रेण हतवीर्यस्य फणिनो दैन्यमाश्रितः २१
कुबेरस्य मनःशल्यं शंसतीव पराभवम्
अपविद्धगदो बाहुर्भग्नशाख इव द्रुमः २२
यमोऽपि विलिखन्भूमिं दण्डेनास्तमितत्विषा
कुरुतेऽस्मिन्नमोघेऽपि निर्वाणालातलाघवम् २३
अमी च कथमादित्याः प्रतापक्षतिशीतलाः
चित्रन्यस्ता इव गताः प्रकामालोकनीयताम् २४

पर्याकुलत्वान्मरुतां वेगभङ्गोऽनुमीयते
अम्भसामोघसंरोधः प्रतीपगमनादिव २५
आवर्जितजटामौलिविलम्बिशशिकोटयः
रुद्राणामपि मूर्धानः क्षतहुंकारशंसिनः २६
लब्धप्रतिष्ठाः प्रथमं यूयं किं बलवत्तरैः
अपवादैरिवोत्सर्गाः कृतव्यावृत्तयः परैः २७
तद्ब्रूत वत्साः किमितः प्रार्थयध्वं समागताः
मयि सृष्टिर्हि लोकानां रक्षा युष्मास्ववस्थिता २८
ततो मन्दानिलोद्धूतकमलाकरशोभिना
गुरुं नेत्रसहस्रेण नोदयामास वासवः २९
स द्विनेत्रं हरेश्चक्षुः सहस्रनयनाधिकम्
वाचस्पतिरुवाचेदं प्राञ्जलिर्जलजासनम् ३०
एवं यदात्थ भगवन्नामृष्टं नः परैः पदम्
प्रत्येकं विनियुक्तात्मा कथं न ज्ञास्यसि प्रभो ३१
भवल्लब्धवरोदीर्णस्तारकाख्यो महासुरः
उपप्लवाय लोकाना धूमकेतुरिवोत्थितः ३२
पुरे तावन्तमेवास्य तनोति रविरातपम्
दीर्घिकाकमलोन्मेषो यावन्मात्रेण साध्यते ३३
सर्वाभिः सर्वदा चन्द्रस्तं कलाभिर्निषेवते
नादत्ते केवलां लेखां हरचूडामणीकृताम् ३४
व्यावृत्तगतिरुद्याने कुसुमस्तेयसाध्वसात्
न वाति वायुस्तत्पार्श्वे तालवृन्तानिलाधिकम् ३५
पर्यायसेवामुत्सृज्य पुष्पसंभारतत्पराः
उद्यानपालसामान्यमृतवस्तमुपासते ३६
तस्योपायनयोग्यानि रत्नानि सरितां पतिः
कथमप्यम्भसामन्तरा निष्पत्तेः प्रतीक्षते ३७
ज्वलन्मणिशिखाश्चैनं वासुकिप्रमुखा निशि
स्थिरप्रदीपतामेत्य भुजङ्गाः पर्युपासते ३८
तत्कृतानुग्रहापेक्षी तं मुहुर्दूतहारितैः
अनुकूलयतीन्द्रोऽपि कल्पद्रुमविभूषणैः ३९

इत्थमाराध्यमानोऽपि क्लिश्नाति भुवनत्रयम्
शाम्येत्प्रत्यपकारेण नोपकारेण दुर्जनः ४०
तेनामरवधूहस्तैः सदयालूनपल्लवाः
अभिज्ञाश्छेदपातानां क्रियन्ते नन्दनद्रुमाः ४१
वीज्यते स हि संसुप्तः श्वाससाधारणानिलैः
चामरैः सुरबन्दीनां बाष्पशीकरवर्षिभिः ४२
उत्पाट्य मेरुशृङ्गाणि क्षुण्णानि हरितां खुरैः
आक्रीडपर्वतास्तेन कल्पिताः स्वेषु वेश्मसु ४३
मन्दाकिन्याः पयः शेषं दिग्वारणमदाविलम्
हेमाम्भोरुहसस्यानां तद्वाप्यो धाम सांप्रतम् ४४
भुवनालोकनप्रीतिः स्वर्गिभिर्नानुभूयते
खिलीभूते विमानानां तदापातभयात्पथि ४५
यज्वभिः संभृतं हव्यं विततेष्वध्वरेषु सः
जातवेदोमुखान्मायी मिषतामाच्छिनत्ति नः ४६
उच्चैरुच्चैःश्रवास्तेन हयरत्नमहारि च
देहबद्धमिवेन्द्रस्य चिरकालार्जितं यशः ४७
तस्मिन्नुपायाः सर्वे नः क्रूरे प्रतिहतक्रियाः
वीर्यवन्त्यौषधानीव विकारे सांनिपातिके ४८
जयाशा यत्र चास्माकं प्रतिघातोत्थितार्चिषा
हरिचक्रेण तेनास्य कण्ठे निष्कमिवार्पितम् ४९
तदीयास्तोयदेष्वद्य पुष्करावर्तकादिषु
अभ्यस्यन्ति तटाघातं निर्जितैरावता गजाः ५०
तदिच्छामो विभो स्रष्टुं सेनान्यं तस्य शान्तये
कर्मबन्धच्छिदं धर्मं भवस्येव मुमुक्षवः ५१
गोप्तारं सुरसैन्यानां यं पुरस्कृत्य गोत्रभित्
प्रत्यानेष्यति शत्रुभ्यो बन्दीमिव जयश्रियम् ५२
वचस्यवसिते तस्मिन्ससर्ज गिरमात्मभूः
गर्जितानन्तरां वृष्टिं सौभाग्येन जिगाय सा ५३
संपत्स्यते वः कामोऽयं कालः कश्चित्प्रतीक्ष्यताम्
न त्वस्य सिद्धौ यास्यामि सर्गव्यापारमात्मना ५४

इतः स दैत्यः प्राप्तश्रीर्नेत एवार्हति क्षयम्
विषवृक्षोऽपि संवर्ध्य स्वयं छेत्तुमसाम्प्रतम् ५५
वृतं तेनेदमेव प्राङ्मया चास्मै प्रतिश्रुतम्
वरेण शमितं लोकानलं दग्धुं हि तत्तपः ५६
संयुगे सांयुगीनं तमुद्यन्तं प्रसहेत कः
अंशादृते निषिक्तस्य नीललोहितरेतसः ५७
स हि देवः परं ज्योतिस्तमःपारे व्यवस्थितम्
परिच्छिन्नप्रभावर्द्धिर्न मया न च विष्णुना ५८
उमारूपेण ते यूयं संयमस्तिमितं मनः
शंभोर्यतध्वमाक्रष्टुमयस्कान्तेन लोहवत् ५९
उभे एव क्षमे वोढुमुभयोर्बीजमाहितम्
सा वा शंभोस्तदीया वा मूर्तिर्जलमयी मम ६०
तस्यात्मा शितिकण्ठस्य सैनापत्यमुपेत्य वः
मोक्ष्यते सुरबन्दीनां वेणीर्वीर्यविभूतिभिः ६१
इति व्याहृत्य विबुधान्विश्वयोनिस्तिरोदधे
मनस्याहितकर्तव्यास्तेऽपि देवा दिवं ययुः ६२
तत्र निश्चित्य कन्दर्पमगमत्पाकशासनः
मनसा कार्यसंसिद्धौ त्वराद्विगुणरंहसा ६३
अथ स ललितयोषिद्भ्रूलताचारुशृङ्गं
रतिवलयपदाङ्के चापमासज्य कण्ठे
सहचरमधुहस्तन्यस्तचूताङ्कुरास्त्रः
शतमखमुपतस्थे प्राञ्जलिः पुष्पधन्वा ६४

इति ब्रह्माभिगमनं नाम द्वितीयः सर्गः ।

---

## तृतीयः सर्गः ।

तस्मिन्मघोनस्त्रिदशान्विहाय सहस्रमक्ष्णां युगपत्पपात
प्रयोजनापेक्षितया प्रभूणां प्रायश्चलं गौरवमाश्रितेषु १
स वासवेनासनसंनिकृष्टमितो निषीदेति विसृष्टभूमिः
भर्तुः प्रसादं प्रतिनन्द्य मूर्ध्ना वक्तुं मिथः प्राक्रमतैवमेनम् २

आज्ञापय ज्ञातविशेष पुंसां लोकेषु यत्ते करणीयमस्ति
अनुग्रहं संस्मरणप्रवृत्तमिच्छामि संवर्धितमाज्ञया ते ३
केनाभ्यसूया पदकाङ्क्षिणा ते नितान्तदीर्घैर्जनिता तपोभिः
यावद्भवत्याहितसायकस्य मत्कार्मुकस्यास्य निदेशवर्ती ४
असंमतः कस्तव मुक्तिमार्गं पुनर्भवक्लेशभयात्प्रपन्नः
बद्धश्चिरं तिष्ठतु सुन्दरीणामारेचितभ्रूचतुरैः कटाक्षैः ५
अध्यापितस्योशनसापि नीतिं प्रयुक्तरागप्रणिधिर्द्विषस्ते
कस्यार्थधर्मौ वद पीडयामि सिन्धोस्तटावोघ इव प्रवृद्धः ६
कामेकपत्नीव्रतदुःखशीलां लोलं मनश्चारुतया प्रविष्टाम्
नितम्बिनीमिच्छसि मुक्तलज्जां कण्ठे स्वयंग्राहनिषक्तबाहुम् ७
कयासि कामिन्सुरतापराधात्पादानतः कोपनयावधूतः
तस्याः करिष्यामि दृढानुतापं प्रवालशय्याशरणं शरीरम् ८
प्रसीद विश्राम्यतु वीर वज्रं शरैर्मदीयैः कतमः सुरारिः
बिभेतु मोघीकृतबाहुवीर्यः स्त्रीभ्योऽपि कोपस्फुरिताधराभ्यः ९
तव प्रसादात्कुसुमायुधोऽपि सहायमेकं मधुमेव लब्ध्वा
कुर्यां हरस्यापि पिनाकपाणेर्धैर्यच्युतिं के मम धन्विनोऽन्ये १०
अथोरुदेशादवतार्य पादमाक्रान्तिसंभावितपादपीठम्
संकल्पितार्थे विवृतात्मशक्तिमाखण्डलः काममिदं बभाषे ११
सर्वं सखे त्वय्युपपन्नमेतदुभे ममास्त्रे कुलिशं भवांश्च
वज्रं तपोवीर्यमहत्सु कुण्ठं त्वं सर्वतोगामि च साधकं च १२
अवैमि ते सारमतः खलु त्वां कार्ये गुरुण्यात्मसमं नियोक्ष्ये
व्यादिश्यते भूधरतामवेक्ष्य कृष्णेन देहोद्वहनाय शेषः १३
आशंसता बाणगतिं वृषाङ्के कार्यं त्वया नः प्रतिपन्नकल्पम्
निबोध यज्ञांशभुजामिदानीमुच्चैर्द्विषामीप्सितमेतदेव १४
अमी हि वीर्यप्रभवं भवस्य जयाय सेनान्यमुशन्ति देवाः
स च त्वदेकेषुनिपातसाध्यो ब्रह्माङ्गभूर्ब्रह्मणि योजितात्मा १५
तस्मै हिमाद्रेः प्रयतां तनूजां यतात्मने रोचयितुं यतस्व
योषित्सु तद्वीर्यनिषेकभूमिः सैव क्षमेत्यात्मभुवोपदिष्टम् १६
गुरोर्नियोगाच्च नगेन्द्रकन्या स्थाणुं तपस्यन्तमधित्यकायाम्
अन्वास्त इत्यप्सरसां मुखेभ्यः श्रुतं मया मत्प्रणिधिः स वर्गः १७

तद्गच्छ सिद्ध्यै कुरु देवकार्यमर्थोऽयमर्थान्तरभाव्य एव
अपेक्षते प्रत्ययमुत्तमं त्वां बीजाङ्कुरः प्रागुदयादिवाम्भः १८
तस्मिन्सुराणां विजयाभ्युपाये तवैव नामास्त्रगतिः कृती त्वम्
अप्यप्रसिद्धं यशसे हि पुंसामनन्यसाधारणमेव कर्म १९
सुराः समभ्यर्थयितार एते कार्यं त्रयाणामपि विष्टपानाम्
चापेन ते कर्म न चातिहिंस्रमहो बतासि स्पृहणीयवीर्यः २०
मधुश्च ते मन्मथ साहचर्यादसावनुक्तोऽपि सहाय एव
समीरणो नोदयिता भवेति व्यादिश्यते केन हुताशनस्य २१
तथेति शेषामिव भर्तुराज्ञामादाय मूर्ध्ना मदनः प्रतस्थे
ऐरावतास्फालनकर्कशेन हस्तेन पस्पर्श तदङ्गमिन्द्रः २२
स माधवेनाभिमतेन सख्या रत्या च साशङ्कमनुप्रयातः
अङ्गव्ययप्रार्थितकार्यसिद्धिः स्थाण्वाश्रमं हैमवतं जगाम २३
तस्मिन्वने संयमिनां मुनीनां तपःसमाधेः प्रतिकूलवर्ती
संकल्पयोनेरभिमानभूतमात्मानमाधाय मधुर्जजृम्भे २४
कुबेरगुप्तां दिशमुष्णरश्मौ गन्तुं प्रवृत्ते समयं विलङ्घ्य
दिग्दक्षिणा गन्धवहं मुखेन व्यलीकनिश्वासमिवोत्ससर्ज २५
असूत सद्यः कुसुमान्यशोकः स्कन्धात्प्रभृत्येव सपल्लवानि
पादेन नापैक्षत सुन्दरीणां संपर्कमासिञ्जितनूपुरेण २६
सद्यः प्रवालोद्गमचारुपत्रे नीते समाप्तिं नवचूतबाणे
निवेशयामास मधुर्द्विरेफान्नामाक्षराणीव मनोभवस्य २७
वर्णप्रकर्षे सति कर्णिकारं दुनोति निर्गन्धतया स्म चेतः
प्रायेण सामग्र्यविधौ गुणानां पराङ्मुखी विश्वसृजः प्रवृत्तिः २८
बालेन्दुवक्राण्यविकासभावाद्बभुः पलाशान्यतिलोहितानि
सद्यो वसन्तेन समागतानां नखक्षतानीव वनस्थलीनाम् २९
लग्नद्विरेफाञ्जनभक्तिचित्रं मुखे मधुश्रीस्तिलकं प्रकाश्य
रागेण बालारुणकोमलेन चूतप्रवालोष्ठमलंचकार ३०
मृगाः पियालद्रुममञ्जरीणां रजःकणैर्विघ्नितदृष्टिपाताः
मदोद्धताः प्रत्यनिलं विचेरुर्वनस्थलीर्मर्मरपत्रमोक्षाः ३१
चूताङ्कुरास्वादकषायकण्ठः पुंस्कोकिलो यन्मधुरं चुकूज
मनस्विनीमानविघातदक्षं तदेव जातं वचनं स्मरस्य ३२

हिमव्यपायाद्विशदाधराणामापाण्डरीभूतमुखच्छवीनाम्
स्वेदोद्गमः किंपुरुषाङ्गनानां चक्रे पदं पत्रविशेषकेषु ३३
तपस्विनः स्थाणुवनौकसस्तामाकालिकीं वीक्ष्य मधुप्रवृत्तिम्
प्रयत्नसंस्तम्भितविक्रियाणां कथंचिदीशा मनसां बभूवुः ३४
तं देशमारोपितपुष्पचापे रतिद्वितीये मदने प्रपन्ने
काष्ठागतस्नेहरसानुविद्धं द्वन्द्वानि भावं क्रियया विवव्रुः ३५
मधु द्विरेफः कुसुमैकपात्रे पपौ प्रियां स्वामनुवर्तमानः
शृङ्गेण च स्पर्शनिमीलिताक्षीं मृगीमकण्डूयत कृष्णसारः ३६
ददौ रसात्पङ्कजरेणुगन्धि गजाय गण्डूषजलं करेणुः
अर्धोपभुक्तेन बिसेन जायां संभावयामास रथाङ्गनामा ३७
गीतान्तरेषु श्रमवारिलेशैः किंचित्समुच्छ्वासितपत्रलेखम्
पुष्पासवाघूर्णितनेत्रशोभि प्रियामुखं किंपुरुषश्चुचुम्बे ३८
पर्याप्तपुष्पस्तबकस्तनाभ्यः स्फुरत्प्रवालोष्ठमनोहराभ्यः
लतावधूभ्यस्तरवोऽप्यवापुर्विनम्रशाखाभुजबन्धनानि ३९
श्रुताप्सरोगीतिरपि क्षणेऽस्मिन्हरः प्रसंख्यानपरो बभूव
आत्मेश्वराणां न हि जातु विघ्नाः समाधिभेदप्रभवो भवन्ति ४०
लतागृहद्वारगतोऽथ नन्दी वामप्रकोष्ठार्पितहेमवेत्रः
मुखार्पितैकाङ्गुलिसंज्ञयैव मा चापलायेति गणान्व्यनैषीत् ४१
निष्कम्पवृक्षं निभृतद्विरेफं मूकाण्डजं शान्तमृगप्रचारम्
तच्छासनात्काननमेव सर्वं चित्रार्पितारम्भमिवावतस्थे ४२
दृष्टिप्रपातं परिहृत्य तस्य कामः पुरःशुक्रमिव प्रयाणे
प्रान्तेषु संसक्तनमेरुशाखं ध्यानास्पदं भूतपतेर्विवेश ४३
स देवदारुद्रुमवेदिकायां शार्दूलचर्मव्यवधानवत्याम्
आसीनमासन्नशरीरपातस्त्रियम्बकं संयमिनं ददर्श ४४
पर्यङ्कबन्धस्थिरपूर्वकायमृज्वायतं संनमितोभयांसम्
उत्तानपाणिद्वयसंनिवेशात्प्रफुल्लराजीवमिवाङ्कमध्ये ४५
भुजङ्गमोन्नद्धजटाकलापं कर्णावसक्तद्विगुणाक्षसूत्रम्
कण्ठप्रभासङ्गविशेषनीलां कृष्णत्वचं ग्रन्थिमतीं दधानम् ४६
किंचित्प्रकाशस्तिमितोग्रतारैर्भ्रूविक्रियायां विरतप्रसङ्गैः
नेत्रैरविस्पन्दितपक्ष्ममालैर्लक्ष्यीकृतघ्राणमधोमयूखैः ४७

अवृष्टिसंरम्भमिवाम्बुवाहमपामिवाधारमनुत्तरङ्गम्
अन्तश्चराणां मरुतां निरोधान्निवातनिष्कम्पमिव प्रदीपम् ४८
कपालनेत्रान्तरलब्धमार्गैर्ज्योतिःप्ररोहैरुदितैः शिरस्तः
मृणालसूत्राधिकसौकुमार्यां बालस्य लक्ष्मीं ग्लपयन्तमिन्दोः ४९
मनो नवद्वारनिषिद्धवृत्ति हृदि व्यवस्थाप्य समाधिवश्यम्
यमक्षरं क्षेत्रविदो विदुस्तमात्मानमात्मन्यवलोकयन्तम् ५०
स्मरस्तथाभूतमयुग्मनेत्रं पश्यन्नदूरान्मनसाप्यधृष्यम्
नालक्षयत्साध्वससन्नहस्तः स्रस्तं शरं चापमपि स्वहस्तात् ५१
निर्वाणभूयिष्ठमथास्य वीर्यं संधुक्षयन्तीव वपुर्गुणेन
अनुप्रयाता वनदेवताभ्यामदृश्यत स्थावरराजकन्या ५२
अशोकनिर्भर्त्सितपद्मरागमाकृष्टहेमद्युतिकर्णिकारम्
मुक्ताकलापीकृतसिन्धुवारं वसन्तपुष्पाभरणं वहन्ती ५३
आवर्जिता किंचिदिव स्तनाभ्यां वासो वसाना तरुणार्करागम्
पर्याप्तपुष्पस्तबकावनम्रा संचारिणी पल्लविनी लतेव ५४
स्रस्तां नितम्बादवलम्बमाना पुनःपुनः केसरदामकाञ्चीम्
न्यासीकृतां स्थानविदा स्मरेण मौर्वीं द्वितीयामिव कार्मुकस्य ५५
सुगन्धिनिश्वासविवृद्धतृष्णं बिम्बाधरासन्नचरं द्विरेफम्
प्रतिक्षणं संभ्रमलोलदृष्टिर्लीलारविन्देन निवारयन्ती ५६
तां वीक्ष्य सर्वावयवानवद्यां रतेरपि ह्रीपदमादधानाम्
जितेन्द्रिये शूलिनि पुष्पचापः स्वकार्यसिद्धिं पुनराशशंसे ५७
भविष्यतः पत्युरुमा च शंभोः समाससाद प्रतिहारभूमिम्
योगात्स चान्तः परमात्मसंज्ञं दृष्ट्वा परं ज्योतिरुपारराम ५८
ततो भुजङ्गाधिपतेः फणाग्रैरधः कथंचिद्धृतभूमिभागः
शनैःकृतप्राणविमुक्तिरीशः पर्यङ्कबन्धं निबिडं बिभेद ५९
तस्मै शशंस प्रणिपत्य नन्दी शुश्रूषया शैलसुतामुपेताम्
प्रवेशयामास च भर्तुरेनां भ्रूक्षेपमात्रानुमतप्रवेशाम् ६०
तस्याः सखीभ्यां प्रणिपातपूर्वं स्वहस्तलूनः शिशिरात्ययस्य
व्यकीर्यत त्र्यम्बकपादमूले पुष्पोच्चयः पल्लवभङ्गभिन्नः ६१
उमापि नीलालकमध्यशोभि विस्रंसयन्ती नवकर्णिकारम्
चकार कर्णच्युतपल्लवेन मूर्ध्ना प्रणामं वृषभध्वजाय ६२

अनन्यभाजं पतिमाप्नुहीति सा तथ्यमेवाभिहिता भवेन
न हीश्वरव्याहृतयः कदाचित्पुष्णन्ति लोके विपरीतमर्थम् ६३
कामस्तु बाणावसरं प्रतीक्ष्य पतङ्गवद्वह्निमुखं विविक्षुः
उमासमक्षं हरबद्धलक्ष्यः शरासजनज्यां मुहुराममर्श ६४
अथोपनिन्ये गिरिशाय गौरी तपस्विने ताम्ररुचा करेण
विशोषितां भानुमतो मयूखैर्मन्दाकिनीपुष्करबीजमालाम् ६५
प्रतिग्रहीतुं प्रणयिप्रियत्वात्त्रिलोचनस्तामुपचक्रमे च
संमोहनं नाम च पुष्पधन्वा धनुष्यमोघं समधत्त बाणम् ६६
हरस्तु किंचित्परिलुप्तधैर्यश्चन्द्रोदयारम्भ इवाम्बुराशिः
उमामुखे बिम्बफलाधरोष्ठे व्यापारयामास विलोचनानि ६७
विवृण्वती शैलसुतापि भावमङ्गैः स्फुरद्बालकदम्बकल्पैः
साचीकृता चारुतरेण तस्थौ मुखेन पर्यस्तविलोचनेन ६८
अथेन्द्रियक्षोभमयुग्मनेत्रः पुनर्वशित्वाद्बलवन्निगृह्य
हेतुं स्वचेतोविकृतेर्दिदृक्षुर्दिशामुपान्तेषु ससर्ज दृष्टिम् ६९
स दक्षिणापाङ्गनिविष्टमुष्टिं नतांसमाकुञ्चितसव्यपादम्
ददर्श चक्रीकृतचारुचापं प्रहर्तुमभ्युद्यतमात्मयोनिम् ७०
तपःपरामर्शविवृद्धमन्योर्भ्रूभङ्गदुष्प्रेक्ष्यमुखस्य तस्य
स्फुरन्नुदर्चिः सहसा तृतीयादक्ष्णः कृशानुः किल निष्पपात ७१
क्रोधं प्रभो संहर संहरेति यावद्गिरः खे मरुतां चरन्ति
तावत्स वह्निर्भवनेत्रजन्मा भस्मावशेषं मदनं चकार ७२
तीव्राभिषङ्गप्रभवेण वृत्तिं मोहेन संस्तम्भयतेन्द्रियाणाम्
अज्ञातभर्तृव्यसना मुहूर्तं कृतोपकारेव रतिर्बभूव ७३
तमाशु विघ्नं तपसस्तपस्वी वनस्पतिं वज्र इवावभज्य
स्त्रीसंनिकर्षं परिहर्तुमिच्छन्नन्तर्दधे भूतपतिः सभूतः ७४

शैलात्मजापि पितुरुच्छिरसोऽभिलाषं
व्यर्थं समर्थ्य ललितं वपुरात्मनश्च
सख्योः समक्षमिति चाधिकजातलज्जा
शून्या जगाम भवनाभिमुखी कथंचित् ७५

सपदि मुकुलिताक्षीं रुद्रसंरम्भभीत्या
दुहितरमनुकम्प्यामद्रिरादाय दोर्भ्याम्

सुरगज इव बिभ्रत्पद्मिनीं दन्तलग्नां
प्रतिपथगतिरासीद्वेगदीर्घीकृताङ्गः ७६

इति मदनदहनो नाम तृतीयः सर्गः ।

---

## चतुर्थः सर्गः ।

अथ मोहपरायणा सती विवशा कामवधूर्विबोधिता
विधिना प्रतिपादयिष्यता नववैधव्यमसह्यवेदनम् १
अवधानपरे चकार सा प्रलयान्तोन्मिषिते विलोचने
न विवेद तयोरतृप्तयोः प्रियमत्यन्तविलुप्तदर्शनम् २
अयि जीवितनाथ जीवसीत्यभिधायोत्थितया तया पुरः
ददृशे पुरुषाकृति क्षितौ हरकोपानलभस्म केवलम् ३
अथ सा पुनरेव विह्वला वसुधालिङ्गनधूसरस्तनी
विललाप विकीर्णमूर्धजा समदुःखामिव कुर्वती स्थलीम् ४
उपमानमभूद्विलासिनां करणं यत्तव कान्तिमत्तया
तदिदं गतमीदृशीं दशां न विदीर्ये कठिनाः खलु स्त्रियः ५
क्व नु मां त्वदधीनजिवितां विनिकीर्य क्षणभिन्नसौहृदः
नलिनीं क्षतसेतुबन्धनो जलसंघात इवासि विद्रुतः ६
कृतवानसि विप्रियं न मे प्रतिकूलं न च ते मया कृतम्
किमकारणमेव दर्शनं विलपन्त्यै रतये न दीयते ७
स्मरसि स्मर मेखलागुणैरुत गोत्रस्खलितेषु बन्धनम्
च्युतकेशरदूषितेक्षणान्यवतंसोत्पलताडनानि वा ८
हृदये वससीति मत्प्रियं यदवोचस्तदवैमि कैतवम्
उपचारपदं न चेदिदं त्वमनङ्गः कथमक्षता रतिः ९
परलोकनवप्रवासिनः प्रतिपत्स्ये पदवीमहं तव
विधिना जन एष वञ्चितस्त्वदधीनं खलु देहिनां सुखम् १०
रजनीतिमिरावगुण्ठिते पुरमार्गे घनशब्दविक्लवाः
वसतिं प्रिय कामिनां प्रियास्त्वदृते प्रापयितुं क ईश्वरः ११
नयनान्यरुणानि घूर्णयन्वचनानि स्खलयन्पदे पदे
असति त्वयि वारुणीमदः प्रमदानामधुना विडम्बना १२

अवगम्य कथीकृतं वपुः प्रियबन्धोस्तव निष्फलोदयः
बहुलेऽपि गते निशाकरस्तनुतां दुःखमनङ्ग मोक्ष्यति १३
हरितारुणचारुबन्धनः कलपुंस्कोकिलशब्दसूचितः
वद संप्रति कस्य बाणतां नवचूतप्रसवो गमिष्यति १४
अलिपङ्क्तिरनेकशस्त्वया गुणकृत्ये धनुषो नियोजिता
विरुतैः करुणस्वनैरियं गुरुशोकामनुरोदितीव माम् १५
प्रतिपद्य मनोहरं वपुः पुनरप्यादिश तावदुत्थितः
रतिदूतिपदेषु कोकिलां मधुरालापनिसर्गपण्डिताम् १६
शिरसा प्रणिपत्य याचितान्युपगूढानि सवेपथूनि च
सुरतानि च तानि ते रहः स्मर संस्मृत्य न शान्तिरस्ति मे १७
रचितं रतिपण्डित त्वया स्वयमङ्गेषु ममेदमार्तवम्
ध्रियते कुसुमप्रसाधनं तव तच्चारु वपुर्न दृश्यते १८
विबुधैरसि यस्य दारुणैरसमाप्ते परिकर्मणि स्मृतः
तमिमं कुरु दक्षिणेतरं चरणं निर्मितरागमेहि मे १९
अहमेत्य पतङ्गवर्त्मना पुनरङ्काश्रयिणी भवामि ते
चतुरैः सुरकामिनीजनैः प्रिय यावन्न विलोभ्यसे दिवि २०
मदनेन विना कृता रतिः क्षणमात्रं किल जीवितेति मे
वचनीयमिदं व्यवस्थितं रमण त्वामनुयामि यद्यपि २१
क्रियतां कथमन्त्यमण्डनं परलोकान्तरितस्य ते मया
सममेव गतोऽस्यतर्कितां गतिमङ्गेन च जीवितेन च २२
ऋजुतां नयतः स्मरामि ते शरमुत्सङ्गनिषण्णधन्वनः
मधुना सह सस्मितां कथां नयनोपान्तविलोकितं च यत् २३
क्व नु ते हृदयंगमः सखा कुसुमायोजितकार्मुको मधुः
न खलूग्ररुषा पिनाकिना गमितः सोऽपि सुहृद्गतां गतिम् २४
अथ तैः परिदेविताक्षरैर्हृदये दिग्धशरैरिवाहतः
रतिमभ्युपपत्तुमातुरां मधुरात्मानमदर्शयत्पुरः २५
तमवेक्ष्य रुरोद सा भृशं स्तनसंबाधमुरो जघान च
स्वजनस्य हि दुःखमग्रतो विवृतद्वारमिवोपजायते २६
इति चैनमुवाच दुःखिता सुहृदः पश्य वसन्त किं स्थितम्
तदिदं कणशो विकीर्यते पवनैर्भस्म कपोतकर्बुरम् २७

अयि संप्रति देहि दर्शनं स्मर पर्युत्सुक एष माधवः
दयितास्वनवस्थितं नृणां न खलु प्रेम चलं सुहृज्जने २८
अमुना ननु पार्श्ववर्तिना जगदाज्ञां ससुरासुरं तव
बिसतन्तुगुणस्य कारितं धनुषः पेलवपुष्पपत्रिणः २९
गत एव न ते निवर्तते स सखा दीप इवानिलाहतः
अहमस्य दशेव पश्य मामविषह्यव्यसनेन धूमिताम् ३०
विधिना कृतमर्धवैशसं ननु मां कामवधे विमुञ्चता
अनपायिनि संश्रयद्रुमे गजभग्ने पतनाय वल्लरी ३१
तदिदं क्रियतामनन्तरं भवता बन्धुजनप्रयोजनम्
विधुरां ज्वलनातिसर्जनान्ननु मां प्रापय पत्युरन्तिकम् ३२
शशिना सह याति कौमुदी सह मेघेन तडित्प्रलीयते
प्रमदाः पतिवर्त्मगा इति प्रतिपन्नं हि विचेतनैरपि ३३
अमुनैव कषायितस्तनी सुभगेन प्रियगात्रभस्मना
नवपल्लवसंस्तरे यथा रचयिष्यामि तनुं विभावसौ ३४
कुसुमास्तरणे सहायतां बहुशः सौम्य गतस्त्वमावयोः
कुरु संप्रति तावदाशु मे प्रणिपाताञ्जलियाचितश्चिताम् ३५
तदनु ज्वलनं मदर्पितं त्वरयेर्दक्षिणवातवीजनैः
विदितं खलु ते यथा स्मरः क्षणमप्युत्सहते न मां विना ३६
इति चापि विधाय दीयतां सलिलस्याञ्जलिरेक एव नौ
अविभज्य परत्र तं मया सहितः पास्यति ते स बान्धवः ३७
परलोकविधौ च माधव स्मरमुद्दिश्य विलोलपल्लवाः
निवपेः सहकारमञ्जरीः प्रियचूतप्रसवो हि ते सखा ३८
इति देहविमुक्तये स्थितां रतिमाकाशभवा सरस्वती
शफरीं ह्रदशोषविक्लवां प्रथमा वृष्टिरिवान्वकम्पयत् ३९
कुसुमायुधपत्नि दुर्लभस्तव भर्ता न चिराद्भविष्यति
शृणु येन स कर्मणा गतः शलभत्वं हरलोचनार्चिषि ४०
अभिलाषमुदीरितेन्द्रियः स्वसुतायामकरोत्प्रजापतिः
अथ तेन निगृह्य विक्रियामभिशप्तः फलमेतदन्वभूत् ४१
परिणेष्यति पार्वतीं यदा तपसा तत्प्रवणीकृतो हरः
उपलब्धसुखस्तदा स्मरं वपुषा स्वेन नियोजयिष्यति ४२

इति चाह स धर्मयाचितः स्मरशापावधिदां सरस्वतीम्
अशनेरमृतस्य चोभयोर्वशिनश्चाम्बुधराश्च योनयः ४३
तदिदं परिरक्ष शोभने भवितव्यप्रियसंगमं वपुः
रविपीतजला तपात्यये पुनरोघेन हि युज्यते नदी ४४
इत्थं रतेः किमपि भूतमदृश्यरूपं
मन्दीचकार मरणव्यवसायबुद्धिम्
तत्प्रत्ययाच्च कुसुमायुधबन्धुरेना–
माश्वासयत्सुचरितार्थपदैर्वचोभिः ४५
अथ मदनवधूरुपप्लवान्तं व्यसनकृशा परिपालयांबभूव
शशिन इव दिवातनस्य लेखा किरणपरिक्षयधूसरा प्रदोषम् ४६

**इति रतिविलापो नाम चतुर्थः सर्गः ।**

---

## पञ्चमः सर्गः

तथा समक्षं दहता मनोभवं पिनाकिना भग्नमनोरथा सती
निनिन्द रूपं हृदयेन पार्वती प्रियेषु सौभाग्यफला हि चारुता १
इयेष सा कर्तुमवन्ध्यरूपतां समाधिमास्थाय तपोभिरात्मनः
अवाप्यते वा कथमन्यथा द्वयं तथाविधं प्रेम पतिश्च तादृशः २
निशम्य चैनां तपसे कृतोद्यमां सुतां गिरीशप्रतिसक्तमानसाम्
उवाच मेना परिरभ्य वक्षसा निवारयन्ती महतो मुनिव्रतात् ३
मनीषिताः सन्ति गृहेषु देवतास्तपः क्व वत्से क्व च तावकं वपुः
पदं सहेत भ्रमरस्य पेलवं शिरीषपुष्पं न पुनः पतत्रिणः ४
इति ध्रुवेच्छामनुशासती सुतां शशाक मेना न नियन्तुमुद्यमात्
क ईप्सितार्थस्थिरनिश्चयं मनः पयश्च निम्नाभिमुखं प्रतीपयेत् ५
कदाचिदासन्नसखीमुखेन सा मनोरथज्ञं पितरं मनस्विनी
अयाचतारण्यनिवासमात्मनः फलोदयान्ताय तपःसमाधये ६
अथानुरूपाभिनिवेशतोषिणा कृताभ्यनुज्ञा गुरुणा गरीयसा
प्रजासु पश्चात्प्रथितं तदाख्यया जगाम गौरीशिखरं शिखण्डिमत् ७
विमुच्य सा हारमहार्यनिश्चया विलोलयष्टिप्रविलुप्तचन्दनम्
बबन्ध बालारुणबभ्रु वल्कलं पयोधरोत्सेधविशीर्णसंहति ८

यथा प्रसिद्धैर्मधुरं शिरोरुहैर्जटाभिरप्येवमभूत्तदाननम्
न षट्पदश्रेणिभिरेव पङ्कजं सशैवलासङ्गमपि प्रकाशते ९
प्रतिक्षणं सा कृतरोमविक्रियां व्रताय मौञ्जीं त्रिगुणां बभार याम्
अकारि तत्पूर्वनिबद्धया तया सरागमस्या रसनागुणास्पदम् १०
विसृष्टरागादधरान्निवर्तितः स्तनाङ्गरागारुणिताच्च कन्दुकात्
कुशाङ्कुरादानपरिक्षताङ्गुलिः कृतोऽक्षसूत्रप्रणयी तया करः ११
महार्हशय्यापरिवर्तनच्युतैः स्वकेशपुष्पैरपि या स्म दूयते
अशेत सा बाहुलतोपधायिनी निषेदुषी स्थण्डिल एव केवले १२
पुनर्ग्रहीतुं नियमस्थया तया द्वयेऽपि निक्षेप इवार्पितं द्वयम्
